१९३७-२०२६ वर्ष १०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | शुक्रवार | दि. १३ नोव्हेंबर २०२६ | अंक १५७ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

ट्रकखाली चिरडून दुचाकीस्वाराचा मृत्यू

पेण : मुंबई-गोवा महामार्गावर भरधाव कॅप्सूल ट्रकने ओव्हरटेक करताना स्कूटरला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. जिते गावजवळील खरोशी फाटा येथे ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मयत आणि फिर्यादी हे बर्गमन स्कूटर (क्र. एमएच ४३ बीएस ८९७९) वरून चौल ते वाशी, नवी मुंबई असा प्रवास करीत होते. मुंबई-गोवा महामार्गावरील पेण-पनवेल मार्गावरून जात असताना त्यांच्या उजव्या बाजूने भरधाव कॅप्सूल ट्रक (क्र. एनएल ०१ एएच ३६५३) ओव्हरटेक करून पुढे जात होता. •➤पान २ वर

महिलेची हत्या करून दागिने लंपास

खोपोली : चोरीच्या उद्देशाने घरात शिरलेल्या अज्ञात आरोपीने महिलेचे हात-पाय बांधून ओढणीने गळा आवळून तिची हत्या केली. त्यानंतर तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र आणि हातातील तीन सोन्याच्या बांगड्या घेऊन आरोपी पसार झाला. खोपोलीतील भानवज येथील इंद्रप्रस्थ इमारतीत ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.३३ वाजण्याच्या सुमारास ही धक्कादायक घटना घडली. भानवज येथील इंद्रप्रस्थ इमारतीतील फ्लॅट क्रमांक ०४ मध्ये फिर्यादी यांच्या बहिणीवर अज्ञात आरोपीने हल्ला केला. चोरीच्या उद्देशाने घरात प्रवेश करून आरोपीने महिलेचे हात-पाय कपड्याने बांधले •➤पान २ वर

वे|घ|क

मुंबईत पुन्हा बॉम्बस्फोटाची धमकी

मुंबई : मुंबईतील महापौर कार्यालयासह पाच महत्त्वाच्या ठिकाणांना बॉम्बस्फोटाने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे देण्यात आली आहे. गुरुवारी सकाळी १०.१२ वाजता हा मेल प्राप्त झाल्यानंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या. महापौर कार्यालय, बँक, न्यायालय, अमिताभ बच्चन यांचा बंगला, महालक्ष्मी रेसकोर्स आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाचा मेलमध्ये उल्लेख करण्यात आला आहे. धमकीनंतर बॉम्बशोधक व नाशक पथकाने तपासणी केली. मात्र, कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. त्यामुळे महापौर कार्यालयातील नियमित कामकाज सुरू आहे. गेल्या काही दिवसांत अशा प्रकारे तिसऱ्यांदा धमकीचा मेल आल्याने पोलिसांकडून मेलचा स्रोत आणि धमकी देणाऱ्याचा शोध घेतला जात आहे.

टेक ऑफपूर्वीच विमानाचा अपघात

सोलापूर : सोलापूर विमानतळावर गुरुवारी (दि. १२) शिकाऊ विमानाचा अपघात झाला. उड्डाणासाठी धावपट्टीवरून वेग घेत असताना विमान अचानक धावपट्टीवरून खाली घसरले. सुदैवाने या घटनेत महिला शिकाऊ वैमानिकाला कोणतीही दुखापत झाली नाही. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. मिळालेल्या माहितीनुसार, वैमानिक प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणारे हे विमान टेक ऑफच्या तयारीत असताना धावपट्टीवरून घसरले. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. विमानतळ प्राधिकरणाकडूनही याबाबत अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

बाथरूममध्ये गांजाचा साठा

पनवेल : पळस्पेफाटा येथील एमएमआरडीए वसाहतीतील एका फ्लॅटच्या बाथरूममध्ये लपवून ठेवलेला गांजाचा साठा पनवेल शहर पोलिसांनी छाप्यात जप्त केला. या कारवाईत ४.२५५ किलो गांजा आणि विक्रीसाठी वापरले जाणारे साहित्य हस्तगत करण्यात आले असून, सिद्धार्थ रामदास मोरे (४१) याला अटक करण्यात आली आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांना एमएमआरडीए वसाहतीत गांजाचा साठा असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी आर-२, सी विंगमधील फ्लॅट क्रमांक ५३१ येथे छापा टाकला. घराची झडती घेतली असता बाथरूममध्ये गांजा लपवून ठेवल्याचे •➤पान २ वर

खोपोली शिळफाट्यावर भीषण अपघात

- बसने नऊ वाहनांना उडवले
- दोघे गंभीर, १२ जण जखमी

| खोपोली | प्रतिनिधी |

खोपोलीतील शिळफाटा येथे गुरुवारी (दि. १२) खासगी बसच्या ब्रेक निकामी झाल्याने भीषण अपघात घडला. भरधाव आणि अनियंत्रित बसने एकापाठोपाठ आठ ते नऊ वाहनांना धडक देत रस्त्यालगतच्या दुकानालाही जोरदार धडक दिली. या अपघातात दोघे गंभीर, तर १२ जण जखमी झाले आहेत. बसच्या धडकेने वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला. काही क्षणांत घडलेल्या या थरारक घटनेमुळे परिसरात धावपळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, माऊली ट्रॅव्हल्सची खासगी बस सुरत येथून प्रवाशांना घेऊन पंढरपूरच्या दिशेने जात होती. शिळफाट्यावर आल्यानंतर अचानक बसचे ब्रेक निकामी झाले. त्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि बसने समोरील वाहनांना एकापाठोपाठ धडक दिली. यात एक रिक्षा, दोन कार, दोन पिकअप आणि तीन ते चार दुचाकींचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर बस रस्त्यालगतच्या दुकानावरही आदळली.

या अपघातात दोघांना गंभीर दुखापत झाली असून, १२ जण जखमी झाले. जखमींना तातडीने खोपोली नगरपालिका रुग्णालय, डॉ. जाखोटिया हॉस्पिटल आणि एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलीस, हेल्प फाऊंडेशनचे सदस्य आणि स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. वाहनांमध्ये अडकलेल्या जखमींना बाहेर काढून रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त बस बाजूला करण्यात आली. त्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली. सुदैवाने या दुर्घटनेत जीवितहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे.

जखमींची नावे : ईषा पुंडलिक जाधव (२२, परळी, सुधागड), प्रफुल्ल ढवाळकर (३८, लौजी, खोपोली), संदीप फ्रान्सिस मुकणे (३२, कुणे गाव, लोणावळा), विपुल श्रीकृष्ण पाथ्रोडकर (२९, भिसेगाव, कर्जत), सुहास शरद भालेराव (३५, पनवेल), स्वप्निल सुनील पवार (३६, लक्ष्मीनगर, खोपोली), सोमनाथ चंदर पवार (३६, सावरोली, खालापूर), वरद अनंत देशमुख (१३, खोपोली फाटा), कुणाल प्रवीण दळवी (२८, मोगलवाडी, खोपोली), सुरेश विरप्पा बिरादार (३०, क्रांतीनगर, खोपोली), प्रीतम वाघमारे (३०, वावोशी, खालापूर) आणि आनंद अरुण गोसावी (३६, उक्रुळ, कर्जत).



रिक्षा, कार, पिकअपचा चक्काचूर, दुकानाचेही नुकसान



84 एकर सरकारी जमीन घोटाळ्याचा डाव उधळला!

उच्च न्यायालयाने संपादन प्रक्रिया केली रद्द

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात सरकारी जमिनींवर खासगी संस्थांचा डोळा असल्याचे आणखी एक प्रकरण समोर आले आहे. ठोकळवाडी येथील तब्बल ८४ हेक्टर सरकारी जमीन महारिषी वेदोधारक फाऊंडेशन या खासगी संस्थेच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न मुंबई उच्च न्यायालयाने हाणून पाडला आहे. ३ मार्च २०२५ रोजी जमीन औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित करून दुसऱ्याच दिवशी संपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र, ५ नोव्हेंबर २०२६ रोजी उच्च न्यायालयाने ही संपूर्ण संपादन कारवाई रद्द केली. यापूर्वी टोरंट पॉवरच्या प्रकल्पाच्या कॉलनीसाठी ९६ एकर जमीन देण्यात आल्याचे प्रकरण ताजे असतानाच हा प्रकार उघड झाल्याने सरकारी जमिनींच्या खासगी हस्तांतरणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

देश पारतंत्र्यात असताना टाटा उद्योग समूहाने पुण्यात आंध्रा धरण बांधून त्याच्या पाण्यावर कर्जत तालुक्यातील भिवपुरी येथे ८० मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प उभारला. आता याच परिसरात १२०० मेगावॅट वीजनिर्मितीचे उद्दिष्ट असलेला नवा प्रकल्प साकारत आहे. या प्रकल्पासाठी टाटा कंपनीच्या मालकीच्या जमिनीत पाणीसाठा निर्माण करून ते पाणी ठोकळवाडी धरणात आणण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाच्या परिसरातील वनजमीन २०२४ मध्ये टाटा समूहाला देण्यात आल्याची माहिती यापूर्वी समोर आली होती.

मात्र, ठोकळवाडी धरणालगतची ८४ हेक्टर सरकारी जमीन आता महारिषी वेदोधारक फाऊंडेशनला देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. ३ मार्च २०२५ रोजी संबंधित जमीन औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आली आणि ४ मार्च रोजी संपादनाची प्रक्रिया सुरू झाली. या फाऊंडेशनचे नेमके स्वरूप काय, कर्जत तालुक्यात त्याचे सार्वजनिक हिताचे कार्य काय आणि सरकारी जमीन त्याच संस्थेला देण्याची घाई का, असे प्रश्न उपस्थित झाले. या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आल्यानंतर उच्च न्यायालयाने ५ नोव्हेंबर २०२६ रोजी सरकारची कारवाई रद्द केली.

कर्जत तालुक्यातील भालिवडी ग्रामपंचायत हद्दीतील लाखाची वाडी येथील ९६ एकर जमीन टोरंट पॉवरच्या प्रकल्पाच्या कॉलनीसाठी यापूर्वीच देण्यात आल्याचे प्रकरणही चर्चेत आहे. एका बाजूला स्थानिकांच्या जमिनी, वनक्षेत्र आणि सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणाचा प्रश्न असताना दुसरीकडे खासगी संस्थांसाठी सरकारी जमिनी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न होत असल्याने संताप व्यक्त होत आहे.



सरकारी जमिनी खासगी संस्थांच्या घशात?

आज एका खासगी संस्थेसाठी सरकारी जमीन संपादन करण्याचा प्रयत्न होतो, उद्या दुसऱ्या प्रकल्पासाठी स्थानिकांच्या जमिनींवर गदा येणार नाही, याची काय खात्री? शेतजमिनी, आदिवासींच्या जमिनी आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासनाची आहे. मग खासगी संस्थांच्या प्रकल्पांसाठी सरकारी जमिनींची दारे खुली का केली जात आहेत? ठोकळवाडीतील ८४ हेक्टर जमिनीचा प्रयत्न न्यायालयाने रोखला असला, तरी टोरंटला दिलेल्या ९६ एकर जमिनीचा प्रश्न कायम आहे. कर्जतच्या जमिनींबाबत शासनाची नेमकी भूमिका काय, याचा खुलासा होणे गरजेचे आहे.

दोन्ही शिवसेना एकत्र येणार?

- राजकारणात कधीही काहीही घडू शकते
- पालकमंत्री भरत गोगावले यांचे सूचक विधान

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

दोन्ही शिवसेना एकत्र येणार की नाही, याबाबतच्या चर्चांना पालकमंत्री भरत गोगावले यांनी गुरुवारी (दि. १२) नवा राजकीय ट्विस्ट दिला. सध्याची परिस्थिती पाहता दोन्ही शिवसेना एकत्र येतील, असे वाटत नाही; मात्र राजकारणात कधीही काहीही घडू शकते, असे सूचक विधान त्यांनी अलिबाग येथे पत्रकार परिषदेत केले. त्यामुळे शिवसेनेच्या संभाव्य एकत्रीकरणाबाबतच्या चर्चांना पुन्हा हवा मिळाली आहे.

राज्याचे पाणीपुरवठा मंत्री आणि शिवसेना (शिंदे गट) नेते गुलाबराव पाटील यांनी दोन्ही शिवसेना एकत्र •➤पान २ वर



बंद कंपन्यांना पुन्हा उभारी देणार

एमआयडीसी क्षेत्रातील बंद पडलेल्या कंपन्या पुन्हा सुरू करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महाडमधील बंद पडलेल्या २० कंपन्या अन्य उद्योजकांनी ताब्यात घेतल्या आहेत. याच धर्तीवर जिल्ह्यातील इतर बंद कंपन्यांची पाहणी करून त्या पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. जमीन संपादन होऊनही प्रकल्प सुरू न झालेल्या ठिकाणांची पुढील आठ दिवसांत पाहणी करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत. आगामी प्रकल्पांच्या सद्यःस्थितीचाही आढावा घेतला जाणार असल्याचे गोगावले यांनी सांगितले.

चौलचे वन उद्यान भकास!

अलिबागच्या वन विभागाचे देखभाल-दुरुस्तीकडे अक्षम्य दुर्लक्ष



| रायगड | प्रमोद जाधव |

पर्यटनाला चालना देण्यासाठी लाखो रुपये खर्चून उभारलेले चौल-भोवाळे येथील स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता वन उद्यान आज वन विभागाच्या दुर्लक्षामुळे भकास झाले आहे. एकेकाळी पर्यटक आणि स्थानिकांच्या गर्दीने गजबजणाऱ्या या उद्यानाची दुरवस्था झाली असून, खेळाचे साहित्य मोडकळीस आले आहे. झाडाझुडपांनी संपूर्ण परिसराला विळखा घातला आहे. चार वर्षांपासून देखभाल-दुरुस्तीअभावी उद्यानाची अवस्था बिकट झाली असताना वन विभागाने मात्र त्याकडे पाठ फिरवली आहे. •➤पान २ वर

- लाखो रुपयांचा खर्च पाण्यात
- पर्यटकांसह स्थानिकांमध्ये नाराजी

> चौल-भोवाळे परिसरात उभारण्यात आलेल्या वन उद्यानाची जमीन वन संरक्षित आहे. मागील काही वर्षांपूर्वी सामाजिक वनीकरण विभागाला सुशोभिकरणासाठी ही जागा दिली होती. सामाजिक वनीकरण विभागाने उद्यानासाठी खर्च केला होता. देखभाल दुरुस्तीची जबाबदारी सामाजिक वनीकरण विभागाची आहे.
> – मिलिंद राऊत, वनपरिक्षेत्र अधिकारी, अलिबाग

किरकोळ महागाई ६ टक्क्यांपार

| मुंबई | प्रतिनिधी |

आधीच वाढत्या खर्चाने त्रस्त असलेल्या सर्वसामान्यांच्या खिशाला आता महागाईचा आणखी मोठा फटका बसण्याची चिन्हे आहेत. अन्नधान्याच्या वाढत्या किमतींमुळे ऑक्टोबरमध्ये किरकोळ महागाईने तब्बल ६.०९ टक्क्यांवर झेप घेतली आहे. दोन वर्षांनंतर प्रथमच महागाईने सहा टक्क्यांचा टप्पा ओलांडला असून, रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेली ६ टक्क्यांची कमाल सहनशील मर्यादाही पार केली आहे. त्यामुळे घरखर्चाचे गणित बिघडण्याबरोबरच आगामी काळात व्याजदरवाढीची टांगती तलवारही सर्वसामान्यांवर कायम राहण्याची शक्यता आहे.

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी •➤पान २ वर

जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्व धोक्यात

| माणगाव | सलीम शेख |

ग्रामीण भागातील शिक्षणाचा आधार असलेल्या जिल्हा परिषद शाळांवरच आता टाळे लागण्याची वेळ आली आहे. माणगाव तालुक्यातील तब्बल ४५ शाळांमध्ये पाच किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी असल्याने त्यांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यंदा एक शाळा पटसंख्येअभावी बंद झाली असून, संपूर्ण रायगड जिल्ह्यातील ३६० शाळा बंद होण्याच्या संकटात सापडल्या आहेत. गावागावांत शिक्षणाचा दिवा पेटविणाऱ्या शाळाच विझण्याच्या मार्गावर असल्याने ग्रामीण शिक्षण व्यवस्थेच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

ऑक्टोबर २०२६ मधील शिक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार, रायगड जिल्ह्यातील •➤पान २ वर



- माणगावातील ४५ शाळा बंद होण्याच्या उंबरठ्यावर
- रायगडमधील ३६० शाळांवर संकट

शाळा वाचविण्याची जबाबदारी कोणाची?

जिल्हा परिषद शाळांनी ग्रामीण भागातील अनेक पिढ्या घडवल्या. याच शाळांमधून डॉक्टर, अभियंते, अधिकारी आणि शिक्षक निर्माण झाले. त्यामुळे पटसंख्या कमी झाली म्हणून शाळा बंद करणे हा एकमेव उपाय असू शकत नाही. दर्जेदार शिक्षण, पुरेसे शिक्षक, डिजिटल सुविधा आणि आधुनिक शिक्षणपद्धती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शिक्षण विभागाने स्वीकारली पाहिजे. ग्रामपंचायत, पालक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांनीही पुढाकार घेण्याची गरज आहे.

शेकापच्या मोर्चाचा दणका

- महसूल विभागाची कारवाईची हालचाल
- तहसीलदारांकडून उपविभागीय अधिकाऱ्यांना अहवाल सादर

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

पळस्पे येथील शेतकऱ्याच्या जमिनीची कथित फसवणूक करून १३ गुंठे जमीन लाटण्याच्या प्रयत्नाविरोधात शेतकरी कामगार पक्षाने काढलेल्या मोर्चाची अखेर महसूल प्रशासनाने दखल घेतली आहे. महसूल विभागाने वादग्रस्त जागेची प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठविला आहे. वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाला शेकापच्या आंदोलनानंतर जाग आली असून, शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी शेकाप शेतकरी सभेचे जिल्हाध्यक्ष अनिल ढवळे यांनी पुकारलेल्या लढ्याला यश मिळताना दिसत आहे.

पनवेल तालुक्यातील पळस्पे येथील पांडुरंग बाळू पाटील उर्फ घोरपडे या शेतकऱ्याची सर्व्हे क्रमांक ७९/१ मध्ये १८३ गुंठे जमीन आहे. याच गटात बेडेकर यांची ४०.५ आर मिळकत होती. बेडेकर यांनी १९८३ मध्ये ही मिळकत पळस्पे येथील शेतकरी नाना भगत यांना विकली. भगत यांनी जमिनीची मोजणी न करताच •➤पान २ वर

> शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी रायगड जिल्ह्यात धोरणात्मक शेतकरी सभा सेल निर्माण केला. या संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी काम करण्याची संधी मिळाली. शेकाप नेते बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली अन्यायग्रस्त शेतकऱ्यांसाठी सतत लढण्याची भूमिका घेतली. त्यातूनच पळस्पे येथील शेतकऱ्याच्या प्रश्नाला न्याय मिळण्याच्या दिशेने पाऊल पडले आहे. अन्याय होणाऱ्या शेतकऱ्यांनी शेकाप कार्यालयाशी संपर्क साधावा. शेकाप शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. – अनिल ढवळे, अध्यक्ष, रायगड जिल्हा शेतकरी सभा, शेकाप

रायगडमधील पहिला मानांकित समुद्रकिनारा | स्वच्छता, संवर्धनाच्या निकषांवर शिक्कामोर्तब

श्रीवर्धन बीचला आंतरराष्ट्रीय 'ब्लू फ्लॅग'चा बहुमान

| मुंबई | प्रतिनिधी |

रायगडच्या पर्यटन शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय 'ब्लू फ्लॅग' पुरस्कार जाहीर झाला असून, हा बहुमान मिळवणारा श्रीवर्धन हा रायगड जिल्ह्यातील पहिला समुद्रकिनारा ठरला आहे. स्वच्छता, समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता, पर्यावरण संवर्धन, पर्यटकांची सुरक्षितता आणि आवश्यक सुविधांच्या आंतरराष्ट्रीय निकषांची पूर्तता केल्याने श्रीवर्धनच्या किनाऱ्याला ही मान्यता मिळाली आहे. या पुरस्कारामुळे रायगडच्या पर्यटनाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला हे मानांकन मिळावे, यासाठी गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने प्रयत्न सुरू होते. समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता आणि पर्यावरणाचा दर्जा उंचावण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात आल्या. पाण्याची नियमित तपासणी, कचरा व्यवस्थापन, स्वच्छतागृहे, प्रथमोपचार, आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था, पर्यावरणविषयक जनजागृती तसेच दिव्यांगांसाठी आवश्यक सुलभ सुविधा अशा बाबींचे मूल्यमापन •➤पान २ वर

कोकणातील तीन समुद्रकिनाऱ्यांचा गौरव

महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्रासाठीही ही महत्त्वाची कामगिरी ठरली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर आणि लाडघर, तसेच रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन या तीन समुद्रकिनाऱ्यांना 'ब्लू फ्लॅग'चा अंतिम आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. डेन्मार्कच्या फाऊंडेशन फॉर एन्व्हायर्नमेंटल एज्युकेशन या संस्थेकडून लवकरच या किनाऱ्यांना अधिकृत ध्वज प्रदान करण्यात येणार आहेत.

पर्यटनपूरक व्यवसायांना चालना

महाराष्ट्राला लाभलेल्या सुमारे ८७८ किलोमीटरच्या किनारपट्टीला या मानांकनामुळे जागतिक ओळख मिळण्यास मदत होणार असून, कोकणातील पर्यटन, स्थानिक रोजगार आणि पर्यटनपूरक व्यवसायांना नवी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.



भाऊबीजेचा प्रवास ठरला काळ

■ उभ्या ट्रेलरला स्वीफ्ट कारची मागून धडक

■ आजोबा आणि १८ महिन्यांच्या नातीचा मृत्यू, चौघे गंभीर



। पनवेल । प्रतिनिधी ।

भाऊबीज साजरी करण्यासाठी मुंबईला निघालेल्या कुटुंबावर काळाने घाला घातला. पनवेलजवळील नांदगाव येथे रस्त्यावर बंद अवस्थेत उभ्या असलेल्या ट्रेलरला स्विफ्ट डिझायर कारने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात आजोबा अरुण मारुती ढावरे (६५) आणि त्यांची अवघ्या १८ महिन्यांची नात रेखा प्रदीप बनसोडे यांचा मृत्यू झाला, तर एकाच कुटुंबातील अन्य चार जण गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पंढरपूर आणि सांगोला येथील ढावरे व बनसोडे कुटुंबातील सदस्य भाऊबीज साजरी करण्यासाठी स्विफ्ट डिझायर कारने मुंबईतील कुर्ला येथे राहणाऱ्या नातेवाईकांकडे जात होते. पळस्पे-जेएनपीटी मार्गावरील नांदगावजवळ जेएनपीटीकडे जाणाऱ्या मार्गिकेवर एमएच ४६ बीव्ही ४६१८ क्रमांकाचा ट्रेलर बंद अवस्थेत उभा होता. ट्रेलरच्या मागील बाजूस पुरेसे इशारादर्शक फलक किंवा सुरक्षिततेच्या उपाययोजना नसल्याने मोटारचालकाला त्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे भरधाव कार थेट ट्रेलरवर आदळून त्याच्या खाली घुसली.

या भीषण धडकेत अरुण मारुती ढावरे आणि चिमुकली रेखा बनसोडे यांचा जागीच मृत्यू झाला. तर प्रदीप गौतम बनसोडे (४०), दीपिका प्रदीप बनसोडे (३०), वेदिका प्रदीप बनसोडे (१२) आणि ज्योत्सना अरुण ढावरे (५८) हे गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाजीराव कुंभार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ, पोलीस उपनिरीक्षक सुशांत दुबे, हजरत पठाण आणि गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच अपघातामुळे विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत करण्यात आली.

अपघातग्रस्त ट्रेलर नवकार रोड लाईन्स कंपनीचा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. मात्र, अपघातानंतर जखमींना मदत न करता आणि पोलिसांना माहिती न देता ट्रेलरचालक घटनास्थळावरून पसार झाला. याप्रकरणी ट्रेलरचालकाविरुद्ध दोघांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टोरंटच्या जंगलतोडीविरोधात भाजप पदाधिकाऱ्याचा राजीनामा

■ सरचिटणीस मिनेश मसणे यांचा पदासह प्राथमिक सदस्यत्वालाही रामराम



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील साईडोंगर परिसरात टोरंट कंपनीच्या प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पासाठी सुरू असलेल्या जंगलतोडीच्या विरोधात भाजपला आणखी एक धक्का बसला आहे. पर्यावरणाचा ऱ्हास सहन होत नसल्याचे सांगत भाजप युवा मोर्चाचे जिल्हा कोषाध्यक्ष आणि कर्जत तालुका सरचिटणीस मिनेश मसणे यांनी पक्षातील पदांसह प्राथमिक सदस्यत्वाचाही राजीनामा दिला आहे.

मसणे यांनी आपला राजीनामा समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केला आहे. विकासाच्या विरोधात नसून उद्योग, ऊर्जा आणि रोजगारनिर्मिती आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, विकासाच्या नावाखाली सह्याद्रीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होत असेल, तर त्याचे समर्थन करता येणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

सह्याद्री हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा, संस्कृतीचा आणि इतिहासाचा भाग असून त्याची होणारी हानी हा भावी पिढ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. पर्यावरण, सह्याद्री आणि स्थानिकांच्या हक्कांसाठी स्वतंत्रपणे आवाज उठवणार असल्याचे मसणे यांनी राजीनामा पत्रात म्हटले आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

विनापरवाना रेती वाहतूक ५.१० लाखांचा ट्रॅक्टर जप्त

■ सावरगाव हद्दीत दोन ब्रास रेतीची चोरीची वाहतूक

। म्हसळा । प्रतिनिधी ।

शासनाचा कोणताही गौण खनिज वाहतूक परवाना नसताना सुमारे दोन ब्रास रेतीची वाहतूक करणारा लाल रंगाचा महिंद्रा ट्रॅक्टर म्हसळा पोलिसांनी पकडला. या कारवाईत ५ लाख १० हजार रुपये किमतीचा ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आला असून, चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

७ नोव्हेंबर रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास म्हसळा तालुक्यातील सावरगाव हद्दीत ही घटना उघडकीस आली. आरोपी आपल्या ताब्यातील महिंद्रा कंपनीचा लाल रंगाचा ट्रॅक्टर (क्र. एमएच ०६ सीयू ४६९५) मधून सुमारे दोन ब्रास रेती भरून सावर ते म्हसळा रस्त्याने म्हसळ्याच्या दिशेने जात होता. त्यावेळी शासनाचा कोणताही गौण खनिज वाहतूक परवाना नसताना रेतीची वाहतूक होत असल्याचे आढळले. ही रेती कोठून तरी चोरून आणल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार सुवरे करीत आहेत.

वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्ह्यात वाहतुकीचे नियम धाब्यावर बसविणाऱ्या वाहनचालकांविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. ११ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियमभंग करणाऱ्या एकूण १९२ जणांवर कायदेशीर कारवाई केली. या कारवाईत संबंधितांकडून २ लाख ९ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

बोटीच्या वादातून जीवघेणा हल्ला

मुरुड : बोटीबाबत विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही, या किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून राजपुरी जेट्टीवर एका कामगारावर काठीने डोक्यात वार करून गंभीर जखमी करण्यात आले. तसेच कोयता दाखवून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी मुरुड पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. ही घटना ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास राजपुरी जेट्टी येथे घडली. फिर्यादी यांच्या मालकीच्या आयडी राजपुरी प्रवासी बोटीवर जखमी कामगार राजपुरी गोदी येथे काम करत होता. त्यावेळी आरोपी आणि त्याचा मुलगा मच्छिमारीची बोट समुद्रात घेऊन जात असताना त्यांनी बाजूला असलेली बोट कोणाची आहे, अशी विचारणा कामगाराकडे केली. त्यावर आपल्याला काही माहिती नसल्याचे त्याने सांगितले. याचा राग आल्याने दोन्ही आरोपींनी संगनमत करून त्याला शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपी क्रमांक एक याने स्वतःच्या बोटीतील काठीने कामगाराच्या डोक्यात वार करून गंभीर दुखापत केली. तसेच कोयता हातात घेऊन जीवे मारण्याची धमकी दिली.

पान १ वरुन

महिलेची हत्या करून दागिने लंपास

आणि ओढणीने गळा आवळला. यात तिचा मृत्यू झाला. त्यानंतर आरोपीने तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र आणि हातातील तीन सोन्याच्या बांगड्या जबरदस्तीने चोरून नेल्या. याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सचिन हिरे पुढील तपास करीत आहेत.

दोन्ही शिवसेना एकत्र येणार?

येण्याबाबत वक्तव्य केले होते. यावर गोगावले यांना विचारले असता, गुलाबराव पाटील यांना कदाचित त्याची भनक लागली असावी, असे ते म्हणाले. राजकारणात सकाळचा संध्याकाळी आणि संध्याकाळचा सकाळी कुठे असेल, हे सांगता येत नाही. त्यामुळे भविष्यात काय घडेल, हे सांगता येणार नाही. मात्र, सध्या दोन्ही शिवसेना एकत्र येण्याचे चित्र दिसत नाही. याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा किंवा माहिती आपल्याला मिळालेली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, रायगडमध्ये महायुतीतील शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातील संघर्ष पुन्हा उफाळला आहे. टोरंट प्रकल्प आणि निवडणुकीतील मदतीवरून आमदार अनिकेत तटकरे आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्यात शाब्दिक युद्ध सुरू आहे. या वादावर बोलताना गोगावले यांनी प्रकल्पांचे समर्थन केले. प्रकल्प उभे राहिले तरच रोजगार निर्माण होतील. वृक्षतोडीच्या बदल्यात वृक्षलागवड केली जाईल. जिल्ह्यात बीज आणि पाणी उपलब्ध करून दिले नाही, तर उद्योग गुजरातसह अन्य राज्यांत जातील. उद्योग आणि धरणे नसतील तर सुबत्ता कशी येणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

खासदार सुनील तटकरे यांच्या उमेदवारीसाठी शिवसेना नेते रामदास कदम यांनी पुढाकार घेतला होता आणि त्यांच्यासाठी कामही केले होते, असे गोगावले यांनी सांगितले. महायुतीतील घटक पक्षांमधील वाद तात्त्विक असले, तरी प्रत्येकाने युतीधर्म पाळला पाहिजे, असा अप्रत्यक्ष टोला त्यांनी तटकरेंना लगावला.

जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्व धोक्यात

३६० शाळांमध्ये विद्यार्थीसंख्या अत्यल्प आहे. त्यापैकी २५ शाळांना अलीकडच्या काळात अधिकृतपणे टाळे लागले आहे. रायगड जिल्हा परिषद अंतर्गत एकूण २,६०३ प्राथमिक शाळा असून, प्रत्यक्ष सुरू असलेल्या शाळांची संख्या सुमारे २,५०२ असल्याचे सांगितले जाते. माणगाव तालुक्यात १५० ते १८० हून अधिक जिल्हा परिषद शाळा असून, त्यांचे कामकाज २८ केंद्रांमार्फत चालते. यातील ४५ शाळा बंद होण्याच्या धोक्यात आहेत.

कमी पटसंख्येची झळ जिल्ह्यातील इतर तालुक्यांनाही बसली आहे. महाडमध्ये सर्वाधिक ९५, पोलादपूरमध्ये ४६, रोह्यात ३०, तर पेण आणि तळा तालुक्यांत प्रत्येकी २५ शाळा संकटात आहेत. खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे पालकांचा वाढता कल, ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर आणि जन्मदरातील घट यामुळे जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या घसरत आहे. मात्र, यासाठी केवळ पालकांना जबाबदार धरून चालणार नाही. शाळांमधील अपुऱ्या सुविधा, शिक्षकांची कमतरता आणि आधुनिक शिक्षणपद्धतीचा अभाव यांचाही गांभीर्याने विचार करावा लागणार आहे.

४५ शाळांची यादी गुलदस्त्यात!

माणगाव तालुक्यातील ४५ शाळांची गावनिहाय अधिकृत यादी अद्याप जाहीर झालेली नाही. पोर्टलवर काही शाळांची पटसंख्या शून्य दाखविण्यात आली आहे. प्रत्यक्षात विद्यार्थी नसल्याने ही स्थिती आहे की ऑनलाइन नोंदणीतील त्रुटीमुळे आकडेवारी बदलली आहे, याची पडताळणी सुरू आहे. गटशिक्षणाधिकारी स्तरावर प्रत्यक्ष पाहणी झाल्यानंतरच अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

किरकोळ महागाई ६ टक्क्यांपार

मंत्रालयाने गुरुवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाई सप्टेंबरमधील ५.५४ टक्क्यांवरून ऑक्टोबरमध्ये ६.०९ टक्क्यांवर पोहोचली. अन्नधान्याच्या किमतीतील वाढ आणि प्रतिकूल बेस इफेक्ट यामुळे महागाईचा वेग वाढला आहे. सलग पाचव्या महिन्यात महागाई चार टक्क्यांच्या उद्दिष्टापेक्षा अधिक राहिली आहे.रिझर्व्ह बँकेने महागाई नियंत्रणासाठी चार टक्क्यांचे उद्दिष्ट निश्चित केले असून, दोन ते सहा टक्के अशी सहनशील मर्यादा ठेवली आहे. मात्र, ऑक्टोबरमधील आकडेवारीने ही कमाल मर्यादाही ओलांडली आहे. त्यामुळे महागाई रोखण्यासाठी काय भूमिका घेणार, याकडे अर्थजगताचे लक्ष लागले आहे. २ ते ४ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या पतधोरण समितीच्या बैठकीत व्याजदरांबाबत महत्त्वाचा निर्णय होण्याची शक्यता आहे.

आरबीआयच्या अंदाजानुसार, ऑक्टोबर ते डिसेंबर २०२६ या तिमाहीत महागाई सरासरी सहा टक्के राहू शकते. जानेवारी ते मार्च २०२७ मध्ये ती ५.७ टक्के, तर एप्रिल ते जूनमध्ये ५.६ टक्के राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे आगामी काही महिने महागाईचा दबाव कायम राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, एकीकडे महागाईचा आलेख चढत असताना भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदरही मजबूत आहे. एप्रिल ते जून २०२६ या तिमाहीत विकासदर ७.८ टक्के नोंदविण्यात आला. जुलै ते सप्टेंबर तिमाहीतही विकासदर जवळपास याच पातळीवर राहण्याचा अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे. मात्र, आर्थिक विकासाचा वेग कायम ठेवताना महागाईला लगाम घालण्याचे दुहेरी आव्हान समोर उभे राहिले आहे.

श्रीवर्धन बीचला आंतरराष्ट्रीय 'ब्लू फ्लॅग'चा बहुमान

करण्यात आले. या सर्व निकषांवर पात्र ठरल्यानंतर श्रीवर्धनला अंतिम आंतरराष्ट्रीय मान्यता जाहीर झाली आहे.

डेन्मार्कस्थित फाऊंडेशन फॉर एन्व्हायर्नमेंटल एज्युकेशन या संस्थेमार्फत 'ब्लू फ्लॅग' मानांकन दिले जाते. या मानांकनामुळे श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याची आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावरील ओळख अधिक मजबूत होणार आहे. देशी-विदेशी पर्यटकांची संख्या वाढण्यासह स्थानिक पर्यटन व्यवसाय, रोजगार आणि पूरक उद्योगांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे. रायगडच्या किनारपट्टी पर्यटनासाठी ही महत्त्वपूर्ण उपलब्धी मानली जात आहे.

शेकापच्या मोर्चाचा दणका

२६ जुलै १९९४ रोजी पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात १५ पानी खरेदीखत तयार करून ४०.५ आर क्षेत्राची मिळकत शकुंतला सामंत यांना विकली. त्यानंतर १७ जून २००६ रोजी शकुंतला सामंत यांनी विनामोबदला बक्षीसपत्राद्वारे ही जमीन मनिषा सामंत आणि सुहास सामंत यांना दिली. सुहास सामंत यांनी जमिनीचे सर्वेक्षण करून सातबारा उताऱ्यात बदल घडवून आणल्याचा आरोप आहे.

पांडुरंग पाटील यांच्या अज्ञानाचा फायदा घेत सर्व्हे अधिकारी आणि सामंत यांनी कोऱ्या कागदावर सह्या घेतल्या आणि मूळ ४०.५ आरऐवजी ५३.१० आर क्षेत्राची नोंद करून जमीन लाटण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पांडुरंग पाटील यांनी सामंत यांच्याशी जमिनीचा कोणताही व्यवहार केला नसताना त्यांच्या मिळकतीतील १३ गुंठे जमीन हडपण्याचा प्रयत्न झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणाची महसूल विभागाकडे वारंवार तक्रार करूनही पनवेल तहसीलदारांनी दुर्लक्ष केल्याने अखेर शेकापने आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.

शेकापचे नेते माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकाप शेतकरी सभा रायगड जिल्हाध्यक्ष अनिल ढवळे, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शुक्रवारी (दि. ३० ऑक्टोबर) पनवेल तहसील कार्यालयासमोर मोर्चा काढला होता. सातबारा उताऱ्यावरील कमी झालेली जमीन पूर्ववत करून शेतकऱ्याच्या नावाने योग्य सातबारा तयार करावा, यासह विविध मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या होत्या. या आंदोलनानंतर महसूल विभागाने प्रत्यक्ष जागेची पाहणी करून अहवाल उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सादर केला आहे.

शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या विचारातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी शेकाप शेतकरी सभेची स्थापना करण्यात आली आहे. या संघटनेच्या माध्यमातून अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा सुरूच राहणार असल्याचे अनिल ढवळे यांनी स्पष्ट केले.

चौलचे वन उद्यान भकास!

त्यामुळे लाखो रुपयांचा खर्च अक्षरशः पाण्यात गेला असून, पर्यटकांसह स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.चौल परिसर धार्मिक, ऐतिहासिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. विविध धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी येथे पर्यटकांची सतत वर्दळ असते. डिसेंबर महिन्यात दत्तजयंतीनिमित्त भोवाळे येथे श्रीदत्तांच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या पार्श्वभूमीवर पर्यटनाला चालना मिळावी आणि वनांचे महत्त्व स्थानिकांना समजावे, या उद्देशाने सुमारे सात वर्षांपूर्वी सामाजिक वनीकरण विभागामार्फत चौल-वावे मार्गालगत हे जैवविविधता वन उद्यान उभारण्यात आले होते.

या उद्यानात विविध प्रकारच्या वनस्पती, फुलझाडांची लागवड करण्यात आली होती. ऐतिहासिक स्थळांसह वनसंपदेची माहिती पर्यटकांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली होती. लहान मुलांसाठी खेळाचे साहित्य, विविध प्राणी-पक्ष्यांचे पुतळे आणि निसर्गरम्य परिसरामुळे हे उद्यान पर्यटकांसह स्थानिकांचे आकर्षण ठरले होते. सकाळी आणि संध्याकाळी फिरण्यासाठी येणाऱ्यांची येथे मोठी गर्दी होत असे. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांसाठी हे उद्यान विरंगुळ्याचे हक्काचे ठिकाण बनले होते.

मात्र, सुरुवातीचा उत्साह आणि आकर्षण वन विभागाला टिकवता आले नाही. गेल्या चार वर्षांपासून देखभाल-दुरुस्तीचा अभाव असल्याने उद्यानाची दुरवस्था झाली आहे. खेळाचे साहित्य खराब झाले असून, गवत आणि झुडपांनी संपूर्ण परिसर व्यापला आहे. उद्यानात जाण्यासाठी पर्यटकांचा ओघ थांबला असून, एकेकाळी गजबजणारे हे पर्यटनस्थळ आता ओस पडले आहे. पर्यटनवाढीसाठी उभारलेल्या उद्यानाची अशी अवस्था होणे ही वन विभागाच्या नियोजनशून्य कारभाराची पावतीच आहे. लाखो रुपये खर्चून उभारलेले उद्यान वापराविना पडून असल्याने सार्वजनिक पैशांचा अपव्यय झाला आहे. पर्यटनवाढीचा दावा करणाऱ्या वन विभागाने आता तरी या उद्यानाची दुरुस्ती करून ते पुन्हा पर्यटकांसाठी खुले करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

बाथरूममध्ये गांजाचा साठा

आढळले. पोलिसांनी ४.२५५ किलो गांजा जप्त केला असून, त्याची किंमत २ लाख १२ हजार ७०० रुपये आहे. याशिवाय इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, प्लास्टिक पाऊच, स्टेपलर आणि पिना असा साहित्यसाठाही हस्तगत करण्यात आला. आरोपी घरातून गांजाच्या लहान पुड्या तयार करून विक्री करत असल्याचा पोलिसांना संशय आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, हवालदार प्रकाश पाटील, पोलीस नाईक सम्राट डाकी, पोलीस शिपाई अभिजित गडकरी, विशाल दूध आणि महिला पोलीस शिपाई सुशीला पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला गांजा कोठून मिळाला आणि त्याची विक्री कोणाला केली जाणार होती, याचा तपास पोलीस करीत आहेत. या प्रकरणातून अमली पदार्थांच्या पुरवठा साखळीतील अन्य व्यक्तींचा सहभाग उघड होण्याची शक्यता आहे.

ट्रकखाली चिरडून दुचाकीस्वाराचा मृत्यू

यावेळी ट्रकच्या डाव्या बाजूच्या टायरजवळील मडगार्डचा स्कूटरला धक्का लागला. त्यामुळे स्कूटरवरील दोघांचा तोल जाऊन ते रस्त्यावर पडले. यावेळी स्कूटर चालकाचे डोके ट्रकच्या चाकाखाली आल्याने त्याला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा मृत्यू झाला.

याप्रकरणी दादर (सागरी) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रेणी पोलीस उपनिरीक्षक सुधाकर पाटील करीत आहेत.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे बामणोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल रामचंद्र हरि म्हात्रे यांच्या ताबेकब्जात वहिवाटीत असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

अ. क्र.	मौजे	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रू.पैसे)
१	बामणोली ता.अलिबाग जि.रायगड	१६९	०-०५-००	०.७८

सदर मिळकत आमचे अशिल यांची फसवणूक करून श्री. अद्वैत राकेश चव्हाण यांनी रजिस्ट्रर्ड खरेदीखत करून त्यांच्या नावे ७/१२ सदरी दाखल केलेली आहे. आमचे अशिलांस दिलेला चेक हा न वटता परत आलेला आहे. अद्वैत राकेश चव्हाण यांनी आमचे अशिलांची फसवणूक करून सदरची मिळकत त्रयस्थ इसमास विक्री करत असल्याबाबतची माहिती आमचे अशिलांस मिळाली असल्याने सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचे खरेदी-विक्री व्यवहार करू नये याकरीता ही जाहीर नोटीस देत आहोत. आमचे अशिल हे अद्वैत राकेश चव्हाण यांच्याविरूद्ध योग्य ती दिवाणी व फौजदारी कायदेशीर कारवाई करणार आहेत.

तरी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर कोणीही सदर मिळकतीची खरेदी-विक्री अथवा इतर कोणताही व्यवहार केल्यास ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे. सदरहू नोटीस कोणाचीही फसवणुक होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

अलिबाग
दिनांक : १२/११/२०२६

सही/-
(ॲड.व्ही.डी.कळके)
वकिल

जाहीर सुचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील कु. अनय विनायक म्हसकर राहणार फ्लॅट-७ कृष्ण छाया अपार्टमेंट, दामोदर कॉलनी, लोणावळा, पुणे ४१०४०१ यांनी खालील नमूद शेतजमिन मिळकत त्याचे मालक १) श्रीमती मेधा माधव सुगवेकर २) कु.निखिल माधव सुगवेकर दोघेही राहणार रा. नेरळ ता. कर्जत जि. रायगड यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

मौजे. नेरळ तालुका- कर्जत, जिल्हा - रायगड येथील शेतजमिन मिळकत

सर्वे नं	हिस्सा नं	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु. पै.
३९९	१	३.११.००	३१.१०

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारांस हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून काणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. दिनांक १३ नोव्हेंबर २०२६

ॲड प्रांजली प्रथमेश मोरे
एम.ए.एल्एल् बी.
अधिवक्ता एन्रोलमेंट क्रमांक (एमएएच/५०८१/२०२१)
७, जय नारायण कॉम्प्लेक्स,
अंबिका नाका, मु.पो. नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१

जाहीर नोटिस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे आवास, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाची जमीन व घर मिळकती, मिळकतींचे विद्यमान मालक मे. दारंमिल्ला फॅशन्स प्रा. लि. तर्फे डायरेक्टर उर्मिला तल्यारखान तसेच सामाईक मालक उर्मिला दाराब तल्यारखान वगैरे यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा विक्रीचा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

क्र.	मालक	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै)
१.	मे.दारंमिल्ला फॅशन्स प्रा. लि. तर्फे डायरेक्टर उर्मिला तल्यारखान	२९३/१	०-७१-५० (पैकी ०-४०-०० बिनशेती)	७.५५/-
२.	मे. दारंमिल्ला फॅशन्स प्रा.लि.तर्फे डायरेक्टर उर्मिला तल्यारखान	३०५	०-२६-१० पो.ख. ०-०३-३० एकूण ०-२९-४०	६.४९/-
३.	उर्मिला दाराब तल्यारखान दाराब आर तल्यारखान	२९३/२	१-००-०० पो.ख.०-२५-९० एकूण १-२५-९०	११.१०/-
४.	उर्मिला दाराब तल्यारखान दाराब आर तल्यारखान	३०२		

सदरहू वर वर्णन केलेल्या जमीन मिळकती तसेच मिळकत क्र.३ व क्र.४ यामधील उर्मिला दाराब तल्यारखान यांचा असलेला अविभाज्य सामाईक हिस्सा तसेच त्यामध्ये असलेल्या ग्रामपंचायत आवास घर मिळकती (१) मिळकत क्र.३७२, (२) मिळकत क्र. ८४०, (३) मिळकत क्र. ८४१, (४) मिळकत क्र.८९४, (५) मिळकत क्र. ८९५, (६) मिळकत क्र. ९८०, (७) मिळकत क्र.११३९, (८) मिळकत क्र. ११५६ हा या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वर वर्णन केलेल्या जमीन व घर मिळकती विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाच्या, वहिवाटीच्या, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीं संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१३.११.२०२६

ॲड. मिलिंद चव्हाण
८. आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

इमारत नवी, पण कारभाराला तडे!

।। भिंतींना चिरा, लिफ्ट बंद, लाद्या उखडल्या ।। वर्षभरातच नगरपरिषदेच्या बांधकामाचा बोजवारा

। उरण । प्रतिनिधी ।

जनतेच्या कररूपी पैशातून कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेल्या उरण नगरपरिषदेच्या नव्या इमारतीची वर्षभरातच दुरवस्था होऊ लागल्याने बांधकामाच्या गुणवत्तेचा पंचनामा सुरू झाला आहे. इमारतीच्या भिंतींना पडलेल्या चिरा, अनेक महिन्यांपासून बंद असलेली लिफ्ट आणि इमारतीसमोरील उखडू लागलेल्या लाद्या पाहता विकासाच्या नावाखाली नेमके काय बांधले, असा संतप्त सवाल उरणकरांकडून केला जात आहे. तसेच, जनतेच्या पैशांचा चुराडा करून ठेकेदाराचे उखळ पांढरे झाले, असा संशयही व्यक्त होत आहे.



उरण नगरपरिषदेच्या नव्या इमारतीचा लोकार्पण सोहळा सप्टेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडला होता. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत इमारतीच्या उद्घाटनाचा गाजावाजा करण्यात आला. मात्र, उद्घाटनाचा थाट ओसरताच इमारतीच्या बांधकामातील त्रुटी समोर येऊ लागल्याने आता या विकासकामाचे पितळ उघडे पडत आहे. या नव्या इमारतीच्या भिंतींना तडे जाणे, लिफ्ट बंद पडणे आणि लाद्या उखडणे या बाबी किरकोळ नसून, बांधकामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या आहेत. विशेष म्हणजे या इमारतीचे बांधकाम तत्कालीन प्रशासकीय काळात पूर्ण झाल्याची माहिती समोर येत आहे.

माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार, इमारतीचे बांधकाम आणि संबंधित कामे एकाच ठेकेदाराला देण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे इमारतीच्या बांधकामावेळी कामाच्या गुणवत्तेवर देखरेख करणारे अधिकारी काय करीत होते? बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देताना तांत्रिक तपासणी झाली होती का? अंदाजपत्रकाप्रमाणे साहित्य वापरण्यात आले होते का? ठेकेदाराची बिले मंजूर करताना गुणवत्तेचे निकष तपासले होते का, असे प्रश्न उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रकाराबाबत उरण नगरपरिषदेतील इतर लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्ष आणि त्यांचे पदाधिकारी यांनी धारण केलेले मौनही आता चर्चेचा विषय बनले आहे. जनतेच्या पैशातून उभारलेल्या इमारतीला वर्षभरातच तडे जात असताना जनतेचे प्रतिनिधी आणि राजकीय पक्षांचे पदाधिकारी चिडीचूप का? या मौनातून नेमके कोणाला अभय दिले जात आहे? असा सवाल उपस्थित होत आहे. या मौनामुळे अनेकांच्या मनात संशय निर्माण होत असून, या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप आहे का, याचीही चर्चा सुरू झाली आहे. दुसरीकडे, ठेकेदाराने या कामातून कोट्यवधी रुपयांची माया जमवली असून, ठेकेदार मालामाल झाल्याचा आरोप जनतेकडून केला जात आहे. मात्र, या आरोपांची सत्यता अधिकृत चौकशी आणि आर्थिक व तांत्रिक तपासणीतूनच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे ठेकेदाराला किती रक्कम अदा करण्यात आली, कामाचा प्रत्यक्ष दर्जा काय होता आणि संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्या आधारावर कामाला मंजुरी दिली, याचा संपूर्ण हिशेब जनतेसमोर येणे आवश्यक असल्याचे बोलले जात आहे.

जनतेच्या पैशांची उधळपट्टी?

जनतेच्या पैशांची उधळपट्टी झाली असेल, तर त्याचा जाब विचारणार कोण? लोकप्रतिनिधींचे मौन, राजकीय पक्षांची शांतता आणि प्रशासनाची निष्क्रियता यामुळे संशयाचे धुके अधिक गडद होत आहे. भिंतींना पडलेले तडे सिमेंटने बुजवता येतील; परंतु, भ्रष्टाचाराच्या आरोपांवर केवळ मलमपट्टी करून चालणार नाही. उद्घाटनाच्या वेळी टाळ्यांचा कडकडाट करणाऱ्यांनी आता इमारतीच्या दुरवस्थेवरही तोंड उघडावे. नगरविकास विभागाने कागदी घोडे नाचविण्याऐवजी स्वतंत्र फेरऑडिट करून सत्य जनतेसमोर आणावे. ठेकेदार असो वा अधिकारी, दोष सिद्ध झाल्यास कोणालाही पाठीशी घालू नये. उरणकरांना आता आश्वासन नको, जनतेच्या पैशांचा पक्का हिशेब हवा.

नगरविकास विभागाकडे तक्रार

या प्रकरणी आई फाऊंडेशन या सामाजिक संस्थेने नगरविकास विभागाकडे तक्रार दाखल केली आहे. इमारतीचे स्वतंत्र तज्ज्ञ समितीमार्फत तांत्रिक फेरऑडिट करावे, बांधकामाचे अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका, गुणवत्ता तपासणी अहवाल, ठेकेदाराला अदा केलेली बिले आणि काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र यांची सखोल पडताळणी करावी, बंद लिफ्टची चौकशी करावी आणि दोष सिद्ध झाल्यास संबंधित ठेकेदारासह जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवडक



बोर्लीपंचतन परिसरात घाणीचे साम्राज्य

दिघी : श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील दत्तमंदिर परिसरात सध्या अस्वच्छतेचे गंभीर चित्र पाहायला मिळत आहे. परिसरात साचलेल्या कचऱ्यामुळे आणि पसरलेल्या दुर्गंधीमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. बोर्लीपंचतन ते श्रीवर्धन या मुख्य मार्गालगत असलेले हे ठिकाण निसर्गरम्य वातावरणामुळे नागरिकांच्या विश्रांतीचे आणि सकाळच्या फेरफटक्याचे आवडते ठिकाण आहे. मात्र, सध्याच्या अस्वच्छतेमुळे या परिसराच्या प्रसन्नतेवरच विरजण पडले आहे. दत्तमंदिरात दर्शनासाठी येणारे भाविक, सकाळी मॉर्निंग वॉकसाठी येणारे आबालवृद्ध तसेच या मार्गावरून प्रवास करणारे नागरिक यांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. शांत वातावरणामुळे मनाला समाधान देणारा हा परिसर आता घाणीच्या विळख्यात सापडला आहे. झाडांच्या सावलीत काही क्षण विश्रांतीसाठी थांबणाऱ्या नागरिकांसाठी हे ठिकाण महत्त्वाचे होते. मात्र, आता येथे थांबणे तर दूरच, परिसरातून जातानाही नाक मुठीत धरावे लागत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. मुख्य रस्त्यालगत आणि धार्मिक स्थळाच्या परिसरात अशा प्रकारे अस्वच्छता पसरत असल्याने सार्वजनिक स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मंदिर परिसराचे धार्मिक महत्त्व आणि नागरिकांची नियमित वर्दळ लक्षात घेता येथे स्वच्छता राखणे आवश्यक आहे. येथे कचरा टाकणाऱ्यावर कडक कारवाई तसेच स्वच्छतेचे नियोजन आणि परिसरात पुन्हा घाण होणार नाही यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



'झाडांचे पुनर्वसन होणे गरजेचे'

कोलाड : मुंबई-गोवा महामार्गावरील चौपदरी करणाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. या चौपदरीकरणासाठी रस्त्याच्या दुतर्फी असणाऱ्या लाखो लहान-मोठ्या झाडांची कत्तल करण्यात आली. कत्तल केलेल्या झाडांच्या जागी नवीन झाडांचे पुनर्वसन करणे गरजेचे होते; परंतु, त्याला १८ वर्षे झाली असून, अद्याप या चौपदरीकरणाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला वृक्षारोपण करण्यात आलेले नाही. त्यामुळे भविष्य काळात परिस्थिती कठीण होईल, हे या वर्षाच्या दुष्काळाच्या परिस्थितीवरून दिसून येत असल्याचे पर्यावरण तज्ज्ञांकडून बोलले जात आहे. दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे तापमाणात वाढ होतांना दिसत असून, दोन-तीन वर्षांपूर्वी उच्च तापमानात रायगड जिल्ह्यातील भिरा या ठिकाणी जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या तापमानाची नोंद झाली होती. त्यात भर म्हणून जंगलांना लावण्यात आलेले वणवे यामुळे जंगलेच्या जंगले नष्ट होत आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस सर्वत्र उष्म्याचा जोर वाढत आहे.

उरणमध्ये परप्रांतीय मतांचा दबाव?

उरण : तालुक्यात झपाट्याने वाढणारे नागरीकरण, औद्योगिकीकरण आणि परप्रांतीय नागरिकांचे वाढते वास्तव्य यामुळे येथील सामाजिक आणि राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल होत असल्याचे चित्र दिसत आहे. स्थानिकांच्या तुलनेत परप्रांतीय मतदारांची संख्या अधिक असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. त्यामुळेच स्थानिकांच्या ज्वलंत प्रश्नांवर आवाज उठविण्याऐवजी राजकीय पक्ष आणि त्यांचे पदाधिकारी मतांच्या गणितात अडकले आहेत का, असा सवाल उपस्थित होत आहे. उरण तालुका हा भूमिपुत्रांच्या त्यागातून उभा राहिलेला औद्योगिक परिसर आहे. जेएनपीए बंदर, ओएनजीसी, बीपीसीएल, जेएनपीटी, सिडको आणि विविध औद्योगिक प्रकल्पांसाठी स्थानिकांनी आपल्या जमिनी दिल्या. मात्र, विकासाच्या या झगमगाटात स्थानिकांच्या वाट्याला नेमके काय आले, हा प्रश्न आजही कायम आहे. दुसरीकडे उरणमध्ये विविध राज्यांतून आलेल्या नागरिकांची संख्या वाढत आहे. लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला मतदानाचा आणि आपल्या हक्कांचा अधिकार आहे. मात्र, स्थानिकांच्या प्रश्नांवर भूमिका घेताना राजकीय पक्षांची भूमिका काय असते, हा खरा चर्चेचा विषय बनला आहे.

खारेपाटातील पाण्याची प्रतीक्षा कधी संपणार?

। खरोशी । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील खारेपाट विभागातील शेतकऱ्यांची सिंचनाच्या पाण्याची मागणी गेल्या चार दशकांपासून सुरू आहे. खारेपाट विभागातील शेती सुजलाम सुफलाम व्हावी, स्थानिकांची कायमची तहान भागवली जावी, शेतीला पूरक व्यवसाय मिळावा तसेच खारेपाट विभागात आर्थिक सुबत्ता यावी म्हणून संघर्ष सुरू आहे. परंतु, दोनपिढ्या गेल्या तरी हा संघर्ष अद्याप सुरूच आहे. त्यामुळे खारेपाटातील ४० वर्षांची प्रतीक्षा कधी संपणार? सिंचनाच्या पाण्याला ग्रहण का लागले, असा रोखठोक सवाल खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर. म्हात्रे यांनी केला आहे. खारेपाटातील नागरिकांच्या संघर्षातून आणि उपोषणाच्या मार्गातून येथील सिंचनासाठी ७६६ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, दोन टप्प्यातील काम पूर्णत्वास गेले आहे. तसे फलकही लावण्यात आले आहेत. त्यामुळे आत्ता आपली तहान भागणार, शेती फुलणार या आशेने खारेपाट विभागातील जनता आनंदीत झाली आहे. परंतु, हे काम पूर्णत्वास जाऊ नये म्हणून काही अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न दिसून येत आहे, असे सी.आर. म्हात्रे यांनी सांगितले.



मुरूड किनाऱ्यावर निसर्गाने केलेली रंगाची उधळण पाहून पर्यटकांनी निसर्गात उधळण्याचा आनंद घेतानाचे क्षण. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

पक्षी-प्राण्यांसाठी मोठा जलसाठा

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील खांडस भागातील जंगलामध्ये असलेल्या पक्षी आणि प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोया व्हावी, असा प्रयत्न वन विभागाने केला आहे. वन विभागाने तेथील जंगलामध्ये मोठा वनराई बंधारा बांधून मोठा पाणी साठा तेथे निर्माण केला आहे. दरम्यान, खांडस राखीव वनक्षेत्रात वनविभागाचा वनराई बंधारा हा वन्यप्राण्यांची तहान भागविण्यासाठी महत्वाचा ठरत असून, 'पाणी अडवा, पाणी जिरवा' संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनाला चालना देत जंगलातील पाण्याची भूजल क्षमता वाढवण्यास मदत होणार आहे.



कर्जत तालुक्यातील वनसंपदा आणि वन्यजीवांचे संरक्षण करण्याबरोबरच जंगलातील नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन करण्यासाठी वनविभागाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमांचा एक भाग म्हणून परिमंडळ खांडस अंतर्गत नियतक्षेत्र खांडस राखीव वन, कंपार्टमेंट क्रमांक १२ येथे वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राउंड स्टाफच्या सहकार्याने वनराई बंधाऱ्याची निर्मिती केली आहे. वन्यप्राण्यांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे, तसेच पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून जमिनीत जिरवता यावे, या दुहेरी उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या बंधाऱ्यामुळे पावसाळ्यात वाहून जाणाऱ्या पाण्याचा प्रवाह रोखण्यास मदत होणार असून, पाणी जमिनीत मुरण्यास हातभार लागणार आहे. या उपक्रमात खांडसचे वनपाल तुकाराम जाधव, वनरक्षक रमेश झोरे, पाथजचे वनरक्षक श्रीरंग ढोगे आणि चाफेवाडीचे वनरक्षक केशव बनसोडे यांनी सहभाग घेतला.

पर्यावरण संवर्धनाची गरज

वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ वनविभागाची जबाबदारी नसून, निसर्गाशी जोडलेल्या प्रत्येक घटकाची सामूहिक जबाबदारी आहे. जंगलातील पाण्याचे स्रोत जतन करणे, पावसाचे पाणी अडविणे आणि नैसर्गिक जलसंपत्तीचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. वनराई बंधाऱ्यांसारख्या छोट्या; मात्र परिणामकारक उपक्रमांमधून पर्यावरण संवर्धनाला मोठी मदत होऊ शकते. जंगल हे केवळ झाडांचे आणि वनसंपदेचे ठिकाण नसून असंख्य वन्यप्राणी, पक्षी आणि जैवविविधतेचे नैसर्गिक अधिवास आहे.

पाचाडमध्ये महिलांचा सन्मान

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पाचाडमध्ये दिवाळीनिमित्त भाऊबीजेचा अनोखा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी कष्टकरी महिलांचा साडीचोळी देऊन सन्मान करत मावळा जवान संघटनेने राजमाता जिजाऊ यांना अनोख्या पद्धतीने मानवंदना दिली. शेकडो पणत्यांचा दीपोत्सव, पारंपरिक लोकगीते आणि जय शिवराय, जय जिजाऊच्या जयघोषाने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. या सोहळ्यात चारशेहून अधिक कष्टकरी महिलांचा सन्मान करण्यात आला.

जंगलतोडविरोधात ग्रामस्थ एकवटले

। नेरळ । प्रतिनिधी ।

टोरंट प्रकल्पासाठी कर्जत तालुक्यातील सायडोंगर परिसरात झालेल्या वृक्षतोडीविरोधात स्थानिक ग्रामस्थांचा लढा अधिक तीव्र होत आहे. जंगलाचे संरक्षण आणि वृक्षतोड कायमस्वरूपी थांबविण्याच्या मागणीसाठी पालीतर्फे कोतवाल-खलाटी येथील ग्रामस्थांनी पाली गावात कँडल मार्च काढून निषेध नोंदवला.

टोरेंट प्रकल्पासाठी सायडोंगर परिसरातील जंगलात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आली आहे. या बेसुमार जंगलतोड विरुद्ध पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक संतप्त आहे. ग्रामस्थांनी हातात मेणबत्त्या घेऊन महिला, तरुण आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत जंगल संवर्धनाचा निर्धार केला. वृक्षतोडीला मिळालेली तात्पुरती स्थगिती करण्यात आली असून शासनाने याबाबत कायमस्वरूपी निर्णय घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. हा कँडल मार्च पाली गावातील दत्त मंदिरापासून शिव मंदिरापर्यंत काढण्यात आला. यावेळी ''सायडोंगर वाचवा'', ''जंगल वाचवा'', ''निसर्ग वाचवा'' अशा घोषणा देत नागरिकांनी वृक्षतोडीचा निषेध केला. सणाच्या दिवशी निसर्ग रक्षणाचा प्रश्न केंद्रस्थानी ठेवत ग्रामस्थांनी एकजूट दाखवली आणि वनसंपदेच्या रक्षणासाठी एकजूट दाखवली.



'सिव्हिल सोसायटी अलिबाग'चा शुभारंभ

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबागच्या सामाजिक आणि वैचारिक क्षेत्रात एक नवा उपक्रम सुरू होत असून, अलिबागमधील प्रतिष्ठित डॉक्टर, वकील, उद्योजक, व्यावसायिक, शिक्षणतज्ज्ञ, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि सुजाण नागरिक एकत्र येऊन 'सिव्हिल सोसायटी अलिबाग' या स्वतंत्र वैचारिक व्यासपीठाची निर्मिती केली आहे. अलिबागमधील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या या नागरिकांनी एकत्र येऊन समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांवर विचारमंथन व्हावे, नागरिकांमध्ये वैचारिक जागरूकता निर्माण व्हावी आणि विविध क्षेत्रांतील अनुभवी व्यक्तींना एकत्र येऊन सकारात्मक संवाद साधता यावा, या सामूहिक विचारातून या व्यासपीठाची संकल्पना साकारली आहे. ही कोणत्याही एका व्यक्तीची किंवा विशिष्ट संस्थेची संकल्पना नसून, अलिबागच्या जागरूक नागरिकांनी समाजाच्या व्यापक हितासाठी एकत्र येऊन उचललेले सामूहिक पाऊल आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून दर महिन्याला विविध विषयांवर नामवंत वक्ते, विचारवंत, तज्ज्ञ, लेखक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींची व्याख्याने व संवाद आयोजित करण्यात येणार आहेत. लोकशाही, शिक्षण, पर्यावरण, बेरोजगारी, आरोग्य, सामाजिक प्रश्न, तंत्रज्ञान आणि युवकांचे भविष्य अशा विषयांना यामध्ये प्राधान्य दिले जाणार आहे. या उपक्रमाच्या पहिल्या व्याख्यानाचे आयोजन शनिवारी (दि.१४) सायंकाळी ७ ते साडेआठ या वेळेत अलिबाग येथील चिंतामणराव केळकर विद्यालयात करण्यात आले आहे. या व्याख्यानासाठी ज्येष्ठ पत्रकार, लेखक, सामाजिक व राजकीय विषयांचे अभ्यासक संजय आवटे यांना आमंत्रित करण्यात आले आहे. 'लोकशाहीची सध्याची परिस्थिती' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे.

समुद्रकिनारी पर्यटकांची मोठी रेलचेल | **स्थानिक व्यावसायिकांची दिवाळी आनंदात**

दिवाळीच्या सुट्टीत मुरुड पर्यटकांनी फुलले

। मुरूड-जंजिरा । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या सुट्टीचा आस्वाद घेण्यासाठी मुरूड तालुक्यातील समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची मोठी रेलचेल दिसून येत आहे. पहिली आंघोळ आणि लक्ष्मीपूजनाचा विधी उरकून मुंबई-पुणे, ठाणे, पश्चिम महाराष्ट्रातुन असंख्य पर्यटक याठिकाणी दाखल झाले आहेत. दरम्यान, पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यावर फटाके फोडून दिवाळीचा आनंद लुटला. तसेच, पर्यटकांच्या मांदियाळीमुळे स्थानिक व्यावसायिकांची दिवाळी देखील आनंदात साजरी झाली.

नवरात्रोत्सवापर्यंत मुरूड तालुक्यातील पर्यटन पूर्णपणे थंडावले होते. तसेच, जंजिऱ्या जलदुर्गाकडे देखील पर्यटकांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले. त्यामुळे पर्यटनावर अवलंकबून असणारे व्यावसायिक कमालीचे हवालदिल झाले होते. मात्र, दिवाळी पाडव्याच्या दिवसापासून चित्र बदलून काशीदसह मुरूड समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांचा पूर लोटल्याचे चित्र दिसून येत आहे.



सध्या शाळांना दिवाळीची सुट्टी पडल्यामुळे अनेक पर्यटकांनी पर्यटनासाठी रायगड जिल्ह्याकडे धाव घेतली. पर्यटकांमुळे तालुक्यातील पर्यटन व्यवसायाला पुन्हा उर्जितावस्था आली आहे. ठिकठिकाणी निवास व्यवस्था, हॉटेलिंग गजबजून गेले आहेत. तसेच, पर्यटकांच्या वर्दळीने जंजिरा जलदुर्ग देखील गजबजला आहे. राजपुरी जेट्टी, खोरा बंदर जेट्टी, दिघी बंदर जेट्टीवरन पर्यटकांना जंजिऱ्यात जाण्याची जल प्रवासाची सुविधा असून, असंख्य पर्यटक जंजिरा पाहण्यासाठी येताना दिसत आहेत. आताची पर्यटकांची संख्या पाहता पुढील हंगाम चांगला जाईल, अशी आशा स्थानिका व्यावसायिकांमधून व्यक्त केला जात आहे. तसेच, नांदगाव येथील सिद्धिविनायक देवस्थान, मुरूड येथील श्री दत्त देवस्थान, साळाव येथील गणेश देवस्थानला देखील पर्यटक भेटी देऊन दर्शनाचा लाभ घेत आहेत. यावेळी मुरूड परिसरात पर्यटकांची सुमारे १ हजार पेक्षा अधिक वाहने दाखल झाल्याचे जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत आणि काही हॉटेल व्यावसायिकांकडून सांगण्यात आले.

समुद्रकिनारा सुशोभीकरणाचा उत्तम फायदा

मुरुड समुद्रकिनाऱ्याचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. तसेच, याठिकाणी नुकतेच सुरु झालेल्या वाहनतळामुळे पर्यटकांची उत्तम सोय झाली आहे. पर्यटक हॉटेलमधून येथील वाहनतळावर येतात आणि काही पायऱ्या उतरल्यावर लगेचच त्यांना समुद्राच्या लाटांचा आनंद घेता येतो. त्यामुळे किनारा सुशोभीकरणाचा परिणाम पर्यटन वाढीवर नकीच झाल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. दरम्यान, पर्यटकांना ऐतिहासिक पद्मदुर्ग पाहण्यासाठी नगरपरिषदेने पद्मदुर्ग किल्ल्यात जलवाहतूक सुरु करणे गरजेचे आहे, मुरुडमधील इतर पर्यटन किठाणे पाहण्यासाठी पालिकेची गाडी असली पाहिजे. तसेच, दोन्ही किल्ले, कुंद्यामांदाड लेणी, दत्त मंदिर, इदगा, गारंबी हि स्थळे पाहण्यासाठी नियोजन होणे गरजेचे आहे.

गोकुळातला तमाशा

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत शेवटी फडणवीसांच्या महायुतीने अखेर लोकशाहीचा खून पाडलाच. आपलाच चेअरमन बसवायचा या राक्षसी महत्वाकांक्षेतून गोकुळात जे वगनाट्य घडवण्यात आले व त्या निमित्ताने ज्या काही आरोळ्या ठोकण्यात आल्या त्या निव्वळ ओंगळ होत्या. गोकुळ दूध संघाची निवडणूक लोकशाही पध्दतीने पार पडली होती. त्या मतदानात किंवा नंतर कोठेही गडबड झालेली नव्हती. सतेज पाटील यांच्या समविचारी आघाडीला २५ पैकी १३ जागा मिळाल्या आणि तिला बहुमत मिळाले. विरोधी मुश्रीफ व महाडिक गटाच्या महायुतीला बारा जागा मिळाल्या. सहकारी संस्थांमध्ये अशा प्रकारचे काठावरचे बहुमत ही नित्याची बाब आहे. वास्तविक यातले निवडून आलेले संचालक एकमेकांच्या भावकीतले आणि एरवी मित्रांपैकीच असतात. निवडणुकीमुळे ते वेगवेगळ्या गटात जातात व निवडणूक झाली की पुन्हा एकत्र येऊन कारभार करतात. अनेकदा गटातटांची हाणामारीही होते. पण तितक्यापुरतीच व स्थानिक असते. त्यात राज्य सरकारने आणि खुद्द मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे असे काही नसते. पण गोकुळच्या निवडणुकीत हेच घडले. आधी सतेज पाटलांच्या विरोधात महायुतीने सर्व ताकद पणाला लावली. देवांच्या शपथा घेऊन मतदारांना मतदान करायला सांगितले गेले. पण तो डाव फुकट गेला. त्यावेळी खरे तर महायुतीने गप्प बसायला हवे होते. सक्षम विरोधी पक्ष म्हणून नव्या सत्तारुढ गटावर त्यांना वचक ठेवणे शक्य होते व लोकशाहीत तेच त्यांच्याकडून अपेक्षित होते. पण मतदारांनी नाकारल्यानंतरही यांची हवस संपली नाही. उलट ते अधिकच हट्टाला पेटले. यात हसन मुश्रीफ आणि चंद्रकांत पाटील यांचा पुढाकार घेतला व काहीही करून सत्ता खेचायचीच असे कारस्थान रचले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना खरे तर रोखायला हवे होते. समजुतीच्या गोष्टी सांगायला हव्या होत्या. पण तेही भरीला पडले. किंबहुना, हे सर्व काही त्यांच्याच आदेशावरून चालू असावे असे चित्र दिसले. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री एक सहकारी संस्था ताब्यात घेण्यासाठी सर्व संकेत गुंडाळून ठेवून सत्तेची ताकद वापरतो हे लाजिरवाणे चित्र या राज्याने पाहिले.

सत्तेसाठी काहीही

चेअरमन निवडीसाठी झालेल्या पहिल्या बैठकीला विरोधी बारा सदस्य हजरच राहिले नाहीत. कोणत्याही बैठकीला किमान १४ सदस्य हजर असल्याखेरीज कोरम पूर्णच होऊ शकत नाही असा नियम आहे. त्याच्या आधारे सतेज पाटलांची ही अडवणूक केली गेली. पाटील न्यायालयात गेल्यावर दुसऱ्यांदा बैठकीची तारीख लावली गेली. मधल्या काळात सरकारने अध्यादेश काढून गोकुळवर चार संचालकांची नियुक्ती करून त्यांना मतदानाचा अधिकार देऊन टाकला. आता त्याच चार संचालकांच्या जिवावर महायुतीने राजेश पाटील या आपल्या गटातील माजी आमदारांना चेअरमनपदी निवडून आणले. उद्या याच न्यायाने क्रिकेटच्या सामन्यात आपल्या संघाचे सर्व खेळाडू बाद होऊन ती हरू लागलेली असताना अकराच्याही पलिकडे आणखी चार फलंदाज संघात घेण्याचा आणि सामना जिंकण्याचा नवा नियम आयत्या वेळी भाजपवाले काढू शकतील. तशीही आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटना अमित शहांच्या मुलाच्या हातात आहे. याच न्यायाने उद्या हे लोकसभा व विधानसभेतही नियम बदलवून स्वतःच्या उमेदवारांना विजयी घोषित करू शकतील. अशा स्थितीत निवडणुकांचा फार्स करण्याचीही गरज नाही. जी कोणती संस्था मुख्यमंत्री, त्यांचा पक्ष आणि त्यांचे बगलबच्चे यांना हवी असेल ती महायुतीने जिंकली असा थेट अध्यादेशच जारी केला जावा. कहर म्हणजे कोरम होत नसल्याने आपल्याला हे नाइलाजाने करावे लागले अन्यथा ही संस्था प्रशासकांच्या हाती गेली असती असे मुख्यमंत्री, मुश्रीफ वगैरे नेते सांगत आहेत. पण मुळात कोरम का नव्हता, आणि महायुतीचे निवडून आलेले बारा संचालक बैठकीला का गेले नाहीत याचे उत्तर ते देत नाहीत. या संचालकांना बैठकीला न जाण्याचे कोणतेही कारण नव्हते. सतेज पाटील गटाचे तेरा संचालक बेकायदा वगैरे निवडून आलेले नव्हते. किंवा त्यांनी कोणतीही दांडगाई केलेली नव्हती. पराभव मान्य करणे हा लोकशाहीतला महत्वाचा गुण आहे. सतेज पाटील यांचा गट भक्कम असल्याने हा डाव -खेळला गेला. समजा त्यांच्यात गट-तट असते व फूट पाडण्याची शक्यता असती तर महायुतीने फोडाफोडी केली असती. जे चार वर्षांपूर्वी राज्याच्या राजकारणात झाले तेच गोकुळमध्ये झाले असते व अजूनही ते करण्याचा प्रयत्न होणारच नाही असे नाही.

नासलेली बुध्दी

परवाच्या चेअरमन निवडीच्या निमित्ताने महायुतीने एक सभा घेतली व सतेज पाटलांच्या नावाने शिमगा केला. चंद्रकांत पाटील व मुश्रीफ यांनी जी मुक्ताफळे उधळली ती मंत्रिपदाला शोभेशी नव्हती. कोल्हापूर जिल्ह्याच्या पुरोगामी परंपरेला लाज आणतील अशी होती. मुख्यमंत्र्यांच्या नादाला लागू नका, त्यांनी मनात आणले तर ते तुमचे साम्राज्य एका मिनिटात चिरडून टाकतील अशी धमकी चंद्रकांत पाटील यांनी दिली. पाटील यांचे हे वक्तव्य अनाकलनीय आहे. सतेज पाटील हे कोल्हापूर जिल्ह्यातलेच आहेत. ते गोकुळच्या सत्तेत होतेच. त्यामुळे त्यांनी आपली आघाडी उभी करणे हे नैसर्गिक होते. उलट भाजप आणि महायुती हेच या संस्थेच्या दृष्टीने बाहेरचे आहेत. चंद्रकांत पाटलांचा तर सहकाराशी काहीही संबंध नाही. मुश्रीफांच्या जिवावर ते उड्या मारत आहेत. अशा स्थितीत सतेज यांना चिरडून टाकण्याची धमकी देणे हा केवळ सत्तेचा माज होय. या वादामध्ये दिवंगत डीवाय पाटील यांना ओढणे हेही अश्लाघ्य होते. या मस्तीच्या विरोधात कोल्हापूरकरांमध्ये किती संताप आहे हे सोमवारी निघालेल्या विराट मोर्चामधून दिसले. तरीही यांचे डोळे उघडायला तयार नाही. उलट हा मोर्चा म्हणजे सतेज पाटील यांची काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद मिळवण्याच्या राजकारणातली खेळी आहे असा आरोप मुश्रीफ यांनी केला. यासारखा दुसरा हास्यास्पद आरोप नसेल. सतेज यांना काँग्रेस श्रेष्ठींनी पूर्वीही पदासाठी विचारणा करून झालेली आहे अशी आमची माहिती आहे. मात्र त्यांनी ती नाकारली होती. दुसरे म्हणजे सहकारी संस्था ताब्यात ठेवणारे व काँग्रेसची विचारधारा जागृत ठेवणारे सतेज पाटील यांचे सामर्थ्य सर्व महाराष्ट्राप्रमाणेच दिल्लीलाही ठाऊक आहे. गोकुळच्या निवडणुकीतही ते पुरेसे दिसून आले आहे. अशा वेळी सतेज यांना आणखी एखादा मोर्चा काढण्याची गरज नाही. दरम्यान हे प्रकरण अजूनही कोर्टात आहे. त्याच्या पुढच्या सुनावणीत मागाहून चार संचालक निवडण्याची कृती बेकायदा ठरवले जाण्याची एक शक्यता आहेच. असे झाले तर आपण गोकुळचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक आणू अशी धमकी मुश्रीफ यांनी दिली आहे. कोरम झाला नसता तर प्रशासक नेमला गेला असता असे सांगणाऱ्यांनीच दुसरीकडे प्रशासक नेमण्याची धमकी द्यावी यावरून यांची बुध्दी सत्तांधळेपणामुळे किती नासली आहे हे कळते. गोकुळच्या मतदारांनी यांना सूज्ञपणाने एक दणका दिला होता. आता न्यायालय यांची ही बुध्दी ताळ्यावर आणील अशी आशा आहे.

विचार

समृद्धीची झगमग आणि दुष्काळाची छाया

देशात सणासुदीच्या काळात बाजारात दिसणारा ग्राहकीचा उत्साह, वाहन विक्रीतील तेजी आणि करसंकलनाचे नवे उच्चांक अर्थव्यवस्थेच्या मजबुतीचे चित्र उभे करत आहेत; मात्र त्याच नाण्याच्या दुसऱ्या बाजूला दुष्काळाचे सावट, शेतीचे ढासळते गणित आणि ग्रामीण भागातील आक्रंदणारा रोजगार वास्तव मांडत आहे. ही विसंगती केवळ तात्पुरती नसून भारताच्या दोन टोकांच्या आर्थिक प्रवासावर बोट ठेवणारी आहे.

भागा वरखडे

भारतीय अर्थव्यवस्थेचे आजचे स्वरूप म्हणजे एकाच नाण्याच्या दोन परस्परविरोधी बाजूंचे दर्शन घडवणारे आहे. एका बाजूला महानगरांमध्ये उत्सवी खरेदीचा उत्साह, महागड्या मोटारींचे बुकिंग, आलिशान घरांच्या खरेदीचे विक्रम आणि केंद्र सरकारच्या तिजोरीत विक्रमी करसंकलनाचा ओघ सुरू आहे. दुसरीकडे मात्र, देशातील आणि राज्यातील ग्रामीण पट्ट्यावर भीषण दुष्काळाचे सावट पसरले असून शेतीचे अर्थकारण पार कोलमडून पडले आहे. शेतात हाताला काम उरलेले नाही, मनरेगा योजनेवर कामाची मागणी नोंदवणारे हात वेगाने वाढत आहेत आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेतली क्रयशक्ती झपाट्याने घटत चालली आहे. ही परिस्थिती एकाच देशात वसलेल्या दोन वेगळ्या जगाची साक्ष देते. अर्थव्यवस्थेच्या या विचित्र 'के'आकाराच्या वाढीचे वास्तव काय आहे आणि सणासुदीच्या झगमगाटात झाकले जाणारे हे ग्रामीण संकट भविष्यात संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेला कसे वेठीस धरू शकते, याचे शांत डोक्याने विश्लेषण करण्याची हीच वेळ आहे. राज्यातील आणि देशातील मॉन्सूनची अनिश्चितता हे भारतीय शेतीसमोरील सर्वात मोठे आव्हान राहिले आहे. यंदाच्या पर्जन्यमानाने अनेक भागांत दगा दिला आहे. काही भागात पावसाचा मोठा खंड पडला, तर काही ठिकाणी अवेळी व असमान पावसाने खरिपाची पिके उद्ध्वस्त केली. जलसाठ्यांची पातळी चिंताजनकरित्या घसरली आहे. विहिरींनी तळ गाठला आहे आणि धरणांमधील पाण्याचा साठा केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याची वेळ आली आहे. याचा थेट फटका खरीप हंगामातील उत्पादनाला बसला असून रब्बीच्या पेरण्यांवरही मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जेव्हा कृषी क्षेत्रावर संकट येते, तेव्हा त्याचा प्रभाव केवळ शेतकरी कुटुंबापुरता मर्यादित राहत नाही, तर शेतीवर आधारित शेतमजूर, स्थानिक दुकानदार, वाहतूकदार आणि आठवडे बाजारातील छोटे व्यावसायिक अशा सर्वांचीच साखळी तुटून पडते. शेतीतून हाती येणारे उत्पन्न घटल्यामुळे किंवा पूर्णपणे नाहीसे झाल्यामुळे ग्रामीण भागात उत्पन्नाचा भीषण दुष्काळ जाणवू लागला आहे. या संकटाचे थेट प्रतिबिंब ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) आकडेवारीत उमटलेले दिसते. एरवी शेतीचा हंगाम सुरू असताना मजुरांची टंचाई भासणाऱ्या खेड्यापाड्यांत आज मनरेगाच्या कामासाठी लोकांच्या रांगा लागत आहेत. ही मागणी केवळ पारंपरिक मजुरांपुरती मर्यादित नाही, तर ज्या शेतकऱ्यांची शेते सुकली आहेत, ते शेतकरीही आज जगण्यासाठी मजुरी मागायला पुढे येत आहेत. ग्रामीण रोजगाराची ही वाढलेली मागणी हा ग्रामीण अर्थव्यवस्था आजारी पडल्याचा थेट पुरावा आहे. लोकांना जगण्यासाठी अत्यंत कमी मजुरीच्या सरकारी कामांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्याचा थेट अर्थ असा, की त्यांच्याकडे चैनीच्या किंवा दुय्यम गरजांवर खर्च करण्यासाठी एक पैसाही शिल्लक नाही. या ढासळलेल्या ग्रामीण क्रयशक्तीचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर हळूहळू पण निश्चितपणे होणार आहे.

भारताची जवळपास ६० टक्के लोकसंख्या अजूनही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ग्रामीण भागाशी जोडलेली आहे. देशातील वृत्तपत्रांपासून ते टीव्ही संचांपर्यंत, साबणापासून ते टू-व्हिलरपर्यंत आणि कपड्यांपासून ते पादत्राणांपर्यंत सर्वच क्षेत्रांतील ग्राहकोपयोगी वस्तूंचा (एफएमसीजी) मोठा ग्राहक ग्रामीण भारतात वसलेला आहे. जेव्हा ग्रामीण भागाचा खिसा रिकामा होतो, तेव्हा या सर्व क्षेत्रांमधील दैनंदिन खपाच्या वस्तूंची विक्री मंदावते. आजवरच्या आर्थिक संकटांमध्ये भारताची ग्रामीण मागणी ही देशाच्या औद्योगिक क्षेत्राला तगवून ठेवणारी ढाल ठरली होती; पण आता तीच ढाल कमकुवत झाली आहे. गृहनिर्माण क्षेत्रातील आकडेवारी तपासली, तर या आर्थिक विषमतेचे सर्वात विदारक चित्र समोर येते. आज देशभरात परवडणाऱ्या घरांची मागणी लक्षणीयरित्या घटली आहे. चाळीस ते पन्नास लाख रुपयांच्या आतील घरांच्या विक्रीत मोठी घट नोंदवली गेली आहे. मध्यमवर्ग आणि अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांचे घर घेण्याचे स्वप्न महागाई, कर्जाचे वाढलेले व्याजदर आणि उत्पन्नातील अनिश्चितता यामुळे लांबणीवर पडले आहे; मात्र त्याच वेळी एक कोटी, दोन कोटी किंवा त्याहून अधिक किमतीच्या लक्झरी आणि प्रीमियम घरांची विक्री विक्रमी वेगाने वाढत आहे. मोठमोठ्या शहरांमध्ये प्रीमियम गृहप्रकल्प लाँच होताच काही तासांत विकले जात आहेत. म्हणजेच ज्यांच्याकडे आधीच विपुल संपत्ती आहे, त्यांचा खर्च आणि गुंतवणूक अनिर्बंध सुरू आहे; पण ज्याला मूलभूत निवाऱ्याची गरज आहे, असा सामान्य नागरिक मात्र बाजारातून बाहेर फेकला जात आहे. वाहनांच्या बाजारातही नेमका हाच विरोधाभास उघड्या डोळ्यांनी पाहता येतो. सर्वसामान्यांचे वाहन समजल्या जाणाऱ्या छोट्या हॅचबॅक कार आणि विशेषतः ग्रामीण भागाचे वाहन असलेल्या दुचाकींच्या विक्रीत म्हणावी तशी वाढ झालेली नाही. उलट अनेक ठिकाणी टू-व्हिलर बाजाराला उतरती कळा लागल्याचे दिसते. याउलट, पंधरा ते पंचवीस लाखांपेक्षा अधिक किम तीच्या आलिशान एसयूव्ही गाड्यांसाठी महिना-महिने वेटिंग लिस्ट आहे. मोटार कंपन्या आपल्या परवडणाऱ्या गाड्यांचे उत्पादन कमी करून नफा जास्त देणाऱ्या मोठ्या गाड्यांच्या उत्पादनावर भर देत आहेत. हा ट्रेंड स्पष्ट करतो, की भारताचा उपभोग बाजार आकाराने आकुंचित होत असला, तरी तो मूल्याच्या दृष्टीने अधिक श्रीमंत वर्गावर केंद्रित झाला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आर्थिक क्षेत्रातील धोक्याची घंटा म्हणजे बँका आणि बिगर-बँकिंग वित्तीय संस्थांच्या (एनबीएफसी'ज) बुडीत कर्जांमध्ये (एनपीए) होणारी संभाव्य वाढ. ग्रामीण भागातील आर्थिक संकटामुळे कृषी कर्जांची परतफेड थांबण्याची चिन्हे आहेत. पीकच हाती आले नाही, तर शेतकरी कर्ज कुठून फेडणार? याशिवाय, गेल्या काही वर्षांत असुरक्षित वैयक्तिक कर्जे, मायक्रोफायनान्स आणि क्रेडिट कार्डच्या माध्यमातून छोट्या कर्जांचा सुळसुळाट झाला होता. ग्रामीण व निमशहरी भागातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी ही कर्जे घेतली होती. आता उत्पन्नाचे स्रोत आटल्यामुळे या सूक्ष्म वित्त संस्थांचा आणि छोट्या वैयक्तिक कर्जांचा 'एनपीए' वाढू लागला आहे. अनेक वित्तीय संस्थांनी याविषयी चिंता व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे. हा फुगा जर फुटला, तर त्याचा फटका देशाच्या बँकिंग व्यवस्थेला बसू शकतो, तरीही दुसरीकडे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करसंकलनाचे आकडे दरमहा नवे विक्रम प्रस्थापित करत आहेत. जीएसटीचे संकलन दरमहा १.७५ ते १.८० लाख कोटी रुपयांचा टप्पा सहज पार करत आहे, तर कॉर्पोरेट टॅक्स आणि प्राप्तिकराच्या संकलनातही मोठी वाढ नोंदवली जात आहे. सरकार या करसंकलनाला अर्थव्यवस्थेच्या भरभराटीचा पुरावा म्हणून सादर करत असते. यात तथ्य आहे, की देशातील संघटित क्षेत्र, कॉर्पोरेट जग आणि मध्यम-उच्च वर्गाने आर्थिक आघाडीवर चांगली कामगिरी केली आहे. डिजिटल व्यवहारांमुळे करचुकवेगिरीला आळा बसला आहे; परंतु करसंकलनाची ही भरभराट हे संपूर्ण देशाचे प्रातिनिधिक चित्र नाही. हा कर देशातील संघटित, शहरी आणि सधन घटकांच्या आर्थिक व्यवहारांतून येत आहे. असंघटित क्षेत्र आणि ग्रामीण अर्थव्यवस्था या करआकडेवारीच्या चौकटीबाहेर अक्षरशः होरपळत आहे.

गणेशोत्सवापासून सुरू झालेला आणि दिवाळीपर्यंत चालणारा सणासुदीचा काळ हा भारतीय अर्थव्यवस्थेचा 'गोल्डन पिरियड' मानला जातो. या काळात बाजारात खरेदीचा मोठा मूड दिसून येत आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तू, सोने-चांदी, कपडे, पर्यटन आणि मिठाईच्या दुकानांमध्ये ग्राहकांची गर्दी ओसंडून वाहत आहे; मात्र या खरेदीच्या मूडचे सूक्ष्म विश्लेषण केले तर लक्षात येईल की, ही खरेदी प्रामुख्याने शहरी भागातील पगारदार वर्ग, व्यावसायिक आणि उच्चभ्रू लोकांकडून केली जात आहे. तीही बऱ्याच अंशी 'नो कॉस्ट ईएमआय' आणि क्रेडिट कार्डच्या उधारीवर आधारित आहे. भविष्यकालीन उत्पन्नाची शाश्वती नसताना कर्जावर आधारलेली ही सणासुदीची खरेदी अर्थव्यवस्थेला काही काळासाठी गती देईल; पण तो कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. खेड्यापाड्यातील आठवडे बाजार आणि छोट्या शहरांमधील दुकानांमध्ये सणांच्या दिवसांतही पूर्वीसारखी गिऱ्हाईकी दिसत नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. हे चित्र देशाच्या दीर्घकालीन आर्थिक आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे. भारत ही केवळ मूठभर उच्चभ्रूंची बाजारपेठ बनून जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनू शकत नाही. जोपर्यंत ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या खिशात पैसा खेळत नाही, जोपर्यंत शेतमजुराच्या हाताला सन्मानाचे काम मिळत नाही आणि जोपर्यंत परवडणाऱ्या घरांचा ग्राहक पुन्हा बाजारात येत नाही, तोपर्यंत आर्थिक वाढीचा पाया भक्कम होऊ शकत नाही. केवळ लक्झरी कार आणि महागड्या फ्लॅट्सच्या विक्रीवर देशाचा जीडीपी फुगवून दाखवता येईल; पण त्यातून निर्माण होणारी सामाजिक आणि आर्थिक दरी देशाच्या स्थिरतेला सुरुंग लावणारी ठरेल. सरकारने सणासुदीच्या बाजारातील उलाढालीने आणि करसंकलनाच्या विक्रमाने हुरळून न जाता दुष्काळाच्या वास्तवाला सामोरे जाण्याची नितांत गरज आहे. दुष्काळग्रस्त भागात तात्काळ दिलासा योजना, पीकविम्याची विनाविलंब भरपाई, पिण्याच्या पाण्याची आणि चाऱ्याची सोय, तसेच मनरेगाच्या कामांची व्याप्ती वाढवून मजुरी वेळेवर देणे हे अग्रक्रमाने करायला हवे. त्याचबरोबर ग्रामीण भागात शेतीपूरक बिगर-कृषी उद्योगधंद्यांना चालना देण्याची गरज आहे, जेणेकरून हवामानाच्या लहरीपणावर ग्रामीण जनतेचे जगणे पूर्णपणे अवलंबून राहणार नाही. थोडक्यात सांगायचे तर, भारताची अर्थव्यवस्था आज एका विचित्र वळणावर उभी आहे. एका टोकाला चमचमणाऱ्या मॉल्सची रोषणाई आहे, तर दुसऱ्या टोकाला विजेविना आणि पाण्याविना करपून गेलेले शेत आहे. सणासुदीचा हा झगमगाट संपल्यानंतर जेव्हा वर्षअखेरीस कठोर आर्थिक वास्तव समोर येईल, तेव्हा ग्रामीण संकटाची धग शहरांच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचल्याशिवाय राहणार नाही. अर्थव्यवस्थेचा रथ पुढे न्यायचा असेल, तर केवळ एका चाकाला गती देऊन चालणार नाही. त्या रथाचे दुसरे, महत्त्वाचे ग्रामीण चाकही चिखलातून बाहेर काढावेच लागेल.

चर्चा आजची

पृथ्वीच्या भविष्यासाठी सकारात्मक पावलांची गरज

सुयोग आंग्रे

पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत आहे. काही ठिकाणी कडाक्याच्या उन्हामुळे जनजीवन विस्कळीत होत आहे, तर काही ठिकाणी पूर, दुष्काळ, चक्रीवादळ आणि जंगलातील आग नैसर्गिक समतोलाला आव्हान देत आहेत. समुद्राची पातळी वाढत आहे आणि हिमनद्या वेगाने वितळत आहेत. बदलते हवामान हा आता केवळ शास्त्रज्ञ आणि पर्यावरणवाद्यांसाठी चिंतेचा विषय बनला नाही तर मानवी सभ्यता, अन्न सुरक्षा, अर्थव्यवस्था आणि भावी पिढ्यांच्या अस्तित्वाशी निगडित गंभीर प्रश्न बनला आहे. अशा वेळी, जगाच्या नजरा संयुक्त राष्ट्रांच्या ३१व्या हवामान बदल परिषदेकडे म्हणजेच कॉप -३१ (पक्षांची परिषद) अंतल्या, तुर्की येथे आयोजित करण्यात आलेल्या आहेत. कॉप ही हवामान बदलावरील संयुक्त राष्ट्रांच्या फ्रेमवर्क कन्व्हेन्शनच्या सदस्य देशांची वार्षिक परिषद आहे, जी १९९५ मध्ये सुरू झाली. पॅरिसमध्ये २०१५ मध्ये झालेल्या कॉप -२१ मध्ये ऐतिहासिक पॅरिस करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती. या अंतर्गत देशांनी जागतिक तापमानवाढ पूर्व-औद्योगिक पातळीच्या तुलनेत दोन अंश सेल्सिअसपेक्षा कमी ठेवण्याचे वचन दिले होते. त्यानंतर झालेल्या परिषदांमध्ये हवामान वित्त, कार्बन उत्सर्जन, स्वच्छ ऊर्जा, अनुकूलन आणि नुकसान आणि नुकसान या विषयांवर महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. मात्र, घोषणा आणि त्यांची अंमलबजावणी यात अजूनही मोठी तफावत आहे. कॉप-३१ ही दरी भरून काढण्याची संधी आहे.औद्योगिक क्रांतीपासून, वीजनिर्मिती, वाहतूक, उद्योग आणि इमारत बांधकामात कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांच्या अतिवापरामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले आहे. हे वायू पृथ्वीतून बाहेर पडणारी उष्णता वातावरणात अडकवतात, ज्यामुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढते. याला ग्लोबल वार्मिंग म्हणतात. जर हरितगृह वायूंचे उत्सर्जन झपाट्याने कमी झाले नाही तर येत्या काही दशकात हवामान बदलाचे परिणाम अधिक तीव्र होतील. ऊर्जेची वाढती मागणी पूर्ण करताना कार्बन उत्सर्जन कसे कमी करायचे हे जगासमोरचे आव्हान आहे. त्यासाठी सौर, पवन, जलविद्युत आणि भूऔष्णिक ऊर्जा या स्वच्छ पर्यायांना चालना द्यावी लागेल.सौर उर्जा पार्क, छतावरील सौर, इलेक्ट्रिक वाहने, ऊर्जा साठवण तंत्रज्ञान आणि ग्रीन हायड्रोजन हे भविष्यातील ऊर्जा प्रणालीचे महत्त्वाचे आधार बनू शकतात. तथापि, स्वच्छ ऊर्जेकडे संक्रमण करण्यासाठी केवळ तंत्रज्ञान पुरेसे नाही. यासाठी गुंतवणूक, मजबूत पॉवर ग्रीड, बॅटरी स्टोरेज, कुशल मानव संसाधन आणि परवडणारे तंत्रज्ञान आवश्यक आहे. कॉप -३१ हे भारतासाठी म हत्त्वाचे आहे कारण त्याला विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यातील समतोल साधावा लागेल. एकीकडे देशाला उद्योग, वाहतूक, गृहनिर्माण आणि उर्जेच्या गरजा पूर्ण कराय्च्या आहेत, तर दुसरीकडे कार्बन उत्सर्जन कमी करायचे आहे. ही परिषद भारतासाठी विकसनशील देशांच्या चिंतेवर जोरदारपणे प्रकाश टाकण्याची आणि तंत्रज्ञान हस्तांतरण आणि हवामान वित्तपुरवठ्यावर जागतिक सहकार्य मिळविण्याची संधी असेल.हवामान बदलाला तोंड देण्यासाठी विज्ञानाची भूमिका निर्णायक आहे. हवामान अंदाज, उपग्रह-आधारित निरीक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, हवाम ान मॉडेलिंग आणि आपत्ती पूर्व चेतावणी प्रणालीद्वारे जोखीम कमी केली जाऊ शकतात. उदाहरणार्थ, अतिवृष्टीचा किंवा चक्रीवादळाचा धोका लवकर लक्षात आल्यास, प्रशासन लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवून जीवित आणि मालमत्तेची हानी कमी करू शकते. त्याचप्रमाणे, कार्बन कॅप्चर, ग्रीन हायड्रोजन, प्रगत बॅटरी आणि ऊर्जा कार्यक्षमता यांच्याशी संबंधित तंत्रज्ञान उत्सर्जन कमी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. तथापि, त्यांचे फायदे तेव्हाच मिळतील जेव्हा ते परवडणारे, सुलभ आणि पर्यावरणपूरक असतील. झपाट्याने वाढणाऱ्या शहरांमध्येही हवामान बदलाचे परिणाम दिसून येत आहेत. काँक्रीटचे वाढते बांधकाम, कमी होत जाणारे हिरवे क्षेत्र, वाहनांचा धूर आणि जास्त ऊर्जा वापर यामुळे शहरांचे तापमान वाढत आहे. याला सामोरे जाण्यासाठी वृक्षारोपण, हरित क्षेत्राचा विस्तार, तलाव आणि जलाशयांचे संवर्धन, पावसाचे पाणी साठवणे, ऊर्जा कार्यक्षम इमारती आणि सार्वजनिक वाहतूक यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. वाढत्या उष्णतेमुळे एअर कंडिशनरची मागणी वाढत आहे, परंतु पारंपारिक शीतकरण उपकरणे वीज वापरतात आणि काही प्रकरणांमध्ये शक्तिशाली हरितगृह वायू देखील उत्सर्जित करतात. त्यामुळे नैसर्गिक वायुवीजन, छतावरील हिरवळ, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे आणि पर्यावरणास अनुकूल शीतकरण तंत्रज्ञानाचा प्रचार करावा लागेल. वातावरणातील बदलाविरुद्धच्या लढ्यात, वायू प्रदूषणाची व्याप्ती सातत्याने वाढत असल्याने, हवामानाला अनुकूल शहरे आणि टिकाऊ इमारतींच्या विकासाबरोबरच निसर्गावर आधारित उपायांना प्राधान्य द्यावे लागेल. हवामान बदलाला सामोरे जाण्याची जबाबदारी केवळ सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचीच नाही तर सामान्य नागरिकांचीही आहे. वीज आणि पाण्याची बचत, सार्वजनिक वाहतुकीचा वापर, प्लॅस्टिकचा कमी वापर, कचरा वर्गीकरण आणि झाडे व वनस्पतींचे संवर्धन यासारख्या उपाययोजनांमुळे मोठा बदल होऊ शकतो. वस्तूंचा अतिवापर, अन्नाची नासाडी आणि ऊर्जेचा अनावश्यक वापर यामुळेही पर्यावरणावर दबाव वाढतो. त्यामुळे हवामान अनुकूल जीवनशैलीकडे सामाजिक चळवळ निर्माण करण्याची गरज आहे. पृथ्वीवर मर्यादित संसाधने आहेत, परंतु मानवी गरजा आणि आकांक्षा सतत वाढत आहेत. आता विकासाचा मार्ग निसर्गाच्या विध्वंसातून जाऊ नये, अशी गरज आहे. कॉप -३१ समोरील सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, जग आपल्या हवामान बदलाविरुद्धच्या ठरावांचे ठोस कृतीत रूपांतर करू शकेल का? विकसित देश पुरेशी आर्थिक आणि तांत्रिक मदत देतील का? जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी ठोस पावले उचलली जातील का? गरीब आणि असुरक्षित देशांना हवामान आपत्तींमधून सावरण्यासाठी पुरेशी मदत मिळेल का? या प्रश्नांची उत्तरे संमेलनाचे यश ठरवेल. परिषदेमध्ये होणाऱ्या वैचारिक मंथनातून बाहेर पडणारा संदेश ठरावाच्या पलिकडे जाऊन कृतीत वळला तरच ही परिषद पृथ्वीच्या भविष्यासाठी अर्थपूर्ण ठरेल.

लोकसंसद

नवी मुंबईचे कौतुक आणि अभिनंदन!

गेली अनेक वर्षे देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानणाऱ्या आपल्या नवी मुंबईने अखेर यंदा पहिला क्रमांक पटकावलाच! त्याबद्दल नवी मुंबईचे कौतुक आणि अभिनंदन! केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयामार्फत आयोजित करण्यात आलेल्या १० व्या 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' स्पर्धेत नवी मुंबई शहराने देशभरातील ४७५१ शहरांना मागे टाकत प्रथम क्रमांक पटकावला आहे. यावर्षी सुरत आणि विजयवाडा ही शहरे अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानी राहिली. विशेष म्हणजे गेली सलग आठ वर्षे अव्वल स्थान पटकावणाऱ्या मध्य प्रदेशच्या इंदूरची मक्तेदारी यंदा मोडीत निघाली. महापालिकेची कचरा संकलन आणि ओला-सुका कचरा विलगीकरणाची स्वच्छता यंत्रणा, शास्त्रोक्त प्रक्रिया, सफाई कर्मचारी, क्रियाशील अधिकारी वर्ग, जागृत लोकप्रतिनिधी आणि स्वच्छता मोहिमांमध्ये सक्रिय लोकसहभाग यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे पालिकेला हे यश मिळाले आहे. देशपातळीवर स्वच्छ आणि सुंदर शहर म्हणून मिळालेल्या या सर्वोच्च सन्मानामुळे फ्लेमिंगोचे शहर म्हणून ओळख असलेल्या नवी मुंबईच्या गौरवात अधिक भर पडली आहे. स्वच्छ सर्वेक्षणात देशात अव्वल स्थान मिळवणाऱ्या नवी मुंबईच्या स्वच्छतेचा आदर्श हा राज्यातील इतर शहरांसाठी नक्कीच एक प्रेरणादायी उदाहरण असून राज्यातील इतर शहरे त्याचे अनुकरण करतील अशी अपेक्षा आहे.

-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

लेखक, विधिज्ञ बॅ. मुकुंद रामराव जयकर

लेखक, विधिज्ञ, राजकीय पुढारी, वक्ते आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरु बॅरिस्टर मुकुंद जयकर यांचा जन्म १३ नोव्हेंबर १८७३ रोजी मुंबईत एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला.

मुकुंद रामराव जयकर यांचा पुणे करारावर स्वाक्षऱ्या करणाऱ्या नेत्यांमध्ये समावेश होता. जयकरांचा जन्म एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांनी मुंबईतील एल्फिन्स्टन विद्यालय व सेंट झेवियर महाविद्यालय यांतून शिक्षण घेतले. मुंबई विद्यापीठाच्या अनेक पदव्या त्यांनी संपादन केल्या. वयाच्या चो

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ नोव्हेंबर

१) श्रीम.सुहासिनी रमेश मांजरेकर
मु.सारळ, अलिबाग,
दि.१३-११-१९४२

२) श्रीम.भारती मधुकर म्हात्रे
मु.बामणोली, अलिबाग,
दि.१३-११-१९५०

३)श्री.जगदीश दत्तात्रेय घरत
वरसोली, अलिबाग
दि.१३-११-१९५३

४)श्री.विजयकुमार काशिनाथ पाटील
अलिबाग
दि.१३-११-१९५३

५)श्री.तुळशीदास हाशा वरसोलकर
कोळीवाडा, अलिबाग
दि.१३-११-१९५२

६)श्रीम.चंद्रकला चंद्रकांत देवरूखकर
मु.गोंधळपाडा, अलिबाग
दि.१३-११-१९३९

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

जिल्ह्यातील शेतकरी दुबार शेतीसाठी सज्ज

कडधान्य भाजीपाला लागवडीला प्राधान्य

। महाड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याचे भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाडच्या खाडीपट्ट्यात आता हिवाळ्याची चाहूल लागली आहे. रविवारपासून सकाळी हलकीशी थंडी पडायला सुरुवात झाली असून, भात कापणी आटोपलेल्या शेतकऱ्यांनी आता दुबार शेतीकडे मोर्चा वळवला आहे. दुष्काळाने होरपळूनही न खचता खाडीपट्ट्यातील शेतकरी राजा पुन्हा एकदा शेतात रमला आहे.

भाताचे पीक हातातोंडाशी येऊनही पावसाने दगा दिल्याने मोठे नुकसान झाले. तरीही खचून न जाता शेतकऱ्यांनी आता वाल, पावटा, तूर, मूग आणि इतर कडधान्यासह भाजीपाल्याच्या लागवडीला प्राधान्य दिले आहे. खाडीपट्ट्यातील कडधान्यामधील वाल जिल्ह्याच्या बाजाराबाजारात



पोहोचतो. येथील वालाला विशेष मागणी असते.

भात कापणी होताच शेतकऱ्यांनी वालाच्या बियाण्याची जुळवाजुळव सुरू केली आहे. ओवळे, वलंग, गोमेंडी, चिंभावे, तेलंगे, आदिस्ते, सोनघर, रावढळ परिसरात सध्या शेतात नांगरट, वाफे तयार करण्याची लगबग दिसत आहे.

यंदा पेरणीच्या वेळी पाऊस लांबला. नंतर दुबार पेरणी केली, तेव्हाही पाऊस कमीच पडला. ऐन हंगामात पाऊस गायब झाल्याने निटसा कापणीच्या तोंडावर तर पाऊस गायबच झाला. ज्यामुळे भात पीक चांगले तयार झाले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुष्काळाचे महासंकट कोसळले.

सरकारच्या मदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांनी स्वबळावर कापणी उरकली आणि आता पुन्हा दुबार शेतीत उतरले आहेत. भात शेतीत झालेल्या नुकसानीची भरपाई दुबार शेतीतून होईल, अशी आशा आहे. मात्र पुन्हा कोणतेही नैसर्गिक संकट उभे राहू नये, एवढीच अपेक्षा आहे. दिवाळीच्या पहिल्याच दिवशी थंडीने हजेरी लावल्याने दिवाळीचा आनंद आणि शेतात दुबार पिकाची लगबग, असे चित्र सध्या खाडीपट्ट्यात पाहायला मिळत आहे.

दरम्यान, दुबार शेतीच्या कामात यंदा महिला शेतकऱ्यांचा सहभाग लक्षणीय वाढला आहे. सकाळी थंडी असतानाही महिला शेतात वाफे तयार करणे, बियाणे टोकणे, पाणी देणे या कामात आघाडीवर आहेत. भात कापणीच्या काळात कुटुंबासह राबणाऱ्या या महिला आता पुन्हा दुबार शेतीसाठी सज्ज झाल्या आहेत. शेतकरी कुटुंबाची हीच जिद्द खाडीपट्ट्याची खरी ओळख आहे.

वालाला मोठी मागणी

खाडीपट्ट्यातील वालाला केवळ रायगडच नाही, तर ठाणे, मुंबईच्या बाजारातही मोठी मागणी आहे. गेल्या वर्षी वालाला चांगला भाव मिळाल्याने यंदा शेतकऱ्यांनी वालाचे क्षेत्र वाढवले आहे. एकरी ८ ते १० हजार रुपये खर्च येऊनही वालातून चांगले उत्पन्न मिळते, असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे.

उल्हास नदीसाठी जनआक्रोश

। बदलापूर । प्रतिनिधी ।

उल्हास नदीच्या वाढत्या प्रदूषणाविरोधात नागरिकांचा आवाज बुलंद करण्यासाठी उल्हास नदी बचाव समितीने बदलापुरात 'एक सही संतापाची' ही जनआक्रोश मोहीम हाती घेतली आहे. नदीपात्रात मिसळणारे रासायनिक सांडपाणी, वाढता कचरा आणि अलीकडेच मृतावस्थेत आढळलेले मासे यामुळे नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर सह्यांच्या माध्यमातून नागरिकांचा संताप आणि नदी संवर्धनाची मागणी प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचा समितीचा प्रयत्न आहे. उल्हास नदीचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत असल्याबद्दल पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. नदीत सोडले जाणारे रासायनिक सांडपाणी आणि कचऱ्यामुळे जलप्रदूषणाचा धोका वाढला आहे. नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी केवळ तक्रारी आणि निवेदने देऊन उपयोग होणार नाही. नागरिकांचा व्यापक सहभाग आणि प्रशासनावर जनदबाव निर्माण होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने समितीने सह्यांची मोहीम आयोजित केली आहे. नदीचे प्रदूषण थांबवावे, नदीपात्राचे संरक्षण करावे आणि प्रभावी संवर्धन उपाययोजना राबवाव्यात, या मागण्यांना नागरिकांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न मोहिमेतून केला जाणार आहे.

पर्यटनस्थळे पर्यटकांनी हाऊसफुल्ल

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

दिवाळीनिमित्त कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात पर्यटकांची मोठी गर्दी सुरू झाली आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगली येथून लाखोंच्या संख्येने पर्यटक दिवाळीच्या सुट्ट्या घालवण्यासाठी अन् दिवाळी साजरी करण्यासाठी कोकणात दाखल झाले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील लॉज, हॉटेल, होम-स्टे, रिसॉर्ट जवळपास हाऊसफुल्ल झाले आहेत. भाट्ये, मांडवी, आरेवारे, गणपतीपुळे, दापोली, गुहागर येथील समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची मोठी गर्दी दिसून येत आहे.

शाळा, महाविद्यालयांना सुट्ट्या लागल्या आहेत.



त्यामुळे पर्यटक पर्यटनासाठी मोठ्या प्रमणात बाहेर पडत आहेत. त्यामुळे रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटकांचा महापूर पाहावयास मिळत आहे. रत्नागिरी शहरातील थिबा पॅलेस, मांडवी बीच, भाट् आरे-वारे, रत्नागिरी, गणपतीपुळे, दापोली, गुहागरला पसंती गणपतीपुळे, दापोली, गुहागर, आरे-वारे, रत्नागिरी शहराला पसंती दिली आहे.

गणपतीपुळे मंदिर परिसरात दर्शनासाठी भक्तांची लांबच लांब रांग लागली आहे. समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची गर्दी दिसत आहे. दापोलीतील लाडघर, कर्दे, मुरुड, केळशी बीचवरही पर्यटकांनी गर्दी केली आहे. गुहागरच्या वेळणेश्वर, हेदवी, बामणघळ येथेही पर्यटकांची वर्दळ वाढली आहे. आरे-वारे बीचवर तरुणाईचा मोठा वावर आहे. सेल्फी, फोटो, बोटिंग, वॉटर स्पोर्ट्ससाठी पर्यटकांची गर्दी होत आहे.

मुलांच्या चेहऱ्यावर फुलला आनंद

पनवेल : दिवाळीचा आनंद प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचावा आणि आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही चिमुकल्याचा सण हिरावला जाऊ नये, या भावनेतून संतोष भगत यांनी यंदाही मुलांना फटाक्यांचे वाटप केले. फटाके हातात पडताच मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उत्साह या उपक्रमाचे खरे समाधान ठरले. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक मुलांना हा आनंद मनसोक्त घेता येत नाही. हीच बाब लक्षात घेऊन भगत मुलांसाठी फटाके वाटपाचा उपक्रम राबवतात.

पाचाडमध्ये महिलांना साडीचोळीची भेट

। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।

रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पाचाडमध्ये दिवाळीनिमित्त भाऊबीजेचा अनोखा सोहळा उत्साहात पार पडला. कष्टकरी महिलांचा साडीचोळी देऊन सन्मान करत मावळा जवान संघटनेने राजमाता जिजाऊ यांना मानवंदना दिली. शेकडो पणत्यांचा दीपोत्सव, पारंपरिक लोकगीते आणि जय शिवराय, जय जिजाऊच्या जयघोषाने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. या सोहळ्यात चारशेहून अधिक कष्टकरी महिलांचा सन्मान करण्यात आला. पाचाड येथील राजमाता जिजाऊ यांच्या समाधीस्थळी



दिवाळीनिमित्त मावळा जवान संघटनेच्या वतीने अनोख्या भाऊबीज सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कष्टकरी महिलांचा साडीचोळी देऊन सन्मान करत राजमाता जिजाऊ यांना मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी सुनंदा पवार, सुशीला शिगवण, सुलोचना घाडगे यांनी पारंपरिक लोकगीते सादर केली. या गीतांमधून त्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या शौर्याचा आणि त्यागाचा इतिहास उलगडला. या कार्यक्रमास ॲड. नरसिंह लगड, रोहित नलावडे, अक्षय सातपुते आदी उपस्थित होते.

विषारी पाण्याने हजारो माशांचा मृत्यू

डोंबिवली : ठाणे जिल्ह्याची जीवनवाहिनी असलेल्या उल्हास नदीला प्रदूषणाचा विळखा पडला असून, जांभूळ गावाजवळ नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर मृत माशांचा खच पडल्याचे दिसून आले आहे. रासायनिक सांडपाण्यामुळे हा भयंकर प्रकार घडल्याचा संशय व्यक्त होत असून, या जलप्रदूषणामुळे केवळ आदिवासी बांधवांच्या मासेमारीवरच गदा आली नाही, तर संपूर्ण ठाणे जिल्ह्याच्या आरोग्यालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. सकाळी मासेमारीसाठी नदीवर गेलेल्या स्थानिक मच्छीमारांना नदीचे पाणी नेहमीसारखे न दिसता



वेगळ्याच रंगाचे आणि दुर्गंधी येणारे दिसले. कर्जतपासून निघणारी आणि बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण डोंबिवली मार्गे ठाण्यापर्यंत वाहणारी ही उल्हास नदी म्हणजे ठाणे जिल्ह्यातील सात महानगरपालिकांमधील जवळपास एक कोटी नागरिकांची जीवनवाहिनी आहे.

'रील'च्या नादात तरुण जखमी

। पालघर । प्रतिनिधी ।

दिवाळीत समाजमाध्यमांवर रील बनवण्याच्या नादात सोमवारी (दि.९) २१ वर्षीय तरुणाच्या हातात स्काय शॉट फटाका फुटून तो गंभीर जखमी झाला. या दुर्घटनेत त्याच्या हाताला दुखापत झाली असून, डॉक्टरांनी शस्त्रक्रियेदरम्यान तब्बल ७२ टाके घातले आहेत. वसई पूर्वेच्या मधुबन इमारत परिसरात विनीत कुमार हा कामाचा ठेकेदार म्हणून काम करतो. समाजमाध्यमासाठी काहीतरी वेगळा व्हिडिओ बनवण्याच्या प्रयत्नात त्याने हवेत उडवला जाणारा स्काय शॉट फटाका हातात धरून पेटवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो हवेत उडण्याऐवजी त्याच्याच हातात फुटला. त्यामुळे त्याचा हात गंभीररीत्या भाजला असून, मोठी दुखापत झाली. या घटनेनंतर कुटुंबीयांनी त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला दोन रुग्णालयांनी त्याला दाखल करून घेण्यास नकार दिल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. त्यानंतर त्याला वसई पश्चिमेतील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी सुमारे पाच तास शस्त्रक्रिया करून त्याच्या हातावर उपचार केले. या शस्त्रक्रियेदरम्यान त्याला ७२ टाके घालण्यात आले.

वाहनतळावर मद्यपींचा वावर

पनवेल : तळोजा येथील पेठाली मेट्रो स्थानकाच्या वाहनतळ परिसरात रात्रीच्या वेळी मद्यपींचा वावर वाढल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मद्यप्राशन केल्यानंतर दारूच्या बाटल्या फोडून निघून जाण्याचे प्रकार घडत असल्याने परिसरात काचेचे तुकडे पसरले आहेत. यामुळे वाहनचालकांना दुखापत होण्याची शक्यता असून, वाहनतळाच्या सुरक्षेसाठी तातडीने सुरक्षारक्षक नेमावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

आदिवासी वाड्यांवर दिवाळी फराळाचे वाटप



। पनवेल । प्रतिनिधी ।

दिवाळीचा आनंद समाजातील वंचित आणि गरजू घटकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने शिवशक्ती मित्र मंडळ, पनवेल यांच्या वतीने आदिवासी वाड्यांमध्ये दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. सिमरन मागील आदिवासी वाडी तसेच एचओसीजवळील आदिवासी वाडीतील गरीब व गरजू कुटुंबांना फराळ देऊन मंडळाने सामाजिक बांधिलकी जपली. सणासुदीच्या काळात समाजातील दुर्लक्षित घटकांचाही आनंदात सहभाग असावा, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. फराळाचे साहित्य मिळाल्यानंतर आदिवासी कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. समाजातील गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचवून त्यांच्या घरातही दिवाळीचा आनंद फुलवण्याचा मंडळाचा प्रयत्न होता. या उपक्रमावेळी रमेश गुडेकर, संदीप पाटील, रवी गोरे, खंडेश धनावडे, समीर कदम, देवेंद्र तळेकर, सचिन कदम, प्रशांत नरसाळे, अरुण ठाकूर, संतोष तळेकर, अनिकेत जाधव, निखिल जाधव, निलेश सांमेल, स्वराज कदम उपस्थित होते.

राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान | ४,७५१ शहरांना मागे टाकात मिळवला पुरस्कार

नवी मुंबई देशात सर्वोत्कृष्ट स्वच्छ शहर

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

'निश्चय केला, नंबर पहिला! हे ध्येय उराशी बाळगून गेल्या तीन-चार वर्षांपासून आखलेली नियोजनबद्ध रणनीती, अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड, अधिकारी -कर्मचाऱ्यांची पराकाष्ठा सर्वांच्या बळावर नवी मुंबई शहराने यशाचे महाशिखर गाठले आहे.

केंद्र सरकारच्या शहरी गृहनिर्माण व विकास मंत्रालयाच्या वतीने 'स्वच्छ भारत मिशन (शहरी)'अंतर्गत आयोजित 'स्वच्छ सर्वेक्षण



२०२५-२६'मध्ये नवी मुंबई महापालिकेने देशातील तब्बल ४,७५१ शहरांना मागे टाकत 'सर्वोत्कृष्ट स्वच्छ शहर' या बहुमानावर आपले नाव कोरले. नवी दिल्लीतील विज्ञान भवनमध्ये आयोजित भव्य पुरस्कार प्रदान समारंभात देशाच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी हा मानाचा पुरस्कार अत्यंत अभिमानाने स्वीकारला. याप्रसंगी दशरथ भगत, आयुक्त डॉ. कैलास शिंदे, शिरीष आरदवाड उपस्थित होते.

> "नवी मुंबईने स्वच्छतेच्या कामात अत्याधुनिक तंत्रज्ञानाची दिलेली जोड आणि त्याला मिळालेली लोकसहभागाची साथ याचा राष्ट्रीय पातळीवर सखोल विचार करण्यात आला. याच सातत्यपूर्ण कामगिरीमुळे नवी मुंबई आज देशात पहिल्या क्रमांकावर विराजमान झाली आहे.
> -डॉ. कैलास शिंदे आयुक्त"

प्लॅस्टिकबंदी

प्लॅस्टिक प्रतिबंधात्मक कडक उपाययोजना आणि विद्यार्थी, युवक व नागरिकांच्या सहभागातून राबवलेले व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

पाण्याचा पुनर्वापर

सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाण्याच्या पुनर्वापरावर दिलेला विशेष भर देण्यात आला आहे.

निवडक



आदिवासी कुटुंबाचे घर जळून खाक

ठाणे : दिवाळीनिमित्त सर्वत्र घराघरांत दिव्यांची रोषणाई, फराळाची लगबग आणि आनंदाचे वातावरण असताना वाघाडीच्या भीमबांध परिसरात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. दुपारच्या सुमारास जानकी बसवत यांच्या घराला अचानक आग लागल्याचे निदर्शनास आले. पाहता पाहता आगीने भीषण रूप धारण केले. घरातून आगीच्या मोठमोठ्या ज्वाळा आणि धुराचे लोट बाहेर पडू लागल्याने परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांनी उपलब्ध साधनसामग्रीच्या मदतीने आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, आगीची तीव्रता अधिक असल्याने काही वेळातच संपूर्ण घर आगीच्या विळख्यात सापडले. घरातील साहित्य बाहेर काढण्याची संधीही मिळाली नाही. त्यामुळे धान्य, कपडे, भांडी आणि कष्टाने उभा केलेला संसार क्षणार्धात राखेत बदलला. सुदैवाने, आग लागली त्यावेळी घरात कुटुंबातील कोणतीही व्यक्ती उपस्थित नसल्याने मोठी जीवितहानी टळली.



आदिवासी कुटुंबांची दिवाळी गोड

कर्जत : आदिवासी सेवाभावी सामाजिक संस्था आणि आदिवासी ठाकूर समाज संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने नेरळ येथील माणगाव वाडीतील ८० आदिवासी कुटुंबांना दिपावली भाऊबीजनिमित्त दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. दुर्गम भागातील गरजू कुटुंबांना दिवाळीचा आनंद घेता यावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी माणगाववाडीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. फराळ मिळाल्याने लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. या कार्यक्रमास दादा पादीर, कांता पादीर, अर्जुन केवारी, नितीन निरगुडा, जयवंती हिंदोळे, सुनील पारधी, गणेश पारधी, मधुकर ढोले, दत्तात्रय हिंदोळे, सोमा निरगुडे, बाळू भगत, मंगळ केवारी, बबन निरगुडा, सुरेश केवारी, उत्तम पादीर, दशरथ निरगुडा, विजय बांगारे, जयवंत उघडे, तातू पादीर, राम बांगारे,तुळशीराम निरगुडा, मोतीराम पादीर, नितीन पारधी आदी उपस्थित होते.



भाऊबीजनिमित्त महिलांना साडीवाटप

नवीन पनवेल : दिवाळीचा सण सर्वांच्या जीवनात आनंद, उत्साह आणि प्रकाश घेऊन येतो. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे अनेक कष्टकरी कुटुंबांना सण साजरा करताना अडचणींचा सामना करावा लागतो. अशा गरजू महिलांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलवण्यासाठी लायन ग्रुप महाराष्ट्र राज्याच्या वतीने पनवेलमध्ये वीटभट्टी, बिगारी काम करणाऱ्या महिलांना तसेच कसळखंड आदिवासी वाडी, आदई आदिवासी वाडीत साड्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास नीता माळी, अर्जुन जाधव, संतोष बेलदार, विजय म्हात्रे, नंदकुमार कांबळे, सोमनाथ पाटील, विकास कदम, आसिफ शेख, बाळू दिघाटी, जय पगारे, सदानंद धरणेकर, प्रमोद म्हात्रे, नयना, तबसूम, शोनाझ, अंकुश चौधरी, विजय रहाटे, सुशील म्हात्रे, रंगनाथ पाटील, आदित्य वर्मा, रवींद्र फडके, चेतन गायकर, गिरीश घाडीकर, विनोद जायकर, विजय पाटील आदी मान्यवर व लायन ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.



सिद्धेश्वरीत मराठी गीतांची संगीताची मैफल

रसायनी : रसायनी-पाताळगंगा परिसरातील विजय सामाजिक संस्था (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने चांवढोली येथील दिवा ॲटिलिया सोसायटीमध्ये मराठी गीतांची सुरेल संगीतमय मैफल आयोजित करण्यात आली होती. या संगीत मैफलीमध्ये गायिका वैष्णवी पाटील तसेच गायक राहुल खरे यांनी आपल्या सुमधुर आवाजातून एकापेक्षा एक लोकप्रिय मराठी गीतांची मेजवानी सादर केली. त्यांच्या गायनाने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. संपूर्ण वातावरण संगीतमय झाले होते. या कार्यक्रमाला सतीश जोगदंड, ऋषिकेश दुधाळे, चिन्मय पाठक, राहुल शिंदे यांनी वादनाची साथ दिली. या कार्यक्रमाचे आयोजन विजय मुरकुटे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. सामाजिक उपक्रमांसोबतच सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांना मनोरंजनाची संधी उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा हा स्तुत्य उपक्रम ठरला.

ग्रीलमध्ये अडकलेल्या कुत्र्याची सुटका

नवीन पनवेल : तळोजा जेल रोडवरील सेंट्रल पार्कच्या तिसऱ्या लोखंडी ग्रीलच्या गेटमध्ये १० नोव्हेंबर रोजी एका मोठ्या कुत्र्याचे डोके अडकले होते. या प्रकाराची माहिती मिळताच सिडको अग्निशमन केंद्र, खारघर येथील पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. आणि त्यांनी सुरक्षितपणे येथील ग्रील कापून कुत्र्याची सुटका केली. अग्निशामक दलाच्या जवानांनी आधी घाबरलेल्या कुत्र्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. चावण्याचा धोका टळावा आणि त्याला इजा होऊ नये म्हणून तोंडाभोवती कापड गुंडाळण्यात आले. त्यानंतर स्प्रेडर व कटरच्या साहाय्याने गेटचे ग्रील कापून कुत्र्याची सुरक्षित सुटका करण्यात आली. या बचावकार्यात प्रणेता दरेकर, अजय वाघ, संभाजी पाटील, अभिषेक पाटील, नितीन कीर्तने दीपक पाटील यांनी सहभाग घेतला.



माणगावकरांना एक दिवसाआड पाणीपुरवठा

● काळ नदीचे पात्र कोरडे ● पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नगरपंचायतीचा निर्णय

। माणगाव । प्रतिनिधी ।

सणासुदीच्या आनंदात रमलेल्या माणगावकरांसमोर आता पाणीटंचाईचे गंभीर संकट उभे राहण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. अपुरा पाऊस, सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यांत पावसाने फिरवलेली पाठ आणि नोव्हेंबरमध्येही कायम असलेला उन्हाचा कडाका यामुळे शहराच्या जलस्रोतांवर ताण वाढू लागला आहे. याचे गांभीर्य ओळखून माणगाव नगरपंचायतीने दिवाळीनंतर शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतल्याची महत्त्वपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे. गुरुवारी (दि.६) नोव्हेंबर रोजी नगरपंचायतीच्या



पाणीपुरवठा विभागातील संबंधित अधिकारी बुवा यांच्याकडे याबाबत विचारणा केली असता, एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. निर्णय अधिकृत असल्याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यास दुजोरा दिला.

मात्र, दिवाळीचा सण असल्याने ऐन सणासुदीच्या काळात नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी या निर्णयाची अंमलबजावणी दिवाळीनंतर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत नगरपंचायतीकडून स्वतंत्र अधिकृत घोषणाही केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

माणगाव शहराची जीवनवाहिनी असलेल्या काळ नदीच्या पाणीपातळीत मोठी घट होत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. नदीपात्रातील पाणी आटू लागल्याने अनेक ठिकाणी दगड उघडे पडले आहेत. पावसाळा संपल्यानंतर अपेक्षित जलसाठा निर्माण न झाल्याने आगामी उन्हाळ्यात पाणीपुरवठा कसा सुरळीत ठेवायचा, हा नगरपंचायतीसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यांत अपेक्षित पाऊस झाला नाही. त्यातच नोव्हेंबरमध्येही उन्हाचा तडाखा कायम असल्याने जलस्रोतांमधील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होण्याची शक्यता आहे.

पाणी बचतीसाठी जनजागृती

दरम्यान, पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन करणारा नगरपंचायतीच्या नावाने प्रसारित होत असलेला ध्वनिसंदेश नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. वाहन धुणे, रस्ते धुणे तसेच झाडांना अनावश्यक पाणी घालणे टाळावे, असे आवाहन त्यातून करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनानेही कमी पर्जन्यमान आणि संभाव्य दुष्काळी परिस्थितीची दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील पिण्याच्या पाण्याचे नियोजन आतापासूनच करण्याची वेळ आली आहे.

दिवाळीच्या रोषणाईत आनंदोत्सवात सहभागी होत असतानाच माणगावकरांनी येणाऱ्या पाणीटंचाईच्या संकटाचे गांभीर्यही लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे पाणीटंचाईचे संकट ऐन उन्हाळ्यात अधिक तीव्र होण्याची वाट न पाहता आतापासूनच प्रत्येकाने पाणी बचतीची सवय अंगीकारणे गरजेचे आहे.

वाहन धुण्यासाठी, रस्ते स्वच्छ करण्यासाठी पिण्याचे पाणी वापरणे टाळावे. घरगुती वापरातील पाणी काटकसरीने वापरावे आणि उपलब्ध जलसाठ्याचे जतन करावे. नगरपंचायतीने केलेल्या नियोजनाला नागरिकांनी सहकार्य केल्यास उपलब्ध पाण्याचा अधिक काळ योग्य विनियोग करणे शक्य होईल.

काळ नदीचे आटणारे पात्र आजच धोक्याची घंटा वाजवत आहे. ही घंटा ऐकून प्रत्येक माणगावकराने पाण्याचा एकेक थेंब जपण्याचा संकल्प करण्याची वेळ आली आहे

निवडक



संत ज्ञानेश्वर पायी दिंडीचे आयोजन

चिरनेर : संत ज्ञानेश्वर महाराज पायी कोकण दिंडी भाताणपाडा पनवेल परिसर ते देवाची आळंदी अशा पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या नियोजित दिंडीचे शुक्रवारी (दि.२७) भाताणपाडा येथून पायी दिंडीचे प्रस्थान होणार आहे. याआधी गुरुवारी २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी अरुण महाराज पाटील बेलवली यांचे भाताणपाडा येथे कीर्तन होईल. यावेळी भाताणपाडा येथील ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. विशेषतः संत ज्ञानेश्वर महाराज पायी कोकण दिंडी भाताणपाडा पनवेल परिसर ते देवाची आळंदी या दिंडीसाठी सभागृह बांधण्यासाठी पनवेल तालुक्यातील बोर्ले येथील राधाबाई पाटील, महादू पाटील यांच्या स्मरणार्थ सुनिता गायकर, किशोर गायकर, विनोद गायकर, विकास अनंता गायकर यांच्या कुटुंबीयांच्या वतीने ४५ लाख रुपयांची मदत करण्यात आली आहे. माजी आ. बाळाराम पाटील, चेतन म्हात्रे, जनार्दन केणी यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत ४५ लाख रुपये रक्कमेचा धनादेश देण्यात आला. संत ज्ञानेश्वर महाराज पायी कोकण दिंडी भाताणपाडा पनवेल परिसर ते देवाची आळंदी या पायी दिंडीच्या यशस्वी आयोजनासाठी परशुराम माळी, सुरेश पाटील, ज्ञानदेव पाटील, नितीन दिघे, अमित खुटले, संजय मुंढे, भरत भोईर यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.



भाकरवड नदीवर श्रमदानातून बांधला बंधारा

भाकरवड : अलिबाग तालुक्यातील भाकरवड ग्रामस्थांकडून पाणी अडवा पाणी जिरवा या माध्यमातून जवळ पास चारशेहून अधिक महिला पुरुष दोन दिवस एकत्र येऊन श्रमदान करतात. गेल्या ५० ही परंपरा वर्षांपासून सुरू आहे. ग्रामस्थ मंडळ भाकरवडचे अध्यक्ष शंकर पाटील यांच्या नियोजनातून व ग्रामस्थ भाकरवड यांच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी पावसाने दडी मारल्याने पिण्याच्या पाण्यापासून गुरे ढोरेंच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच धुणे भांडी व इतर वापराकरिता लागणाऱ्या पाण्याची कमतरता जाणवत आहे. नोंहेबर ते मे दरम्यान अपुरे पाणी मिळत असते. याकरिता नदीच्या मध्यभागीबंधारे बांधून व्यवस्था करण्याकरिता ग्रामस्थांनी हा निर्णय घेतला. याप्रसंगी ग्रामस्थांनी अशी मागणी केली की, शासनाच्या वतीने या उपक्रमाकडे लक्ष वेधून काही निधी उपलब्ध करून आर्थिक सहकार्य करण्याची अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. या बंधाऱ्यासाठी पिशव्या दर्शन म्हात्रे अनेक वर्ष सेवेच्या स्वरूपात ग्रामस्थांना मिळत आहेत.



एचओसी कॉलनीतील स्वच्छता मोहीम

रसायनी : रसायनी येथील एचओसी कॉलनीमधील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात मोठ्या प्रमाणात पालापाचोळा व कचरा साचला होता. तसेच स्मारकावर धुळीचे थर साचल्याने स्मारकाची दुरवस्था झाली होती. ही बाब लक्षात येताच यूट्यूबर रविशंकर मुनी आणि आदित्य जावरे यांनी तातडीने संपर्क साधून स्मारक परिसर स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेतली. या मोहिमेअंतर्गत स्मारक परिसरातील पालापाचोळा व कचरा हटवून स्वच्छता करण्यात आली. तसेच स्मारक परिसरात विद्युत प्रकाशाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हे आपल्या अस्मितेचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक असून त्याची स्वच्छता व देखभाल राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, या भावनेतून ही मोहीम राबविण्यात आली. विशेष म्हणजे, ही मोहीम केवळ आजपुरती मर्यादित न ठेवता यापुढेही सातत्याने सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत मलेश गुडसे, दिनेश पडवळ, मयूर वायदंडे, संतोष जेठे, किसन राठोड, गणेश पवार, जयराम जोशी यांनी सहभाग घेतला होता.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- घरकामासाठी अर्धवेळासाठी बाई पाहिजे. पगार- ५००० रुपये, संपर्क : ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०
- अलिबाग आवास परिसरामध्ये MST (Multy Skiled Techician+ Housekeeping + Gardner अर्जन्ट पाहिजेत मो. नं 8261066056 / 9370579163
- नागाव येथील हॉटेलसाठी कर्मचारी भरती रिक्त पदे : १) नाईट शिफ्टसाठी पुरूष कर्मचारी २) रिसेप्शनिस्ट ३) किचन हेल्पर (महिला) ४) मोरी कामगार ५) कॅप्टन (रेस्टॉरंट) ६) वेटर ७) ऑलराऊंडर कुक (स्वयंपाकी) कामाचे ठिकाण : नागाव, अलिबाग इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. मो. ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

निवळे-कोलमांडला घाट रस्त्याची दुरवस्था

■ साईडपट्ट्या उखडल्याने अपघाताचा धोका

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

निगडी ते कोलमांडला मार्गावरील निवळे- कोलमांडला या सुमारे दीड किलोमीटर लांबीच्या घाटरस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून, रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या साईडपट्ट्या पूर्णपणे उखडल्या आहेत.तीव्र उतार आणि खराब रस्त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

बांगमांडला ते वेश्वी फेरीबोट मार्गावर जाण्यासाठी हा रस्ता अत्यंत सोयीचा आहे. तसेच कोलमांडला-कारीवणे-आंबेत मार्गे रत्नागिरी जिल्ह्यातील



मंडणगड व दापोली तालुक्यांकडे जाण्यासाठीही या जवळच्या मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे या रस्त्यावर पर्यटकांची वाहने तसेच स्थानिक प्रवासी वाहतूक सातत्याने सुरू असते.

मात्र, रस्त्याच्या साईडपट्ट्या उखडल्याने वाहनांना बाजू देताना मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः घाटातील वळणदार तीव्र उतार आणि अरुंद झालेला रस्ता यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांना मार्ग काढताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरू शकते.

हा रस्ता इतर जिल्हा मार्ग दर्जाचा असून जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येतो. त्यामुळे जिल्हा परिषद बांधकाम विभागाने या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून साईडपट्ट्यांची दुरुस्ती, आवश्यक डागडुजी आणि रस्त्याचे मजबुतीकरण तातडीने करावे, अशी मागणी प्रवासी व स्थानिकांकडून होत आहे. एखादी दुर्घटना घडण्याची वाट न पाहता प्रशासनाने या महत्त्वाच्या मार्गाच्या दुरुस्तीकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा वाहनचालकांकडून व्यक्त होत आहे.

वणी गावातून आठ फुटी अजगराची सुटका

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठण्याजवळील कडसुरे गावचे किशोर शिर्के यांनी बुधवारी (दि.११) नागोठण्याजवळील वणी गावातून आठ फुटी लांबीच्या पंधरा किलोग्राम वजनाच्या अजगराला मोठ्या सीताफिने पकडून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्याचे काम त्यांनी केले. वणी गावातील प्राथमिक शाळेच्या मागील जागेत असलेल्या झाडी झुडपात अजगर दिसून आल्याची माहिती शिर्के यांना दिली. शिर्के यांनी वेळ न घालवता वणी गावात पोहोचले. त्यावेळी शाळेच्या मागे



झाडीझुडपांत अजगर जातीचा साप त्यांना दिसून आला. त्यांनी आपले कौशल्याचा उपयोग करून अजगराला स्थानिक तरुणाच्या मदतीने बाहेर काढले. साधारण अर्ध्या तासात यांनी अजगर सापाला पकडून त्याला जंगलात नेऊन त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडून दिले.

काँक्रिटीकरणाच्या पाण्यामुळे डासांचा प्रादुर्भाव

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

पनवेल येथील दि. बा. पाटील शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सध्या सुरू आहे. त्यातच पाण्याच्या पाइपलाइनमधील पाणी रस्त्याच्या कामासाठी खोदलेल्या खड्ड्यांमध्ये साचत असल्याने परिसरात डासांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव वाढला आहे.

काँक्रिटीकरणासाठी खोदकाम करण्यात आलेल्या ठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती होत असून, आजूबाजूच्या रहिवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः सकाळी आणि संध्याकाळी डासांचा त्रास अधिक जाणवत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. एकीकडे रस्त्याचे काम सुरू असल्याने नागरिकांना वाहतुकीचा त्रास सहन करावा लागत आहे, तर दुसरीकडे साचलेल्या पाण्यामुळे आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

शहरात डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका लक्षात घेता साचलेल्या पाण्याचा तातडीने निचरा करणे आवश्यक आहे. संबंधित यंत्रणेने साचलेले पाणी काढावे, तसेच डास प्रतिबंधक फवारणी करावी, अशी मागणी परिसरातील रहिवाशांकडून होत आहे.

कोकणातील रखडलेले विद्युत प्रकल्प मार्गी लावा

। माणगाव । प्रतिनिधी ।

कोकणाला निसर्गाने भरभरून पाणी दिले, मात्र आजही उन्हाळ्यात अनेक गावांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागते. मुबलक पाऊस, सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि बारमाही वाहणाऱ्या नद्यांचे वरदान लाभलेल्या कोकणात जलसंपत्तीचा योग्य विनियोग झाला असता, तर या भागाचे आर्थिक चित्र निश्चितच बदलले असते. मात्र, नियोजनाचा अभाव, प्रशासकीय दिरंगाई आणि वाढत्या खर्चामुळे अनेक महत्त्वाकांक्षी विद्युत प्रकल्प वर्षानुवर्षे रखडले आहेत. त्यामुळे कोकणाच्या विकासाचे स्वप्न आजही अपूर्ण आहे. हे प्रकल्प तातडीने मार्गी लावावेत, अशी



मागणी माणगाव येथील पत्रकार आणि सामाजसेवक डॉ. मोहन दोशी यांनी केली आहे.

जिल्ह्यातील काळ आणि कुंभे जलविद्युत प्रकल्प हे रखडलेल्या विकासकामांचे ठळक उदाहरण आहे. १४ जुलै १९९८ रोजी या प्रकल्पाला ९८ कोटी ९९ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली. प्रत्यक्ष कामाला २००४ मध्ये सुरुवात झाली. मात्र, काही वर्षांनंतर काम ठप्प झाले. २००४, २००९, २०११ आणि २०२४ मध्ये चार वेळा सुधारित मान्यता देऊनही प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. प्रकल्पाचा खर्च सुमारे दीड हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे सांगितले जाते.

या प्रकल्पासाठी कुंभे, कुंभेची वाडी, छत्री निजामपूर,

डॉ. मोहन दोशी यांची शासनाकडे मागणी

कावळे, बावळे, सांदोशी, सावराट आदी गावांतील शेकडो शेतकरी कुटुंबांना विस्थापन सहन करावे लागले. अनेकांनी आपल्या जमिनी दिल्या; मात्र अपेक्षित मोबदला आणि विकासाचे लाभ अद्याप मिळाले नसल्याची खंत व्यक्त होत आहे. सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाल्याचे सांगितले जात असताना उर्वरित कामाचे भवितव्य अनिश्चित आहे. हा केवळ आर्थिक प्रश्न नसून प्रकल्पग्रस्तांच्या त्यागाशी जोडलेला मानवी प्रश्न आहे.

अवकाळीमुळे वैरणाचा प्रश्न ऐरणीवर

■ शेतातील पेंढा भिजल्यामुळे पशुपालक चिंतेत

। सुधागड । प्रतिनिधी ।

परतीच्या पावसाने भात शेतीचे प्रचंड नुकसान झाल्याने बळीराजा पुरता हातबल झाला आहे. अनेकाचे उभे भात पीक शेतातच कुजले तर काहींचा भात पुन्हा उगवले मात्र, या सगळ्यांमध्ये भाजणी झाल्यावर निघणारा पेंढा उरलाच नसल्यामुळे गुरांच्या वरणीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, त्यामुळे बळीराजा आणि पशुपालक प्रचंड चिंतेत आहेत.

काही जणांना उरलासुरलेला भात काळा पडला आहे, त्यामुळे त्यास बाजारात अत्यल्प किंमत मिळेल तसेच भिजलेल्या पेंढ्यामुळे गुरांची वैरण गेली



आहे, उभे भात पीक सडल्याने आता पेंडाच उरला नाही शिवाय भिजल्याने तो खाण्यायोग्य व साठवण्यासाठी योग्य राहिला नाही मग आता पशुधनाला खायला तरी काय घालायचे कारण पावसाळ्यानंतर जनावरासाठी पेंडा हे महत्त्वाचे खाद्य आहे पण आता पेंडाच नसल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठी चिंता निर्माण झाली आहे.

आता पशुधनाला पेंड्याऐवजी सरकी किंवा शेंगदाणा पेंड किंवा सोयाबीन ढेप आधी पर्यायी खाद्य जावे लागेल. मात्र, त्यांच्या किमती प्रचंड आहेत तसेच उपलब्ध असलेल्या पेंढ्यांचे भाव देखील वाढले आहेत. परिणामी आधीच गांजलेल्या शेतकरी पशुपालकांना अतिरिक्त खर्चाचा भार पडणार आहे. शिवाय दूध व्यवसायाचे नुकसान होणार आहे.

शेतकऱ्यांनी खाण्यासाठी ठेव लेला भात खराब झाल्याने त्याच्यावर उपासमारीची वेल आली आहे तसेच हाती पैसा नसल्याने कुटुंबाचा खर्च कसा भागवायचा हीदेखील भ्रांत शेतकऱ्यांना पडली आहे आणि आता दूध दुखते पदार्थ विकून शेतकऱ्यांना काही प्रमाणात आर्थिक हातभार लागतो तो देखील पेंड्या अभावी कमी होणार आहे. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना शेतीच्या नुकसान भरपाईवर जनावरांच्या खाद्याची व्यवस्था देखील करावी तसेच गरज असले तेथे चारा छावण्या उभाराव्या अशी मागणी सुधागड तालुका कृषी मित्र संघटनेचे अध्यक्ष शेतकरी शरद गोळे यांनी केली आहे.

जिल्हा पर्यटकांनी गजबजला

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात पर्यटक दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील समुद्रकिनारे पर्यटकांनी गजबजले आहेत.

पर्यटकांची रेलचेल वाढल्याने पर्यटन हंगामाला सुगीचे दिवस आले आहेत. अलिबाग, मुरुड, दिवेआगर, श्रीवर्धन परिसर पर्यटकांनी बहरले आहेत. त्यामुळे हॉटेल, कॅटेज, रेस्टारंट व्यवसाय तेजीत आहेत.

श्रमदानातून पाणी अडवण्याचा निर्धार | उन्हाळ्यात पाणीटंचाईवर मात करण्याचा प्रयत्न

जिल्ह्यात वनराई बंधाऱ्यांची जलक्रांती

। माणगाव । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याला निसर्गाने डोंगरदऱ्या, नद्या, नाले आणि मुबलक पावसाचे वरदान दिले आहे. मात्र, पावसाळ्यात डोंगरमाथ्यावरून वेगाने वाहून जाणारे पाणी उन्हाळ्यात मात्र अनेक गावांना पाणीटंचाईच्या संकटात ढकलते. पावसाचे पाणी अडवून त्याचा उपयोग गावाच्या भविष्यासाठी करण्याची गरज ओळखून रायगड जिल्ह्यात वनराई बंधारे उभारण्याची मोहीम वेगाने राबविण्यात येत आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविण्याच्या या उपक्रमातून ग्रामीण भागात जलसंधारणाची नवी आशा निर्माण झाली आहे.



जिल्ह्यात संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने एकूण १,२५० वनराई बंधारे उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

आतापर्यंत ९७४ बंधाऱ्यांची उभारणी पूर्ण झाली आहे. उर्वरित बंधाऱ्यांची कामे सुरू आहेत. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० अंतर्गत लोकसहभाग आणि श्रमदानाच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात येत आहे.

पाणी अडविण्याच्या या लोकाभिमुख उपक्रमाची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने राज्यस्तरावरही प्रयत्न होत आहेत. या संकल्पनेला ज्येष्ठ समाजसेवक आणि जलसंधारणाचे पुरस्कर्ते डॉ. मोहन धारिया यांच्या कार्यातून व्यापक प्रेरणा मिळाली. ग्रामस्थ, युवक, महिला मंडळे, ग्रामपंचायती आणि प्रशासन एकत्र आले तर श्रमदानातून गावागावांत बंधारे उभारता येतात.

वनराई बंधारे म्हणजे केवळ मातीच्या गोण्यांनी तयार केलेली पाण्याची भिंत नव्हे, तर भविष्यातील पाणीटंचाईविरुद्ध उभारलेली सामूहिक आशेची भिंत आहे. यामुळे विहिरींची पाणीपातळी टिकविण्यास, जनावरांना पाणी उपलब्ध होण्यास आणि शेतीला सिंचनाचा आधार मिळण्यास मदत होऊ शकते. टँकरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठीही हा उपक्रम महत्त्वाचा ठरू शकतो.

लोकसहभागातून जागराची आवश्यकता

माणगाव तालुक्यात भाले येथे काळ नदीवर ग्रामस्थांनी श्रमदानातून बंधारा उभारला असून भुवन गावातही जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. महाड आणि पोलादपूर परिसरात गांधारी नदीसह विविध ओढ्यांवर बंधारे उभारून पाणी अडविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. श्रीवर्धन, पेण, अलिबाग, मुरुड, तळा, कर्जत, रोहा, म्हसळा, सुधागड, खालापूर, उरण आणि पनवेल परिसरातही या मोहिमेला लोकसहभाग मिळत आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल १) संग्रामसिंह सर्जेराव पाटील २) राखी संग्राम पाटील, १ व २ राहणार- सन ११/३, फ्लॅट नं बी-३०२, अंबर ग्रीन, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, आंबेगाव बीके (भाग) (एन. वी.), पुणे, ४११०४६ यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक नितीन अशोक कुंटे यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै)
नागांव, ता.अलिबाग	२४२२	०-०७-१० जिरायत ०-३०-५० बागायत **०-०२-०० पो.ख.** ०-३९-६० एकूण	१२.६९

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये नितीन अशोक कुंटे यांच्या नावे असणारे एकुण क्षेत्र ०-१५-२० हे.आर., आकार ४ रू ७२ पैसे या बागायत जमिन मिळकतपैकी ०-०७-९० हे.आर. हि जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक १२/११/२०२६
सही/- अशील
१) संग्रामसिंह सर्जेराव पाटील
२) राखी संग्राम पाटील
१ व २ राहणार- सन ११/३, फ्लॅट न बी-३०२, अंबर ग्रीन, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, आंबेगाव बीके (भाग) (एन.वी.) पुणे ४११०४६

अॅड राहूल रमेश नाईक
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र.९९२२७९८५२८

जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मोजे मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकती, परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या असून, सदरील जमिन मिळकती, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

माझे अशिलांना खाली परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील जमिन मालकांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु. पैसे)	जमिन मालकांचे नाव
मांडला ता. मुरुड.	७१/२/१	०-२८-०० एकूण	४-५३	सौ. अश्विनी सतीश पाटील, श्री. विलास नारायण बांदिवडेकर
मांडला ता. मुरुड.	७१/२/२	०-४०-०० एकूण	७-०५	सौ. अश्विनी सतीश पाटील, श्री. विलास नारायण बांदिवडेकर

अलिबाग,
दिनांक : १२/११/२०२६

सही/-
(अॅड. सिद्धार्थ संजय भगत)
हिराबाग सोसायटी,
ए विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.

- जाहीर नोटिस-

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीने कळवण्यास येते की, मौजे आवास, ता.अलिबाग, येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, मिळकतीचे सामाईक विद्यमान मालक दाराब आर.तल्यारखान यांचे सामाईक मालकीच्या आहेत.

मिळकतीचे वर्णन

मालक	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै)
उर्मिला दाराब तल्यारखान दाराब आर.तल्यारखान	२९३/२	१-००-०० पो.ख.०-२५-९० एकूण १-२५-९०	११.१०/-
उर्मिला दारातल्यारखान दारा आर. तल्यारखान	३०२	०-५०-६० पो.ख.०-११-१० एकूण ०-६१-७०	२.९४/-

सदरहू वर वर्णन केलेल्या जमीन मिळकती मध्ये दाराब आर. तल्यारखान यांचा अविभाज्य हिस्सा असून हा या जाहिर नोटिसचा विषय आहे.

सदर मिळकतीचे टायटल क्लिअर (मालकी हक्क), टायटल क्लिअरन्स सर्टिफिकेट देण्याकरीता व मालकी हक्काची खात्री करण्याकरीता माझ्या अशिलांनी मला नियुक्त केले असून त्यांनी सदरहू मिळकत पुर्णपणे निर्वेध (free from encumbrance) असल्याचे सांगितले आहे.

तथापि सदर मिळकतीवर किंवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी.

जर मुदतीत कोणचाही आक्षेप न आल्यास सदर मिळकतीचे टायटल पुर्णपणे साफ व निर्वेध (clear and Marketable) आहे असे समजुन आमच्या अशिलांच्या हितासाठी आम्ही टायटल सर्च रिपोर्ट व क्लिअरन्स सर्टिफिकेट जारी करु त्यानंतर आलेले आक्षेप किंवा दावे हे कायदेशिररित्या अवैध मानले जातील व ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१३.११.२०२६

अॅड. मिलींद चव्हाण
आनंद अपार्टमेंट श्रीबाग-३, अलिबाग, ता.अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, खालील वर्णन केलेली भोगवटादार वर्ग -२ शेरा असलेली जमीन मिळकत ही विद्यमान मालक श्री.हसुराम हिरामण पाटील यांचेकडून आमचे अशिलांनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरीत केल्यानंतर कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

जमीन मिळकतीचे वर्णन
मौजे.हमरापुर ता. पेण जि. रायगड येथील जमीन मिळकत

मौजे	स.न.	हि.न.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
हमरापुर	२५	६	००.१५.१० पो.ख.००.०१.३० एकूण ००.१६.४०	३.५६

वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीबाबत इतर कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वत:हून हजर होउन आमचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला असून त्याची आमच्या आशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यास येऊन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

दि. १०.११.२०२६
ठिकाण : पेण

अॅड.उदय प्रकाश मोकल
पत्ता : मु. पो. चिरनेर
ता.उरण जि.रायगड,
पिन कोड : ४११०२०६
मो. ९०८२९११९१३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली स्थावर मिळकत श्री.मनोहर गणपत मुंढे व श्री.तुकाराम गणपत मुंढे दोघेही रा.किल्हा, ता.रोहा जि.रायगड यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीची मिळकत असून सदर मिळकत आमचे अशिलांनी विद्यमान मालकांकडून रजिस्टर्ड करारनाम्याचे दस्ताने खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे व त्या संदर्भात सदर मिळकतीच्या निर्वेध मालकी हक्कांची खातरजमा करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मौजे किल्हा,ता.रोहा, जि.रायगड येथील गट/भुमापन क्रमांक व उपविभाग ४१६, हिस्सा नं.१ जिरायत क्षेत्र ०.४३.७० हे.आर.चौ.मी., वरकस क्षेत्र ०.०७.०० हे.आर.चौ.मी., लागवड योग्य क्षेत्र ०.५०.७० हे.आर.चौ.मी., पोट खराबा क्षेत्र वर्ग (अ) ०.०४.३० हे.आर.चौ.मी., एकूण क्षेत्र ०.५५.०० हे.आर. चौ.मी, आकार रू.८.०७ पैकी जिरायत क्षेत्र हे.आर.चौ.मी. ०.२०.०० ही मिळकत या नोटीसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, रजिस्टर्ड अगर अनरजिस्टर्ड साठेकरार, फरोक्तखत अगर खरेदीखत, हस्तांतरणपत्र, गहाण, दान, बोजा, बक्षीस, मृत्युपत्र, रजिस्टर्ड भाडेपट्टा हस्तांतरणपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र-पोटगी, वारसाहक्क अथवा अन्य प्रकारचा कोणताही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास तसेच सदर मिळकती संदर्भात कोणत्याही न्यायालयात कोणत्याही प्रकारचा वाद प्रलंबित असल्यास आणि सदर नोटीसचा विषय असलेली मिळकत ही न्यायप्रविष्ट असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे त्यांचे नमुद पत्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमुद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात न कळविल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून तसेच सदर मिळकतीशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदीव्यवहार अगर रजिस्टर्ड करारनाम्याद्वारे हस्तांतरण व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या आशिलांवर बंधकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १२.११.२०२६

सही/-
अॅड.जयवंत ह.घरत
एम.ए.एल.एम.एम.
बी/१०२, 'चित्रा-तारांगण'' महर्षी कर्वे रोड, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मानिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक अरविदा उर्फ अरविदाबेन चुनीलाल कोठारी यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे. आर.	आकार रु. पै.
१३	१०	०-२५-००	०-२३

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १३/११/२०२६

अॅड.सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१.

जाहीर हरकत

सर्व जनतेस सदरच्या जाहीर हरकतीने कळविण्यात येते की, आमचे अशिल सुधीर रामचंद्र पवार, रा. मु.पो. गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीच्या मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथे खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

मिळकतीचे वर्णन
मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील

भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (आर चौ.मी.)	आकार (रु.पैसे)	कब्जेदार
३४/२/१	७-६७-६९	७६.७७	मे. कल्याणी क्रिएशन प्रा.लि. तर्फे संजय जनार्दन गांधी
३४/२/२	८-९९-५९	८९.९५	मे. कल्याणी क्रिएशन प्रा.लि. तर्फे संजय जनार्दन गांधी
३४/२/३	९-१२-१५	९१.२१	जान्हवी सुनदिप जगासीया सुनदिप आनंद जगासीया
३४/२/४	२-२२-५७	२२.२५	शशिकांत संभाजी जैतापकर धर्मेंद्र संभाजी जैतापकर सीमा सत्यवान दांडेकर

वर नमुद मिळकतीचा मुळ सर्व्हे नं. १८५ असा आहे. सदर मिळकती मुळ रामचंद्र रघुनाथ पवार यांच्या मालकीच्या मिळकती आहेत. रामचंद्र रघुनाथ पवार हे आमच्या अशिलांचे वडील आहेत. मौजे गोंधळपाडा येथील स.नं.१८५ या मिळकतीमध्ये बेकायदेशीर रित्या संभाजी देऊ जैतापकर यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती.

वर नमुद मिळकती आमच्या अशिलांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीच्या मिळकती आहेत. सदर मिळकतीच्या सातबारा सदरी वरील नोंद केल्याप्रमाणे कब्जेदार यांचे नाव सातबारा सदरी असल्याचा गैरफायदा घेऊन वर नमुद मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तिचा हक्क निर्माण करु पहात आहेत.

वर नमुद मिळकतींबाबत आमचे अशिल दिवाणी व महसुल न्यायालयात दावा/अर्ज दाखल करणार आहेत. त्यामुळे वर नमुद मिळकतीबाबत कोणीही व्यक्तीने, कंपनीने अथवा भागीदारी संस्थेने खरेदीचा व्यवहार करु नये. सदर मिळकतीबाबत कोणीही व्यवहार केल्यास माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व सदरच्या व्यवहाराविरुद्ध आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. १३.११.२०२६

अॅड. प्राची गंगाराम पाटील
रा. ताज हॉटेल जवळ,
जुन्या मराठी शाळेच्या मागे, गोंधळपाडा,
अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९६२३२६०८९५

जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे -बार्णे, ता-कर्जत, जि-रायगड येथील मिळकती, त्या मिळकतीचे मालक श्री.शैलेंद्र चौधरी यांच्या कडून कायम खरेदीखताने घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणेः

सर्व्हे. नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी	आकार रू.पै.
१०/१	०.६७.८० पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे व ताबेकब्जा वहीवाटीचे खाते नं.३१२ चे संपूर्ण क्षेत्र ०.२७.५०	६.४९ २.८९

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्याया खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास, तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि: १३/११/२०२६

वकील
अॅड. सचिन संजय सुर्वे
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
ता.कर्जत, जि.रायगड, ४१०२०१.
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे - बार्णे, ता - कर्जत, जि - रायगड येथील मिळकती, त्या मिळकतीचे मालक श्री शैलेंद्र चौधरी यांच्याकडून कायम खरेदीखताने घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणेः

सर्व्हे.नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी	आकार रू.पै.
११/१	०.८७.९० पैकी लिहुन देणार यांच्या मालकीचे व ताबेकब्जा वहीवाटीचे खाते नं.३०९ ०.५०.००	७.३० ४.४७

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास, तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि : १३/११/२०२६

वकील
अॅड. सचिन संजय सुर्वे
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
ता.कर्जत, जि.रायगड, ४१०२०१.
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक श्री. दिनेश कृष्णा चिले इतर २ रा. पाली सुधागड जि. रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे- आसरे, ता. सुधागड, जि. रायगड

गट नं.	क्षेत्र हे. आर	आकार रू. पैसे
८९	०-५२-००	०-२२

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ११/११/२०२६

सही/-
अॅड. समिर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

दिनांक : १२/११/२०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे- भेरसे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर २४६, क्षेत्र ०-२३-९० हे. आर, पो. ख. ०-०३-०० हे. आर., एकूण क्षेत्र ०-२६-९० हे.आर., आकार ५.८७ रू. पैसे ही जमीन मिळकत, या मिळकतीच्या विद्यमान मालक सविता नंदकुमार ढापरे रा. मु. भेरसे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १२/११/२०२६

(अॅड. संजय द. म्हात्रे)
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आंबेपूर ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री.भगवान नामदेव घोडे यांचेकडून मालकी हक्कांगासह कायम विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रु. पै.)
आंबेपूर	९७/२/३/ब	१-५२-१० पो.ख. ०-०६-६० एकूण १-५८-७०	१०.००

यापैकी श्री. भगवान नामदेव घोडे यांचे नावे असलेले क्षेत्र १-१४-७ हे. आर. आकार ७.११ रु. पै.हि मिळकत

तरीही वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, लीज, कोर्टात दावा, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, भागीदारी, करार-मदार, विसार पावती व हितसंबंध वा कोणत्याही प्रकारे हक्क असल्यास अशा व्यक्तीनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे ॲडव्होकेट यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. वरील मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून सदरचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - अलिबाग
दि. ०६/११/२०२६

अॅड. वैभव गिरीधर पाटील
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु.सांबरी, पो. कुर्डुस,ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ९७/३/१/१/१/१/३, क्षेत्रफळ २-६५-४४ (आर.चौ.मी.) ही बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुनिल मोहन मोकल यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

सदरहू वर्णन केलेली बिनशेती मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतींत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तकार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १०/११/२०२६

सही/-
अॅड. अनिकेत एच. गुरव
पत्ता : श्रीबाग नं. २, अलिबाग, जि. रायगड
ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी, शिवाजी चौक, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं. : ९८५०४०२०५०

प्रोसेस जमा
दि.

अर्जदारतर्फे अॅड. हेमंत मुनेकर

जाहिर नोटीस
अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र. १३८/२०२६

श्रीमती लेखा लिलाधर मोरे — अर्ज

निवडक



वावंढळ येथे काकडा आरती कार्यक्रम

रसायनी : वावंढळ तालुका खालापूर येथे कोजागिरी पौर्णिमा दिवशी पहाटे सुरू झालेला काकडा आरती कार्यक्रम दिवाळी निमित्ताने उजळून निघाला. वावंढळ हे कोयना प्रकल्पग्रस्त गाव असून, येथील विठ्ठल मंदिरात दरवर्षी काकडा आरती होते. पहाटे ४ वाजता वारकरी संप्रदायातील व गावातील महिला पुरुष, तरुण मंदिरात येऊन आरती करतात. कापसाची जाड वात तुपात किंवा तेलात भिजवून तयार केलेल्या मोठ्या मशाली सारख्या ज्योतीला काकडा म्हणतात. या काकड्याने देवाच्या मूर्तीला ओवाळले जाते. काकडा अंधार दूर करून प्रकाश देतो, तसेच माणसाच्या मनातील आळस, अज्ञान आणि वाईट प्रवृत्ती नष्ट व्हाव्यात असा याचा प्रतीकात्मक अर्थ आहे. महाराष्ट्रातील पंढरपूरचे विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, शिर्डीचे साईबाबा मंदिर आणि गावा गावातील मंदिरांमध्ये ही परंपरा आवर्जून पाळली जाते.

३०० कुटुंबांसमवेत दिवाळी साजरी

नेरळ : कर्जत येथील कोठारी क्लासेसच्यावतीने सालाबादप्रमाणे आदिवासी कुटुंबासमवेत दिवाळी साजरी करण्यात आली. कर्जत गौरकामत रस्त्यावरील संजयनगर, वदप वाडी, नांगुर्ले आदिवासी मधील ३०० आदिवासी कुटुंब यांच्यासमवेत दिवाळी सण साजरा



करण्यात आला. दिवाळी निमित्त कोठारी क्लासेसच्या टी.वाय.बी. कॉम.च्या माजी विद्यार्थ्यांचे सहकार्याने फराळ वाटपाचे हे बारावे वर्ष आहे. वदप आदिवासी वाडी, संजयनगर आदिवासी वाडी वदप व नांगुर्ले आदिवासी वाडी येथे एकूण ३०० कुटुंबांना दिवाळी फराळ व मिठाईचे वाटप करण्यात करुन आदिवासी बांधवांसोबत दिवाळी उत्साहात व आनंदात साजरी करण्यात आली. राकेश शाह, राजेश शाह, किरीट शाह, माजी नगरसेवक उमेश गायकवाड, संदिप पाटील, सुभाष पाटील, कैलास पोटे, जयवंत म्हसे, डॉ.प्रशांत सदावर्ते, संजीव ठाकरे व प्रशांत उगले या सर्वांचे विशेष सहकार्य मिळाले. यावेळी रुपेश ठाकरे, शुभम कदम, मितेश डागा, प्रथमेश कुडेकर, अभिजीत जंगम, सौरभ देशमुख, मिलिंद कनोजिया, अंकित सोनावणे, संकेत हर्णे, रोशन देशमुख, श्रुती देशमुख, मयुरी मोरे, राणी लोवंशी व दिपाली कोकले आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते.

शंकरा आय हॉस्पिटलला लाखोंची मदत

पनवेल : सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देणाऱ्या तळोजा येथील विष्टाफूड कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) नवीन पनवेल येथील जुंजुनवाला शंकरा आय हॉस्पिटल या सेवाभावी संस्थेला आर्थिक मदतीचा हात दिला आहे. रुग्णालयातील व्हिजन केअर सेंटरच्या सुविधांच्या विकासासाठी कंपनीच्यावतीने लाखोंचा धनादेश रुग्णालय व्यवस्थापनाकडे सुपूर्द करण्यात आला. विशेष म्हणजे, याच वेळी कंपनीचे व्यवस्थापन सल्लागार आणि सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर सोमण यांनी वैयक्तिक स्तरावरही २५ हजार रुपयांचा धनादेश देऊन सामाजिक बांधिलकी जपली. या कार्यक्रमाला विष्टाफूडचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपिंदर सिंग, कंपनीचे व्यवस्थापन सल्लागार चंद्रशेखर सोमण, डॉ.गिरीश गुणे, रुपाली पिल्लई, राहा जैन आर्दीसह रुग्णालयाचे मुख्य व्यवस्थापक डॉ. राजेश कापसे, डॉ. बुद्राणी आणि भारत विकास परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

सोसायटीच्या नामफलकाचे अनावरण



चिरनेर : मोरावे येथील आई जरी मरी पारंपारिक व्यावसायिक मच्छीमार सहकारी संस्थेच्या नामफलकाचे अनावरण मंगळवारी (दि.१०) आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शनपर भाषणात बोलताना ते म्हणाले की, आगरी-कोळी समाजावर माझे नितांत प्रेम आहे. मच्छीमारांना सरकार दरबारी सुविधा मिळतात, पण त्यासाठी एकत्र येऊन सुविधा मिळवायला हव्यात. मोरावे गावासाठी सिडकोकडून अधिकृत मैदान मिळवून दिले आहे. आता समाज मंदिर आणि इतर विकासकामांचा पाठपुरावा सुरू आहे. मोरावे ग्रामस्थ एकजुटीने राहिले तर त्यांची अनेक प्रलंबित कामे मार्गी लागतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी पनवेल पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, जरी मरी पारंपारिक मच्छीमार व्यावसायिक सहकारी संस्थेचे चेअरमन उत्तम कोळी, सचिव रितेश म्हात्रे, खजिनदार प्रवीण पाटील यांच्यासह पदाधिकारी, तसेच मोरावे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कासाडी नदीवर विकासकांचा घाला

|| दूषित रंग अन् दुर्गंधीचे साम्राज्य || स्थानिकांच्या आरोग्याला धोका

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

पनवेल आणि तळोजा एमआयडीसी परिसरातून वाहणाऱ्या कासाडी नदीच्या परिसरात सिडको तर्फे अनेक विकास कामांसह मोठंमोठ्या इमारती आणि नागरी वसाहती बांधल्या जात आहेत. तसेच, तळोजा औद्योगिक वसाहतीचा विस्तार होत असताना उद्योगधंद्यांची संख्या देखील वाढली आहे. त्यामुळे नदीपात्र परिसर धोक्यात आला आहे. तसेच, येथील नागरी आणि औद्योगिक वसाहतींमधील सांडपाणी थेड कासाडी नदीत सोडले जात आहे. त्यामुळे या ठिकाणी नदीचा रंग बदलला असून, दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. तसेच, प्रदुषीत पाण्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला देखील धोका निर्माण झाला आहे.

पनवेल आणि तळोजा एमआयडीसी परिसरातून वाहणाऱ्या कासाडी नदीच्या उगमस्थानी स्वच्छ आणि निर्मळ पाणी असते. परंतु, ती या परिसरातून वाहताना तिच्या शेवटापर्यंत तिचा रंग बदलल्याचे निदर्शनस येत आहे. अनेक वर्षांपासून कासाडी नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नदीच्या पाण्याचा बदललेला रंग, परिसरात पसरणारी तीव्र दुर्गंधी आणि पाण्यातून निर्माण होणारे प्रदूषण यामुळे नदीकाठच्या ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नदीकडे पाहिल्यानंतर ती नैसर्गिक जलस्रोत आहे की औद्योगिक सांडपाण्याचा प्रवाह, असा प्रश्न उपस्थित होतो. कासाडी नदी प्रदूषण रोखण्यासाठी वेळोवेळी पाहणी, बैठका आणि उपाययोजनांची चर्चा झाली. परंतु, प्रत्यक्षात मात्र नदीच्या पाण्याचा रंग आणि दुर्गंधीचा प्रश्न कायम असल्याचे चित्र नागरिक मांडत आहेत.



ठोस उपाययोजनांची प्रतीक्षा

'नदी वाचवा, पर्यावरण' राखा हे घोषवाक्य केवळ जागतिक पर्यावरण दिनापुरते मर्यादित राहू नये. कासाडी नदीला पुन्हा तिचा नैसर्गिक रंग मिळवून देण्यासाठी प्रशासनाने आता तरी ठोस कृती करावी. तळोजा एमआयडीसी परिसरातून वाहणाऱ्या कासाडी नदीच्या पाण्याचा बदललेला रंग, पुलाच्या बाजूला उभ्या राहत असलेल्या उंच इमारती आणि विकासाच्या झगमगाटात नदीचे अस्तित्व धोक्यात आले असून, प्रदूषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजनांची प्रतीक्षा नागरिक करत आहेत.

नदी म्हणजे केवळ वाहणारे पाणी नव्हे, तर ती परिसरातील पर्यावरणाची जीवनवाहिनी असते. तिच्यावर अनेक जलचर, पक्षी आणि नैसर्गिक परिसंस्था अवलंबून असतात. नदी प्रदूषित झाली तर त्याचा परिणाम केवळ पाण्यावर होत नाही, तर संपूर्ण पर्यावरणावर होतो. त्यामुळे कासाडी नदीचे प्रदूषण हा केवळ एका नदीचा प्रश्न राहिलेला नाही, तर भविष्यातील पिढ्यांच्या आरोग्याचा आणि पर्यावरणाच्या अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे. दरम्यान, या परिसरात विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची कामे करण्यात आली आहेत. एकीकडे कासाडी नदीच्या परिसरात सिडको प्रशासनाकडून मोठंमोठ्या इमारती आणि नागरी वसाहती उभ्या राहत आहेत. पुलाच्या बाजूलाच उंच इमारतींचे जाळे विस्तारत आहे. तसेच, तळोजा औद्योगिक वसाहतीचा विस्तार होत असताना उद्योगधंद्यांची संख्या देखील वाढली आहे. भविष्यात या परिसरात विकासाच्या उंच इमारती दिसतील; मात्र, त्याचवेळी नदीचे अस्तित्व केवळ नकाशावरच उरेल की काय, अशी भीती पर्यावरणप्रेमी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, प्रशासनाने नदीच्या उगमापासून ते अंतिम टप्प्यापर्यंत पाण्याची गुणवत्ता तपासावी, प्रदूषणाचे स्रोत शोधावेत, सांडपाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या यंत्रणांची तपासणी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच, कासाडी नदीच्या संरक्षणासाठी नेमकी कोणती ठोस पावले उचलली गेली? प्रदूषण करणाऱ्या घटकांवर किती कारवाई झाली आणि आजपर्यंत किती निधी खर्च झाला, याचा हिशेब प्रशासनाने जनतेसमोर मांडण्याची गरज आहे. केवळ बैठका आणि आश्वासनांनी नदीचे प्रदूषण थांबणार आहे का, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

स्वच्छतादूतांची दिवस-रात्र धावपळ

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

खांदा वसाहतीतील रस्ते स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी स्वच्छतादूतांची दररोज पहाटेपासून रात्रीपर्यंत धावपळ सुरू असते. 'स्वच्छ रस्ता, आमचा नारा' हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून स्वच्छता कर्मचारी संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी मेहनत घेत आहेत. मात्र, एका बाजूला स्वच्छता कर्मचारी रस्ते साफ करत असताना दुसऱ्या बाजूला काही नागरिकांच्या निष्काळजीपणामुळे पुन्हा अस्वच्छता निर्माण होत असल्याचे चित्र दिसत आहे.

खांदा वसाहतीतील रस्त्यांवर सकाळपासून रात्रीपर्यंत वाहनांची वर्दळ, व्यावसायिकांची लगबग आणि नागरिकांची मोठी ये-जा सुरू असते. या गर्दीत काहीजण गुटखा खाऊन रस्त्यावर थुंकतात, तर काहीजण तंबाखू आणि गुटख्याची पाकिटे रस्त्यावरच फेकतात. त्यामुळे स्वच्छ रस्त्यांवर पुन्हा घाण साचते. सकाळी फिरण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना भटक्या कुत्र्यांनी रस्त्यावर केलेली घाण, तसेच कचऱ्याच्या डब्यांमध्ये तोंड घालून ते उलटे करणाऱ्या कुत्र्यांमुळे निर्माण होणाऱ्या अस्वच्छतेचा सामना करावा लागतो. परिणामी स्वच्छता कर्मचाऱ्यांना पुन्हा त्याच ठिकाणी साफसफाई करावी लागते. विशेष म्हणजे, नागरिकांसाठी स्वच्छ रस्ते उपलब्ध करून देण्याची जबाबदारी केवळ प्रशासनाची किंवा स्वच्छता कर्मचाऱ्यांची नाही. सार्वजनिक रस्ते हे सर्वांचे आहेत. आपण आपल्या घरात गुटखा किंवा तंबाखू खाऊन भिंतींवर थुंकत नाही, घरात कचरा फेकत नाही, मग सार्वजनिक रस्त्यांवर असे वर्तन का, असा सवाल उपस्थित होत आहे.



रो-रो जेट्टीच्या कामाला वेग

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथे महाराष्ट्र सागरी मंडळाच्या माध्यमातून ब्रेकवॉटर, रो-रो जेट्टी तसेच संलग्न सागरी सुविधांच्या उभारणीचे काम सुरू आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे रेवदंडा परिसरातील सागरी वाहतूक आणि किनारी पायाभूत सुविधांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या नियंत्रणाखाली हा प्रकल्प राबविण्यात येत असून, अगवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीकडे कामाची जबाबदारी आहे. एम/एस काशेक इंजिनिअर्स हे या प्रकल्पाचे सल्लागार व अभियंता म्हणून काम पाहत आहेत. या कामाचा प्रारंभ दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आला आहे. करारानुसार पावसाळ्यासह एकूण २४ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, दि.४ सप्टेंबर २०२७ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पांतर्गत ब्रेकवॉटर बांधकाम, रो-रो जेट्टी, ॲप्रोच ट्रेसल, पायलिंगची कामे, किनारा संरक्षण व भराव, प्रीकास्ट काँक्रीटची कामे, पाँटून व लिंकस्पॅन सुविधा तसेच अन्य संलग्न सागरी आणि किनारी सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. सध्या प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर असल्याची माहिती प्रकल्प माहिती फलकावर देण्यात आली आहे.

समाजसेवा केंद्र खुले करण्याची मागणी

। पनवेल । प्रतिनिधी ।

कामोठे सेक्टर २१ येथे सिडकोने सुमारे ४ कोटी रुपये खर्चून उभारलेले बहुउद्देशीय समाजसेवा केंद्र अद्याप नागरिकांसाठी खुले करण्यात आलेले नाही. त्यामुळे हे केंद्र तातडीने सुरू करून नागरिकांना मंगलकार्य, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी प्रहार संघटनेने पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



महिनाभरात केंद्र सुरू न झाल्यास दि.२ डिसेंबरपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा संघटनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष डॉ. सुनील शिरीषकर यांनी दिला आहे. कामोठेकरांना विवाहसोहळे, सामाजिक कार्यक्रम आणि अन्य उपक्रमांसाठी खासगी सभागृह भाड्याने घ्यावे लागत असल्याने सिडकोकडे बहुउद्देशीय सभागृहाची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार सिडकोने २०१८ मध्ये सेक्टर २१ येथे या इमारतीचे बांधकाम पूर्ण केले. मात्र, सहा वर्षांहून अधिक काळ लोटूनही हे केंद्र नागरिकांसाठी खुले झालेले नाही. महापालिकेने या इमारतीत वैद्यकीय सेवा केंद्र आणि डेटा सेंटर सुरू केले असून, मूळ उद्देशासाठी सभागृह उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

पोलिसांची नागरिकांना अनोखी भेट

। पनवेल । प्रतिनिधी ।

गहाळ आणि चोरीला गेलेले मोबाईल शोधून ते मूळ मालकांना परत देण्याची कामगिरी पनवेल गुन्हे शाखा कक्ष ३ ने केली आहे. तांत्रिक तपासाच्या आधारे १०० हून अधिक मोबाईल शोधण्यात आले असून, भाऊबीजेच्या निमित्ताने पहिल्या टप्प्यात ४० नागरिकांना सुमारे १० लाख रुपये किमतीचे मोबाईल परत करण्यात आले. सणासुदीच्या काळात मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने गहाळ मोबाईलच्या तक्रारींचा तपास हाती घेतला होता. मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण, लोकेशन ट्रॅकिंग आणि सायबर तपासाच्या माध्यमातून विविध ठिकाणांहून हे मोबाईल शोधून हस्तगत करण्यात आले. भाऊबीजेच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ४० तक्रारदारांना त्यांचे मोबाईल सुपूर्द करण्यात आले. अनेक दिवसांपासून गहाळ असलेले मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. त्यांनी पोलीस अधिकारी आणि तपास पथकाचे आभार मानले. दरम्यान, पोलिसांनी शोधलेल्या उर्वरित मोबाईलच्या मूळ मालकांशी संपर्क साधण्याची प्रक्रिया सुरू आहे. पुढील टप्प्यात हे मोबाईलही संबंधित नागरिकांना परत करण्यात येणार आहेत.



आदित्य बिर्ला कॅपिटलची शाखा सुरू

पनवेल : आदित्य बिर्ला कॅपिटल लिमिटेडने तळोजा येथे स्वतंत्र गोल्ड लोन शाखा सुरू करून महाराष्ट्रातील व्यवसायाचा विस्तार केला आहे. या शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना सोन्याचे दागिने तारण ठेवून सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने कर्ज उपलब्ध होणार आहे. ट्रान्सयुनियन सिबिलच्या एप्रिलमधील अहवालानुसार, महाराष्ट्रात २०२५ मध्ये गोल्ड लोनच्या प्रमाणात मागील वर्षाच्या तुलनेत ४० टक्के वाढ झाली आहे. देशातील एकूण गोल्ड लोनपैकी ५.८ टक्के कर्ज महाराष्ट्रात वितरित झाले आहे. या पार्श्वभूमीवर तळोजासारख्या औद्योगिक आणि निमशहरी भागात गोल्ड लोन सेवेला चांगली संधी असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

बालकलाकारांनी साकारला पद्मदुर्ग किल्ला

। पनवेल । प्रतिनिधी ।

दिवाळीनिमित्त गडकिल्ल्यांच्या प्रतिकृती साकारण्याची परंपरा जपत करंजाडेतील गणेश नगर परिसरातील बाल कलाकारांनी ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ल्याची हुबेहूब प्रतिकृती उभारली आहे. मेहनतीतून साकारलेल्या या किल्ल्याने परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधले असून, तो पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

कोजागिरी पौर्णिमेच्या मुहूर्तावर किल्ल्याच्या उभारणीला सुरुवात करण्यात आली. शाळा सुटल्यानंतर दररोज रात्री तीन ते चार तास एकत्र येत या मुलांनी किल्ला उभारण्यासाठी मेहनत घेतली. परिसरातून दगड आणि विटा गोळा करून त्यांनी किल्ल्याची बांधणी केली. सलग आठ ते दहा दिवसांच्या परिश्रमानंतर पद्मदुर्गाची आकर्षक प्रतिकृती साकारण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा इतिहास आणि गडकिल्ल्यांचा वारसा जतन करण्याच्या दृष्टीने मुलांनी केलेला हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे. ही कलाकृती विघ्नेश नागे, प्रणाल नागे, तनिष्का नागे, केदार यादव आणि सुमित यादव या बालकलाकारांनी एकत्रितपणे उभारली आहे.





● सांगली जिल्ह्यातील कुकटोळी-कवठे महांकाळ येथील प्रत्युष किरण कदम याने साकारलेला किल्ला.



● गोरेगावच्या ९२ वर्षांचे गजानन वनारसे आणि मुरुडच्या ८७ वर्षांच्या रोहिणी नाझरे हे आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात आहेत. असे असतानाही गजानन वनारसे हे बाहणीच्या प्रेमाखातर भाऊबीज करण्यासाठी दरवर्षी येत असतात. दोघेही आजाराने त्रस्त असूनदेखील एकमेकांना भेटण्यासाठी आले, हेच खरे प्रेम. (छायाचित्र: सुधीर नाझरे)

अजिंठा-वेरूळ लेण्यांची हुबेहूब प्रतिकृती

। सुधागड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्राच्या प्राचीन वारसा आणि शिल्पकलेचा अप्रतिम आविष्कार पाली-आगरआळी येथे पाहायला मिळत आहे. येथील कलाकार बंधू श्रीरंग काटकर, अवधुत काटकर आणि श्रेयस काटकर यांनी अजिंठा-वेरूळ लेण्यांची भव्य आणि हुबेहूब प्रतिकृती साकारली आहे. या प्रतिकृतीतून अजिंठा लेण्यांमधील नाजूक चित्रकला, वेरूळ लेण्यांमधील भव्य शिल्पकला आणि प्राचीन भारतीय संस्कृतीचे दर्शन घडत आहे. लेण्यांची रचना, खांब, शिल्पे आणि कोरीव काम इतके बारकाईने करण्यात आले आहे की, प्रत्यक्ष अजिंठा-वेरूळला भेट दिल्याचा भास होत असल्याचे बोलले जात आहे. ही कलाकृती पाहण्यासाठी पाली परिसरासह रायगड जिल्ह्यातील नागरिक, पर्यटक आणि कलाप्रेमी मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी ही प्रतिकृती म्हणजे इतिहासाचे जिवंत दर्शनच ठरत आहे. महाराष्ट्राची प्राचीन कला आणि वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी काटकर बंधूंनी केलेले हे काम कौतुकास्पद आहे.



● (छायाचित्रः भूषण सुतार)



● अलिबाग तालुक्यातील पेझारी चेकपोस्ट येथील कनिष्क गौरव दांडेकर याने साकारलेला प्रतापगड किल्ला.



राशीभविष्य

- **मेष** : अचानक धनलाभाचे योग आहेत. भागीदारीच्या व्यवसायात विचारानं रहावं. वादाचे प्रसंग टाळावेत.
- **वृषभ** : कौटुंबिक जीवनात समाधान लाभेल. उत्साहवर्धक कालावधी आहेत. गुंतवणूक विचारानं करावी.
- **मिथुन** : गुणांचा विकास होत जाईल. नव्या संधींचा लाभ उठवावा. वैवाहिक जीवनात शुभ घटना घडतील.
- **कर्क** : पोटाच्या तक्रारींची दखल घ्यावी. प्रक्रिया उद्योगात अनुकूलता वाढेल. स्थावर प्रश्न मार्गी लागतील
- **सिंह** : नव्या कामांना गती प्राप्त होईल. सुख-स्वास्थ लाभणार आहे. संततीसंबंधात शुभ घटना घडतील.
- **कन्या** : प्रतिकूलता संपलेली नाही. सरकारी कामातून पैसा मिळेल. हाती घेतलेल्या कामात लक्ष द्यावं.
- **तूळ** : आर्थिक अनुकूलता राहील. नव्या कल्पना साकार होतील. हाती घेतलेली कामं मनासारखी होतील.
- **वृश्चिक** : राशीतील शुक्र सुख प्रदान करणार आहे. कलात्मक दृष्टीकोन लाभदायी ठरेल. बाकी चिंता नको.
- **धनु** : आर्थिक कामं मनासरखी होत जातील. गुरूकृपेने सर्व चांगलं होईल. सकारात्मक विचार लाभ देतील.
- **मकर** : नव्या विचारांना चालना मिळेल. सरकारी कामं मनासारखी होतील. व्यवसायात चिंता कमी होईल.
- **कुंभ** : मनातील कल्पना साकार होऊ लागतील. नव्या संधींचा लाभ उठवावा. प्राप्ती चांगली होत जाईल.
- **मीन** : कार्यक्षेत्रात विलंबानं पण चांगली प्रगती होईल. कला-गुणांचा विकास होईल. अडचणी दूर होतील.

१३ नोव्हेंबर

दिन विशेष

१९१७ :महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचा जन्म.
१९५६ : आधुनिक बंगाली इतिहासकार इंद्रभुषण बॅनर्जी यांचे निधन.
१९६७ : षटकारसम्राट सी. के. नायडू यांचे निधन.
१९९५ : सौदी अरेबियाच्या रियाध शहरात दहशतवाद्यांनी घडवून आणलेल्या ट्रक बॉंबस्फोटात पाच अमेरिकन तर दोन भारतीय नागरिक ठार.
२०१५ : पॅरिसमध्ये झालेल्या भीषण दहतशवादी हल्ल्यात १३० जणांचा मृत्यू झाला.

फन टाईम

कार्टून्सची गुपितं

तुम्ही कार्टून बघत असाल. कार्टूनमधली प्रमुख पात्रं तुम्हाला हसवतात. मात्र आपल्याला या कार्टून पात्रांविषयी बऱ्याचशा गोष्टी माहीत नसतात. चला तर, मग कार्टून्सची गुपितं जाणून घेऊ.

* 'टॉम अँड जेरी' हे कार्टून तुम्हाला माहीत आहे. त्यांच्या भांडणात कधी टॉमची सरशी होते तर कधी जेरी जिंकतो. छोटासा जेरी टॉमला जेरीस आणतो. पण सुरूवातीला ही पात्रं जेस्पर आणि जिंक्स या नावाने ओळखली जायची. त्यानंतर त्यांची नावं बदलण्यात आली. * मिकी माउस सगळ्यांचा आवडता. हा मिकी माउस मध्यंतरी ८० वर्षांचा झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात गुप्तहेर मिकी माउस या शब्दाचा वापर करत. गुप्त शब्द म्हणून मिकी माउसचा वापर व्हायचा. आता हाच मिकी माउस मुलांचा आवडता बनला आहे. * 'टिनेज म्युटेड निंजा टर्टल' हे कार्टून तुम्ही बघितलं असेल. यातले टर्टल्स वेगवेगळ्या रंगाचे हेडबँड्स बांधतात. पण सुरवातीला सगळ्यांचे हेडबँड्स लाल रंगाचे होते. प्रत्येकाची वेगळी ओळख पटावी म्हणून निर्मात्यांनी त्यांना वेगवेगळ्या रंगाचे हेडबँड दिले.

आरोग्यमंत्र

रक्ताची कमतरता?

रोजच्या कामाच्या धावपळीत आणि कार्यालयीन तसंच घरच्या जबाबदाऱ्या पार पाडताना प्रकृतीच्या काही तक्रारींकडे दुर्लक्ष केलं जातं. त्यामध्ये दम लागणे, थकवा जाणवणे, अशक्तपणा वाटणे यांचा समावेश होतो. शरीरातील रक्ताल्पतेमुळे या समस्या निर्माण होतात. वास्तविक यावर काही सोपे उपाय प्रभावी ठरतात. अशा काही उपायांविषयी ...



* शरीरात रक्ताचं प्रमाण वाढवण्यासाठी अंकुरित धान्याचं सेवन अवश्य करायला हवं.
* नियमित एक ग्लास सफरचंदाच्या ज्युसचं सेवन केल्यास रक्ताल्पतेची समस्या दूर करता येते. सफरचंदाच्या ज्युसमध्ये बीटचा रस आणि थोडासा मध टाकावा. यानेही चांगला लाभ होतो.
* मीठ आणि लसणाच्या नियमित सेवनाने रक्तातील हिमोग्लोबिनचं प्रमाण वाढण्यास मदत होते.
* सोयाबीनमध्ये आयर्न आणि व्हिटॅमिन मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. त्यामुळे सोयाबीनचं नियमित सेवन लाभदायी ठरतं.
* टोमॅटोमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी आणि लायकोपिन आढळतं. त्यामुळे टोमॅटोचं नियमित सेवन बरंच लाभदायी ठरतं.
* शेंगदाणे आणि गूळ एकत्रितरित्या चावून खाण्यानेही प्रकृतीच्या काही तक्रारी दूर होण्यास मदत होते.

फॅशन फंडा

शृंगार नववधूचा

लग्न म्हणजे प्रत्येक मुलीच्या आयुष्यातला खास क्षण. नववधूच्या दागिन्यांमध्ये सध्या बरीच व्हरायटी बघायला मिळते. सध्याच्या दागिन्यांच्या ट्रेंडवर एक नजर टाकू या.

* कपाळावर छानशी बिंदी खुलून दिसते. गोल्डन, डायमंड, पोलकी तसंच फ्लोरल डिझाइनवाल्या बिंदीची सध्या चलती आहे. * सध्या नेकलेसमध्ये चोकर हा प्रकार बराच लोकप्रिय ठरत आहे. चोकरमध्ये भरपूर व्हरायटी पहायला मिळते. त्यामुळे नवरीने एखादा चोकर नक्कीच खरेदी करावा. * पायात पैंजणही हवेच. आकर्षक डिझाइन्सच्या पैजणांची सध्या चलती आहे. चांदीसोबतच ऑक्सिडाइज्ड पैंजणांचा पर्यायही आहे. गोल्ड प्लेटेड पैंजणही छान दिसतात. तुम्ही तुमच्या आवडीनुसार पैंजण खरेदी करू शकता. * बऱ्याचजणी लग्नात पारंपरिक नथ घालणं पसंत करतात. वैविध्यपूर्ण डिझाइन्सच्या नथी उपलब्ध आहेत. अगदी छोट्या, नाजूक नथीपासून लांब नथीही लक्ष वेधून घेत आहेत. चापाच्या नथींचा पर्यायही निवडता येईल. या नथीमुळे नवरीचा शृंगार पूर्ण होतो. त्यामुळे तुमच्याकडे छानशी नथ असायला हवी.

पंचांग

शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
कार्तिक शु. ४, चंद्रराशी : धनु,
नक्षत्र : मूळ, योग : धृति,
सूर्योदय ६.४७, सूर्यास्त ५.५९

फॉरवर्ड्स

पसंद जितनी गहरी होतीं हैं यारा...

तक़लीफ़ उतनीं हीं ज़्यादा होतीं हैं...!

भटकंती

दोस्तांनो, स्कुबा डायव्हिंग हा धाडसी खेळ आहे. यात समुद्राच्या तळाशी जाऊन सागरी जीवन न्याहाळता येतं. भारतातली काही ठिकाणी खास स्कुबा डायव्हिंगसाठी प्रसिद्ध आहेत.

* अंदमान निकोबार बेटांवर स्कुबा डायव्हिंगचा आनंद लुटता येतो. इथल्या निळ्याशार समुद्रातली सृष्टी बघणं हा अनोखा अनुभव ठरतो. समुद्राच्या तळाशी गेल्यानंतर मासे अगदी आपल्या जवळून जातात.
* लक्षद्विपलाही अनेक जण स्कुबा डायव्हिंगसाठी येतात. परदेशी पाहुण्यांनाही इथे स्कुबा डायव्हिंग करायचं असतं. **(क्रमश:)**

करिअरवाटा

व्हा एअरॉनॉटिकल इंजिनिअर

सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात व्यापारीदृष्ट्या देवाण-घेवाणीवर भर दिला जात आहे. साहजिक वाहतूक क्षेत्राला महत्त्व आलं आहे. हवाई वाहतूक क्षेत्रही याला अपवाद नाही. विविध शहरांमध्ये विमानसेवा उपलब्ध झाली असुन त्या ठिकाणी वाहतुकीसाठी चांगला प्रतिसादही मिळत आहे. या साऱ्यांचा परिणाम म्हणून या क्षेत्रात कारकिर्दीला चांगला वाव मिळू लागला आहे.



या क्षेत्रात इंजिनिअर, सायंटिस्ट किंवा टेक्निशियनपासून बिझनेस मॅनेजमेंटपर्यंत अनेक पदांचा समावेश आहे. त्यात एअरोस्पेस इंजिनिअरिंग हे वेगाने विकसित होणारं क्षेत्र आहे. यात एअरक्राफ्ट फ्लीट प्लॅनिंग अँड मेंटेनन्स उद्योगाचाही मोठ्या प्रमाणावर विस्तार होत त्यादृष्टीने या क्षेत्रात विविध पदांवर अनेकांना संधी प्राप्त होऊ शकते. या संदर्भातील विविध अभ्यासक्रम पंजाब इंजिनिअरिंग कॉलेज, चंदीगड, आय.आय.टी (मद्रास, कानपूर, मुंबई आणि खरगपूर), इंडियन इंस्टीट्युट ऑफ एअरॉनॉटिकल इंजिनिअरिंग, डेहरादून, मद्रास इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, चेन्नई, आय.आय.ए. ई.आय.टी., पुणे आणि सरदार वल्लभभाई पटेल इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, गुजरात या संस्थांमध्ये उपलब्ध आहेत. यातील कोणत्याही संस्थेत प्रवेश घेऊन हवाई वाहतूक क्षेत्रातील कारकिर्दीचं स्वप्न पूर्ण करता येईल.

खेचाखेची

झाडू

आधी आमच्या सोसायटीत आमच्यासोबत कोणी बोलत नव्हतं...

पण जेव्हा सगळ्यांना कळलं की, आमच्याकडे उंच स्टूल, ॲल्युमिनियम ची १० फुटी शिडी, आणि जळमटं काढण्यासाठी दांडा असलेला झाडू आहे...

तेव्हापासून सगळे आमच्याशी थांबून बोलू लागले.

वेगळं काही

केरळ सरकारने अनोखा उपक्रम सुरू केला आहे. इथल्या शाळांमध्ये 'वॉटर बेल' वाजवली जाते. वॉटर बेल वाजली की मुलांना वॉटर ब्रेक मिळतो. ब्रेक मिळताच मुलांनी पाणी प्यायचं. राज्य सरकारने सरकारी शाळांमध्ये हा उपक्रम सुरू केला आहे. शाळेच्या वेळेत तीन वेळा ही बेल वाजवली जाते. आता आपल्याला पाणी प्यायचं आहे, याची जाणीव मुलांना करून देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सकाळी १०.३५, दुपारी १२ आणि दोन वाजता घंटा वाजवली जाते. मग १५ ते २० मिनिटांमध्ये मुलं पाणी पिऊ शकतात. या उपक्रमातून प्रेरणा घेऊन कर्नाटक आणि तमिळनाडू सरकारनेही अशा प्रकारचा उपक्रम राबवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

रूचिरा

थंडीसाठी बेस्ट सूप



यंदा बोचऱ्या थंडीचा अनुभव घेण्यासाठी काही दिवस प्रतिक्षा करावी लागली. परंतु आता गारठा जाणवू लागला आहे. थंडीत गरमागरम सूप प्यायल्यावर छान तरतरी येते. तुम्ही घरी निरनिराळी सूप्स बनवत असाल तर मशरूम सूप थंडीसाठी बेस्ट आहे.

साहित्य : २०० ग्रॅम पांढरे बटण मशरूम्स, दोन कप पातीचे कांदे (गोलाकार), अर्धा टी स्पून लसूण, आलं पेस्ट, एक टी स्पून बारीक चिरलेली सेलरी, अर्धा टी स्पून मिरपूड, एक टी स्पून सोया सॉस, तीन कप पाणी, पाच टेबलस्पून चिरलेली कांद्याची पात, चवीनुसार मीठ, तीळाचं तेल इत्यादी.

कृती : बटण मशरूम्स स्वच्छ धुवून बारीक तुकडे करा. कढई किंवा पॅनमध्ये अर्धा टेबलस्पून तिळाचं तेल घेऊन त्यात वाटलेलं आलं, लसूण घाला. चांगलं परतून घ्या. त्यात चिरलेला पातीचा कांदा घालून परता. मशरूम, सेलरी घाला. मध्यम आचेवर दोन मिनिटं परतून घ्या. आता तीन कप पाणी घाला. सूप मंद आचेवर चार ते पाच मिनिटं शिजवून घ्या. सोया सॉस घाला. वर मिरपूड, चवीनुसार मीठ घाला. सूप साधारण १५ मिनिटे मंद आचेवर ठेवा. उकळल्यावर गॅस बंद करा. या सूपमध्ये चिरलेली कांद्याची पात घाला. गरमागरम प्यायला द्या.

सुडोकू १७३

		१		४		८		
८			२		७			
	२			३			१	
		५			३		९	
६	१		४		८		२	३
	७		९			४		
	५			८			३	
			३		५			८
		८		९		२		

टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १७२ चे उत्तर

९	२	१	९	७	६	३	४	५
७	३	५	२	१	४	९	८	६
४	६	९	५	३	८	२	१	७
६	५	४	८	९	१	७	२	३
२	७	३	६	४	५	१	९	८
१	९	८	७	२	३	५	६	४
५	१	६	३	८	९	४	७	२
९	८	७	४	५	२	६	३	१
३	४	२	१	६	७	८	५	९

शब्दकोडे क्रमांक १७३



आडवे शब्द :-

१) प्रतिकार
५) आजूबाजूस
८) विश्रांतीसुख देणारी
१०) तराजू
१२) ललाट
१३) नियमित यात्रेला जाणारा
१४) मनाला लागलेली टोचणी
१५) मनात हेतू धरून केलेले काम
१७) करवत
१९) कशा प्रकारचा
२१) एखाद्यास झुलविणे (वा.प्र.)
२४) भ्रमर
२५) सामान
२६) मोठा भाऊ
२७) सदोदित
२८) शेराचा सोळावा भाग
३०) वनवास
३१) *** बॅनर्जी, प बंगालच्या मुख्यमंत्री
३३) नवाकोरा
३५) समशेर
३७) पहिला आकडा
३९) वल्लरी
४१) खाज
४२) सापाची एक जात
४४) बातमी
४५) चुरमुरे, फरसाण यांचे मिश्रण
४६) मज्जाव
४७) वालुकामय जमीन
४९) रेशमी धोतर
५०) बेडकांचे ओरडणे
५१) आजच्या आधीचा दिवस
५२) मक्केच्या मशिदीतील पवित्र दगड
५३) पुत्र
५४) राक्षस
५६) अंजन
५७) कबूतर
५९) सीतापती
६०) दात
६१) आयुष्य
६२) दक्षतेचा इशारा
६३) शोक, दु:ख

उभे शब्द :-

१) प्रतिनिधी निवडण्याची पद्धत
२) प्रत्येक दिवशी
३) श्रीमंत
४) होकारच्या विरुद्ध
६) पडसे,
७) संपूर्ण
८) सुस्ती
९) अन्न घशाशी येणे
११) एक क्षार
१४) प्रॅक्टिसला मराठी शब्द
१६) रामचरितमानस लिहिणारे संत
१७) शर्तीचे प्रयत्न करणे (वा.प्र.)
१८) ठेवलेली स्त्री
२०) चाणक्यनीति
२१) ***च्या लग्नाला सतराशे विघ्न
२२) लक्ष्मी
२३) पायजमा
२६) वणवा
२७) सारखा
२९) हस्त
३०) यासाठी
३२) मनाचा ओढा
३४) श्रम, मेहनत
३५) अखेर, शेवट
३६) श्रीविष्णूचे बटु रूप
३८) तलवार
४०) संतापी
४३) खरकट्याची प्रचंड रास
४४) नाखुषी, नाराजी
४६) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
४८) नमन
४९) कलावंत
५०) झाकण असलेले पात्र
५१) सापाने टाकलेली त्वचा
५२) चिंता
५३) फूल पुष्प
५४) नवरा
५५) बारा महिने
५७) पर्ण
५८) पातळ खांब
५९) कृष्णसखी
६०) सूर्याचे एक नाव

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

द	ल	बा	द	ल	■	प	र	त	वे	ल	■	आ	का	श
वा	स	र	■	ग	वा	क्ष	■	पा	■	ह	■	वा	प	र
खा	■	दा	वे	दा	र	■	रा	स	ग	र	बा	■	■	म
ना	■	न	ग	■	स	ना	त	नी	■	ब	■	उ	मा	■
■	म	■	वा	य	दा	■	वा	स	■	ह	ह	पा	र	■
ग	जा	न	न	■	र	सा	■	■	वा	र	■	स	वा	ल
म	■	ग	■	गो	■	ह	ल	वा	ई	■	पा	ना	■	हा
न	व	र	ल्न	■	भा	स	■	च	ट	क	न	■	घ	न
■	र्त	■	स्त	व	न	■	का	ना	■	■	■	क	ळ	स
वि	मा	न	■	स	■	न	व	ल	वि	शे	ष	■	■	हा
■	न	ज	रा	न	ज	र	■	य	■	व	ट	■	त	न
न	का	र	■	■	पा	म	र	■	मा	ई	■	क	ला	■
व	ळ	■	स	द	न	■	स	ड	क	■	क	ड	व	ट
नी	■	मा	रा	■	■	पा	वा	■	ड	र	पो	क	■	ण
त	ड	का	फ	ड	की	■	न	फा	■	■	ल	■	भा	क

खेळाडूंच्या बुद्धीचा लागणार कस

राज्य शालेय बुद्धिबळ स्पर्धा ; राष्ट्रीय निवडीसाठी ३८७ खेळाडूंमध्ये चुरस



। मुंबई । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय अजिंक्यपदासाठी स्थान मिळविण्यासाठी राज्यातील शालेय बुद्धिबळपटू महाराष्ट्र राज्य शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी सज्ज झाले आहेत. शुक्रवारी (दि.१३) दहिसर येथील रुस्तमजी केंब्रिज इंटरनॅशनल स्कूलमध्ये सुरू होणाऱ्या या तीन दिवसीय स्पर्धेत तब्बल ३८७ खेळाडू आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. इंडियन चेस स्कूलच्या वतीने आयोजित या स्पर्धेत ९, १३ आणि १७ वर्षांखालील मुले व मुली अशा सहा फिडे मानांकित गटांत सामने खेळविण्यात येतील. विशेष म्हणजे, या स्पर्धेतील प्रत्येक गटातील पहिले दोन क्रमांक मिळवणाऱ्या खेळाडूंना महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत अहमदाबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत खेळण्याची संधी मिळणार आहे.

दुसऱ्या टप्प्यात ९ वर्षांखालील खुल्या गटात ११०, मुलींच्या गटात ५६, १३ वर्षांखालील खुल्या गटात १२३, मुलींच्या गटात ४५, १७ वर्षांखालील खुल्या गटात ३८, तर मुलींच्या गटात १५ खेळाडू सहभागी होणार आहेत. या स्पर्धेच्या दोन्ही टप्प्यांत मिळून खेळाडूंची संख्या ८०४ वर पोहोचली आहे. पहिला टप्पा ४ ते ६ नोव्हेंबरदरम्यान पार पडला असून, त्यात ४१७ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.

लहान गटात अधवान, गार्गीला अग्रमानांकन९ वर्षांखालील खुल्या गटात अध्वान ओसवाल (१७२४) याला अग्रमानांकन मिळाले आहे. ईशान अग्निहोत्री (१६१८) आणि निहांश खोडे (१५७२) हे अनुक्रमे दुसरे व तिसरे मानांकित खेळाडू आहेत. आरव झावर (१५७१) आणि पहिल्या टप्प्यात ७ वर्षांखालील खुल्या गटाचे विजेतेपद पटकावणारा इवान दुबे (१५४५) यांच्याकडूनही कडवी झुंज अपेक्षित आहे.९ वर्षांखालील मुलींच्या गटात नागपूरच्या गार्गी हरकरे (१५६८) हिला अग्रमानांकन देण्यात आले आहे. लिया कृष्णन (१५५८) आणि दीधिती बॅनर्जी (१५५३) या तिच्या प्रमुख प्रतिस्पर्धी असतील. पहिल्या टप्प्यात ७ वर्षांखालील मुलींच्या गटात विजेतेपद मिळवणाऱ्या लिया कृष्णनकडेही विशेष लक्ष असेल. इशी सिंग (१५३८) आणि मिराई सरदाना (१५३३) यांच्यामुळे या गटातील चुरस आणखी वाढणार आहे.

१३ वर्षांखालील खुल्या गटात सर्वाधिक १२३ खेळाडूंचा सहभाग आहे. निर्वाण शाह (१९५६) याला अग्रमानांकन मिळाले असून, ओम रामगुडे (१९०६) आणि विहान राव (१८२६) हे त्याचे प्रमुख प्रतिस्पर्धी ठरणार आहेत.मुलींच्या १३ वर्षांखालील गटात त्वेषा जैन (१६९७) हिला अग्रमानांकन मिळाले आहे. इहिना अय्यर (१५६६), निश्का अग्रवाल (१५६२) आणि तिस्या भट्ट (१५२४) या तिच्यासमोर आव्हान उभे करतील. पहिल्या टप्प्यात ११ वर्षांखालील मुलींच्या गटाचे विजेतेपद पटकावणाऱ्या त्वेषाकडून पुन्हा दमदार कामगिरीची अपेक्षा आहे.

१७ वर्षांखालील खुल्या गटात आर्य बागायतकर (१७४२) याला अग्रमानांकन मिळाले आहे. युवराज सिंग (१६९०), सोहम सहमाते (१६६७) आणि दैविक मेहता (१६४२) हे त्याचे प्रमुख प्रतिस्पर्धी असतील. मुलींच्या १७ वर्षांखालील गटात दृष्या नाईक (१७१३) ही सर्वोच्च मानांकित खेळाडू आहे. हिमांशी तेंडुलकर (१५३०), इक्षा सोनी (१५२८) आणि त्रिशा जगताप (१५२७) यांच्याकडूनही चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे.

निवडक

हार्दिक पंड्यावर चढला पंजाबचा रंग

मोहाली : इंडियन प्रीमियर लीगमधील ट्रेडिंगमध्ये संघांची अदलाबदल झाल्यानंतर अष्टपैलू हार्दिक पंड्या आता मुंबई इंडियन्स सोडून पंजाब किंग्समध्ये दाखल झाला आहे. त्याचवेळी, पंजाब किंग्सचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग मुंबई इंडियन्सचा भाग बनला आहे. या बदलादरम्यान हार्दिक पंड्याने सोशल मीडियावर पंजाब किंग्सच्या जर्सीतील आपला एक फोटो शेअर केला आहे. यासोबत त्याने लिहिले, माझा कर्णधार श्रेयस अय्यर, माझा प्रशिक्षक रिकी, माझा संघ म्हणजे संपूर्ण पंजाब. हार्दिकच्या या पोस्टकडे पंजाब किंग्ससोबतच्या त्याच्या नव्या प्रवासाशी जोडून पाहिले जात आहे. या फोटोमध्ये तो पंजाब किंग्सच्या पोशाखात दिसत आहे. त्याच्या या पोस्टनंतर संघाच्या चाहत्यांमध्येही चर्चा सुरू झाली आहे. आयपीएलकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनानुसार, हार्दिक पंड्या १६.३५ कोटी रुपयांच्या सध्याच्या मानधनापेक्षा अधिक रकमेवर मुंबई इंडियन्समधून पंजाब किंग्समध्ये सामील झाला आहे. त्याचवेळी, वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग १८ कोटी रुपयांच्या सध्याच्या किमतीवर मुंबई इंडियन्सशी जोडला गेला आहे. या ट्रेडसह हार्दिकचा मुंबई इंडियन्ससोबतचा दुसरा कार्यकाळ संपला आहे.





बारामतीच्या मुलींची दमदार कामगिरी

बारामती : राष्ट्रीय स्तरावरील कुस्ती आणि बुद्धिबळ स्पर्धांमध्ये बारामती तालुक्यातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवलेल्या खेळाडूंचा उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून गौरव करण्यात आला. दिल्ली येथे पार पडलेल्या ७० व्या नॅशनल स्कूल गेम्स २०२६-२७ कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या बारामतीच्या दोन खेळाडूंनी पदकांची कमाई केली, तर राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत एका खेळाडूने देशात प्रथम क्रमांक पटकावून बारामतीचा नावलौकिक वाढविला आहे. दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत श्रावणी संजय शिंदे हिने १४ वर्षांखालील ३३ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णयश संपादन केले. तर समृद्धी प्रवीण सावंत हिने १४ वर्षांखालील ३० किलो वजन गटात तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदक पटकावले. राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत अनुष्का बापू कुतवळ हिने १९ वर्षांखालील मुलींच्या गटात देशात प्रथम क्रमांक मिळवत ऐतिहासिक यश संपादन केले. तिच्या या कामगिरीमुळे बारामतीच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करण्यासाठी नगराध्यक्ष सचिन सातव, संभाजी होळकर, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे आदी उपस्थित होते.

अर्शदीपने उरकला साखरपुडा

वेलिंग्टन : वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग याच्या आयुष्यात एका नव्या प्रवासाची सुरुवात झाली आहे. अर्शदीपने अभिनेत्री समरीन कौर हिच्यासोबत साखरपुडा केला आहे. न्यूझीलंडम ध्ये हा साखरपुडा पार पडला असून, त्यांच्या या आनंदाच्या बातमीने चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. अर्शदीप आणि समरीन गेल्या काही काळापासून एकमेकांना डेट करत असल्याची चर्चा होती. मात्र, आता दोघांनीही सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या नात्यावर शिक्कामोर्तब केले आहे. समरीन कौर हिने इन्स्टाग्रामवर साखरपुड्याचे खास क्षण टिपणारे फोटो शेअर केले आहेत. यातील एका छायाचित्रात अर्शदीप गुडघ्यावर बसून समरीनला प्रपोज करताना दिसत आहे. या फोटोंसोबत समरीनने भावनिक संदेशही लिहिला आहे. आयुष्याने आपल्याला अनेक गोष्टी दिल्या असतील; पण एकमेकांची साथ मिळणे ही सर्वांत आनंदाची गोष्ट आहे. आयुष्यभर एकत्र राहण्यासाठी अशा आशयाची भावना तिने व्यक्त केली आहे.



व्हॉलीबॉलचे मैदान पुन्हा गाजणार

पाताळगंगा : बंद असलेला व्हॉलीबॉलचा खेळ पुन्हा सुरू करण्याचा निर्णय श्री हनुमान मित्र मंडळ, शिळफाटा यांनी घेतला असून, ठिकाणी असलेल्या मंडळाच्या मैदानावर या खेळाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमामुळे जुन्या खेळाडूंच्या आठवणींना उजाळा मिळाला असून परिसरातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. व्हॉलीबॉलचा खेळ पुन्हा सुरू झाल्याने मंडळाच्या क्रीडापरंपरेला नवसंजीवनी मिळाली आहे. या खेळाचे अनावरण मंडळाचे मार्गदर्शक गणेशकर आणि ज्ञानेश्वर बांगर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी जुन्या आठवणींना उजाळा देत मैदानी खेळांचे महत्त्व विषद केले. युवकांनी मोबाईलच्या आहारी न जाता मैदानाकडे वळावे, नियमित खेळातून आरोग्य जपावे आणि संघभावना वाढवावी, असे आवाहन करण्यात आले.अनेक वर्षांनंतर व्हॉलीबॉलचे सामने पुन्हा रंगणार असल्याने शिळफाटा परिसरात क्रीडाचळवळीला चालना मिळणार आहे.

सूरज करकरेने जिंकली कार



। महाड । प्रतिनिधी ।

पनवेल येथे नुकत्याच पार पडलेल्या रायगड प्रीमियर लीग या भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत महाडचा प्रतिभावान क्रिकेटपटू सूरज करकरे याने आपल्या आक्रमक फलंदाजीच्या जोरावर मालिकावीराचा किताब पटकाविला. या उल्लेखनीय कामगिरीसाठी त्याला आकर्षक मारुती स्विफ्ट कार बक्षीस म्हणून मिळाली. सूरजच्या या यशाचे कौतुक करत महाड प्रेस असोसिएशनच्या वतीने त्याचा निवासस्थानी जाऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

रायगड जिल्ह्यातील प्रतिष्ठेची क्रिकेट स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड प्रीमियर लीगचे यंदा सातवे वर्ष होते. या स्पर्धेत सूरज करकरे याने महाडच्या चॅम्पियन्स संघाचे प्रतिनिधित्व केले. संपूर्ण स्पर्धेदरम्यान त्याने अवघ्या ६५ चेंडूंचा सामना करीत तब्बल १८० धावा कुटल्या. या खेळीत १४ चौकार आणि १६ उत्तुंग षटकारांचा समावेश होता. त्याच्या या आक्रमक फलंदाजीने क्रिकेटप्रेमींना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर त्याने मालिकावीराचा किताब पटकाविला. विशेष म्हणजे, दक्षिण रायगडमध्ये मालिकावीर पुरस्कारासह कार जिंकणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे.

सूरजच्या या यशाची बातमी रायगड जिल्ह्यात आणि प्रामुख्याने महाड शहरात पोहोचताच क्रिकेटप्रेमींकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. महाड प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र शिंदे हे स्वतः क्रीडाप्रेमी असल्याने त्यांनी सूरजच्या कामगिरीचे विशेष कौतुक केले. असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसह सूरजच्या निवासस्थानी भेट देत त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाड शहरातील क्रीडापटूंना सरावासाठी पुरेशा आणि सुसज्ज मैदानांची कमतरता असल्याचा मुद्दाही उपस्थित झाला. महाडमधील खेळाडूंना क्रीडांगण उपलब्ध व्हावे, यासाठी महाड प्रेस असोसिएशन निश्चितपणे प्रयत्नशील राहील, असे आश्वासन अध्यक्ष रवींद्र शिंदे यांनी सूरज याला दिले.

रेवदंडा कुस्ती स्पर्धेत बेलोशी आखाडा प्रथम

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

सालाबाद प्रमाणे लक्ष्मीपुजनाच्या निमित्ताने श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडळ चौल-रेवदंडा यांचे वतीने आयोजीत कुस्ती स्पर्धेत बेलोशी आखाडा प्रथम क्रमांकाचा विजेता ठरला. द्वितीय क्रमांक वाडगाव आखाडा तर तृतीय क्रमांक आंदोशी आखाड्याने पटकावला.

यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्या प्रमुख उपस्थितीसह अलिबाग तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष जयेंद्र भगत, श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडळ चौल-रेवदंडा अध्यक्ष सुरेश खोत, शेकापचे रेवदंडा शहर चिटणीस हेमंत गणपत, विनायक खोपकर, संदिप खोत, भगवान नाईक, विलास पाटील, प्रमोद नवखारकर, नितिन ठाकूर, महेश ठाकूर, राहूल हेमंत गणपत आदीची उपस्थिती होती.



स्पर्धेचे पंच म्हणून रविंद्र घासे, सुधाकर पाटील, वासुदेव पाटील, मिंलिद भगत यांनी काम पाहिले तर रेवदंडा शेकापचे शहर चिटणीस निलेश खोत यांच्यासह मंडळाचे सदस्य महेश ठाकूर, मधुकर फुंडे, रोहिदास मानकर, शरद पाटील, चंद्रकांत धाटावकर, नितिन ठाकूर, राजन कोतवडेकर, जयंत शिंदे, प्रमोद नवखारकर यांनी विशेष परिश्रम घेतले. या कुस्ती स्पर्धेस शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दहा हजार रूपयांचे पारितोषिक दिले. प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाच्या विजेत्यासाठी पै.इनुस तांडेल यांच्या स्मरणार्थ खलिल तांडेल यांनी चषक दिले, तर पै. गफुर फकरूद्दीन लांबाते यांच्या स्मरणार्थ अस्लम लांबाते यांनी प्रथम क्रमांकास एक हजार एकशे एक रोख रक्कमेचे बक्षिस दिले.

मुंबई इंडियन्सला कर्णधाराची प्रतीक्षा

मुंबई : आयपीएल लिलावाआधी हार्दिक पांड्या अधिकृतपणे पंजाब किंग्सचा भाग झाला आहे. आगामी हंगामात तो श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील खेळाडूच्या रुपात पंजाबच्या संघाकडून मैदानात उतरणार हे चित्रही स्पष्ट झाले. त्यानंतर आता मुंबई इंडियन्सचा नवा कर्णधार कोण होणार? याची उत्सुकता शिगेला पोहचली आहे. या शर्यतीत हिटमॅन रोहित शर्मासह चार नावे चर्चेत आहेत. कर्णधारपदासाठी रोहित शर्माचे नाव सर्वात आघाडीवर आहे.

ईराने केले ६ जागतिक विक्रम

। अंदमान-निकोबार । वृत्तसंस्था ।

बुलढाण्याची १० वर्षीय ईरा आदित्य राऊत हिने स्कूबा डायव्हिंगमध्ये एका दिवसात ६ विश्वविक्रम केले आहेत. वयाच्या १० वर्षे, १७ तास आणि ३५ मिनिटांनी ती जगातील सर्वात कमी वयाची पात्र स्कूबा डायव्हर बनली. ईराने हे विक्रम अंदमान-निकोबारमधील शहीद द्वीपावरील डायव्ह ट्राइब सेंटरमध्ये केले. तिचे आई-वडील दोघेही भारतीय नौदलात कमांडर आहेत.

ईराच्या स्कूबा डायव्हिंग पात्रतेला स्कूबा स्कूल्स इंटरनॅशनलने प्रमाणित केले आहे. तसेच, इंटरनॅशनल बुक ऑफ



रेकॉर्ड्सचे निर्णायक अरविंदर सिंह भाटी यांनी तिच्या सर्व ६ विक्रमांची तपासणी करून पुष्टी केली. पाण्याखाली १ मिनिटात सर्वाधिक हँड सिग्नल दाखवले. सर्वात कमी वयाची पात्र स्कूबा डायव्हर बनण्यासोबतच ईराने पाण्याखाली अनेक विक्रम केले. यापैकी तीन विक्रम किशोरवयीन वयापेक्षा कमी वयाच्या सहभागींच्या श्रेणीत नोंदवले गेले.

ईराचे वडील कमांडर आदित्य राऊत आणि आई कमांडर स्नेह बुडाकोती भारतीय नौदलात सेवा बजावत आहेत. तिचे आजोबा अशोक राजाराम राऊत हेदेखील नौदलात कमांडर होते. ईराचे कुटुंब मूळचे महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील आहे. ती सध्या कर्नाटकातील कारवार येथील नेव्हल चिल्ड्रन स्कूलमध्ये इयत्ता ५ वीमध्ये शिकत आहे. कुटुंबातील नौदलाशी असलेल्या संबंधांदरम्यान ईराने लहान वयातच स्कूबा डायव्हिंगसारख्या साहसी क्रीडाप्रकारात आपली ओळख निर्माण केली आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये झिम्बाब्वेचा विश्वविक्रम

। दुबई । वृत्तसंस्था ।

अफगाणिस्तान आणि झिम्बाब्वे यांच्यातील पहिला कसोटी सामना अनिर्णित राहिला. मात्र, या सामन्यात झिम्बाब्वेच्या संघाने नवा विश्वविक्रम प्रस्थापित करत कसोटी क्रिकेटमध्ये इतिहास रचला आहे. एका कसोटी सामन्यातील दोन्ही डावांत ५०० पेक्षा अधिक धावा करणारा झिम्बाब्वेच्या संघाने पहिल्या डावात सर्वबाद ५०४ धावा केल्या होत्या. त्यानंतर अफगाणिस्तानने ५१४ धावा करत १० धावांची आघाडी घेतली. प्रत्युत्तरात



झिम्बाब्वेने दुसऱ्या डावात ५ विकेट्सच्या मोबदल्यात ५२३ धावा केल्या. अखेर हा सामना अनिर्णित राहिला.

झिम्बाब्वेच्या या ऐतिहासिक कामगिरीत पहिल्या डावात ब्रेंडन टेलरने १३१, तर कर्णधार ब्रायन बेनेटने १२८ धावांची खेळी केली. या दोघांच्या शतकांसह वेस्ली मधवीरेने ५४ धावांचे योगदान दिले. त्यामुळे झिम्बाब्वेने पहिल्या डावात ५०४ धावांचा टप्पा गाठला.यानंतर अफगाणिस्ताननेही दमदार फलंदाजी केली. सेदिकुल्लाह अटल, रहमानुल्लाह आणि कर्णधार रहमत शाह यांच्या शतकी खेळींच्या जोरावर अफगाणिस्तानने ५१४ धावा केल्या. दुसऱ्या डावात झिम्बाब्वेकडून इर्विनने नाबाद २०६ धावांची द्विशतकी खेळी साकारली. त्याला मधवीरेने नाबाद १०० धावा करत उत्तम साथ दिली. या दोघांनी नाबाद भागीदारी करत संघाची धावसंख्या ५२३ पर्यंत पोहोचवली.

जिल्हास्तरीय कराटे स्पर्धा
तनिष्का अन् भूमीची चमकदार कामगिरी

उरण : क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड जिल्हास्तरीय कराटे स्पर्धा रामशेठ ठाकूर स्कुल उलवेच्या मैदानावर आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये १७ वर्षाखालील मुलींच्या वयोगटात जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कुल विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी ४४ किलो या वजनी गटात तनिष्का गावंड तर ६० किलो वजनी गटात भूमी म्हात्रे या दोन खेळाडूंनी



चमकदार कामगिरी केली आहे. या खेळाडूंची निवड विभागीय स्तरावर करण्यात आली आहे. या यशाबद्दल क्रीडा शिक्षक शुभम ठाकूर यांचे अभिनंदन होत आहे.

१६ नोव्हेंबरपासून बॅटोग्राफी प्रदर्शन | **हेल्मेट, जर्सी आणि अन्य आठवणीही पाहता येणार**

सचिनच्या बॅट्स सांगणार क्रिकेटमधील सुवर्णकथा

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारतरत्न सचिन तेंडुलकर आपल्या कारकिर्दीतील काही अनमोल आठवणी मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या शरद पवार क्रिकेट संग्रहालयाला भेट स्वरुपात देणार आहे. यामध्ये सचिनच्या १०० आंतरराष्ट्रीय शतकांच्या ऐतिहासिक कामगिरीशी संबंधित बॅट्सचाही समावेश आहे. सचिनच्या एकूण २६ बॅट्स संग्रहालयात ठेवण्यात येणार असून, १६ नोव्हेंबर २०२६ रोजी विशेष कार्यक्रमात



बॅटोग्राफी प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे.

सचिनने १३ वर्षांपूर्वी याच दिवशी म्हणजे १६ नोव्हेंबर रोजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. वानखेडे स्टेडियम वर वेस्ट इंडिजविरुद्ध त्याने कारकिर्दीतील अखेरचा म्हणजेच २०० वा कसोटी सामना खेळला होता. या ऐतिहासिक दिवसाच्या स्मरणार्थ हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

एमसीए संग्रहालयात प्रथमच बॅटोग्राफी या अनोख्या संकल्पनेतून सचिनच्या क्रिकेट कारकिर्दीचा प्रवास उलगडण्यात येणार आहे. सचिनच्या २६ बॅट्ससह त्याच्या कारकिर्दीतील महत्त्वाच्या क्षणांशी संबंधित आठवणी आणि वस्तू प्रदर्शनात मांडल्या जातील. प्रत्येक बॅट सचिनच्या कारकिर्दीतील एका महत्त्वपूर्ण टप्प्याची आठवण करून देणार आहे. त्यामुळे क्रिकेटप्रेमींना त्याच्या ऐतिहासिक कामगिरीमागील आठवणी जवळून अनुभवता येणार आहेत.

एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणाले, भारतीय आणि जागतिक क्रिकेटमधील सचिन तेंडुलकरचे योगदान त्याने केलेल्या विक्रमांपुरते मर्यादित नाही. त्याचा प्रवास लाखो क्रिकेटप्रेमींच्या आठवणींमध्ये कायम आहे. या बॅट्स त्याच्या प्रवासातील अत्यंत खास आठवणी आहेत.

बॅटोग्राफीच्या माध्यमातून संग्रहालयात एक अनोखा अनुभव उपलब्ध करून देत आहोत. सचिनने या अनमोल वस्तू एमसीएसोबत सामायिक करण्याचा निर्णय घेतल्याचा अभिमान आहे. बॅट्ससोबतच सचिनच्या कारकिर्दीतील क्षणांशी संबंधित हेल्मेट, जर्सी, वैयक्तिक नोंदी आणि अन्य आठवणींच्या वस्तूही प्रदर्शनात पाहायला मिळणार आहेत. सचिनच्या असामान्य क्रिकेट प्रवासाचा हा ठेवा कायमस्वरूपी संग्रहालयात जतन केला जाणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक** : **स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक** : **मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक** : **माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक** : **प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)